म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २९८२

# स्वातंत्र्य आणि लोकशाही

## एक चिंतन

बाबुराव चंदावार



REFBK-0018426

१८०२५
८८६९६
३१।३।८२
निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८८६९६ विः निबंध
क्रमांक २९८२ नोंद दि. ३१-३-८२

ठाणे. 
दि:

# स्वातंत्र्य आणि लोकशाही :

## एक चिंतन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८४२६

बाबुराव चंदावार

REFBK-0018426

स्वातंत्र्य आणि लोकशाही : एक चिंतन । बाबुराव चंदावार । प्रथमावृत्ति । २६ जानेवारी १९७२ । किंमत : सहा रुपये । प्रकाशक : गोपाळ मोकाशी ५६५ शनिवार पेठ, पुणे ३०. । मुद्रक : गोपाळ मोकाशी, रचना मुद्रणालय ५६५ शनिवार पेठ, पुणे ३०. ।

रुचि प्रकाशन
५६५ शनिवार पेठ, पुणे ३०.
फोन : ५८१३६

[illegible]

मारोडा गांवाला

सादर समर्पण

—आबुराव चंदावार

## विषयानुक्रम

• • स्वातंत्र्य : एक अबाधित सत्य | लोकशाही : एक प्रवृत्ति एक व्यवस्था | सामाजिक विकासाची प्रेरणा कोणती ? | भौतिक हव्यासाचे भयंकर संकट | उन्नतावस्था आणि दंडनीति | हृदयाचा भाव : एक स्फोटक शक्ति | निवडणुका : लोकशाही : लोकमत | राजनीती नको लोकनीति हवी | लोकशाहीची रक्षक : लोकशक्ति | गणराज्याला स्वास्थ्य कसे लाभेल ? | लहान राज्यें आवश्यक | हक्क आणि जबाबदारीची जाणीव | संस्कारित बहुमत आणि उपजत लोकमत | निरंकुश औद्योगीकरण : एक भयानक शाप | नियोजनाचा एकमेव निकष : ग्रामीण स्वयंपूर्णता | स्वराज्य आणि आत्मराज्य | सत्याग्रह : 'स्वराज्या'च्या उद्देशपूर्तीचें साधन | राष्ट्रीयीकरण व सत्याग्रही जीवनदर्शन | • •

## मनोगत

वृत्तपत्रे व साप्ताहिक मासिकातून मी लिहीत आलो व या पुढेही लिहीत राहणार आहे. जे जाणवले तेच मी लिहिले आहे. जे मला जाणवतच नाही असे मी काहीच लिहिलेले नाही. कोणासाठी मी किती लिहिले हे मला सांगता येत नाही. कारण माझ्या लेखनाचा किंवा विचारपद्धतीचा कोणाला किती उपयोग झाला याचा मी कधी अंदाजच बांधला नाही. म्हणून मी वृत्तपत्रांसाठी, साप्ताहिक, मासिकांसाठी लिहिलेच नाही असे म्हटले तरी फारसे चुकणार नाही. अर्थात मी माझ्यासाठी लिहिले. मला सांत्वन देण्यासाठी लिहिले व पुढेही मला सांत्वन मिळावे म्हणूनच लिहिणार आहे.

वयाच्या तेरा-चौदाव्या वर्षापासून माझ्या सार्वजनिक जीवनाला सुरवात झाली. तेव्हापासूनच विचार करण्याची संवय मला करावी लागली. यात अतिशयोक्ती नाही याची खात्री माझा सांभाळ करणारे पालक देऊ शकतील. सतत रूप बदलणाऱ्या सामाजिक स्थितीने माझ्या चित्तावर जे कोरले ते ताक घुसळून लोणी काढण्याच्या प्रकारासारखे मला वाटते. म्हणून कोणताही प्रश्न माझ्या चित्तात घुसळला जात होता. तो इतका की माझ्या मगदुराप्रमाणे प्रश्नाला मी घुसळून, फेसाळून सोडू लागलो. त्यांतून लोणी बाहेर पडले किंवा नाही याचे मला भान राहिलेच नाही. अजूनही ते भान नाही. प्रश्नाला घुसळून फेसाळून सोडायचे एवढेच माझ्या चित्ताला प्रश्नांच्या बाबतीत आकर्षण असायचे व आहे. तेव्हां माझे लेखन हे केवळ माझ्याच विचार पद्धतीतून निर्माण झालेले आहे. ते कसेही असले तरी मला सतावणाऱ्या प्रश्नांमुळे ते व्यक्त झाले आहे.

स्वराज्यपूर्व काळातल्या चळवळीविषयी वाचून जेवढी माहिती मिळविता आली तेवढी मी मिळवली. स्वराज्यात मात्र समाज परिवर्तनाच्या विधायक चळवळीतच मी सतत आहे. माझ्या किशोरावस्थेत समाजवादी चळवळीचे आकर्षण होते. पण समाजवादाच्या राजकीय स्वरुपाचे आकर्षण मला कधीच वाटले नाही. नव्या समाजरचनेचे नवयुग समाजवादाने येईल, एवढे मात्र वाटायचे. अर्थात समाजवादाची विचारसरणी ही पुरोगामी विचारसरणी आहे याचे आकर्षण मला होते. पण विनोबांनी १९५१ साली तेलंगण पदयात्रेसाठी पावले उचलली तेव्हाच मला समाजवादाची प्रभात झालेली दिसली. म्हणून मी 'एकाकि पाउलामागुनी लक्षावधि चालले' त्यांतला एक झालो. तेव्हापासून आजपर्यंत अहिंसात्मक क्रांतीच्या वाटेनेच जाण्याचा माझ्या कुवतीनुसार प्रयत्न करीत आहे. या वाटेने चालताना जगाकडे व जगातल्या निरनिराळ्या घटनांकडे मी डोळे उघडे ठेऊन पाहिले आहे. म्हणजे जगातल्या या घटनांना दुर्लक्षिले नाही. म्हणून विचार व चिंतनाला सांप्रदायिक दोषांच्या वर्तुळातून बाहेर ठेवण्याचा प्रयत्न करीत आलो. म्हणून

अनेकदा मित्रांना, आप्तजनांना व नेत्यांना मी अप्रिय झालो आहे. तरी देखील मी माझी चाल व रीत सोडलेली नाही. कारण ती मला अत्यंत प्रिय आहे. माझी चाल आणि रीत माझ्या या पुस्तकातून मी स्पष्ट केली आहे. माझी चाल अनेक डोंगर चढू पाहाते. वाळवंटातला ग्रीष्म पार करू इच्छिते. जंगल व दऱ्या-खोऱ्यांना तुडवू पाहते. हे वाचकांना थोडे जरी जाणवले तरी उन्हात चालून दमलेला माणूस झाडाच्या किंचित सावलीत बसून सुखावतो तसा मी वाचकांच्या जाणीवेत सुखावीन व नव्या दमाने या पुढची वाट चालण्यास मला हुरूप येईल.

मला अलिकडे एक प्रश्न अतिशय जाणवतो. तो सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा प्रश्न होय. परिवर्तनाच्या प्रक्रियेत राज्यसंस्था कोणत्याच कारणामुळे उपयोगी ठरणार नाही, उलट परिवर्तनाची प्रक्रियाच राज्यसंस्थेच्या स्पर्शाने थांबते असे वारंवार सिद्ध होत आहे. पण परिवर्तनाची प्रक्रिया चालविण्याचा दावा करणाऱ्या संघटनांनी याचा पुरेसा विचारच केलेला नाही याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. पण अशा चळवळीमधून एक दंभ पोसला जात आहे, हे वाटल्यावाचून मात्र राहवत नाही. हा दंभ अहिंसेला पुढे करून स्वतःचा बचाव करू पाहत आहे. पण अहिंसेचे क्रियाशीलत्व या देशात सिद्ध केले जात नसल्या-मुळे ती कोणताच योग्य परिणाम काढण्याच्या दृष्टीने स्वतःची योग्यता सिद्ध करू शकलेली नाही. म्हणून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला हिंसा-अहिंसेच्या शुष्क चर्चेचे अडसर जे निर्माण करतात त्यांचा उद्देश परिवर्तनाची प्रक्रियाच अडवून धरण्याचा आहे, हे आता वारंवार उलगडून सांगितले पाहिजे. पण हे सांगायचे तर समग्र क्रांतीचे आकर्षण असावे लागेल. कारण परिवर्तन हे समग्र-क्रांतीचा परिणाम असावा लागेल. तो तसा नसेल तर मानवी स्वातंत्र्याची वस्तु-स्थिती निर्माण करण्याची जाणीव त्याला असणार नाही. या दृष्टीने आजच्या संदर्भात क्रांतीच्या व्यूह रचनेची ( स्ट्रॅटेजी ) कल्पना करता आली पाहिजे.

भारतीय समाजजीवन केंद्रिकरणाच्या आधारावर आज टिकून आहे. म्हणून या समाजजीवनाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, वैचारिक व संरक्षणविषयक स्वरुपातला कलह अलिकडच्या काळांत अतिशय जाणवू लागला आहे. आणि हा कलह आजची व्यवस्था तोडूनच पुढे जाणारा सिद्ध होणार आहे. तेव्हा, भारताची एकूण व्यवस्थाच अंतर्विरोधाने तुटणार आहे. तिला तोडण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज उरणार नाही. अशा वेळी नवी व्यवस्था कशा प्रकारची असावी याचा विचार करणे जरुरीचे होऊन बसते. कारण, अंतर्विरोधाने तुटणारी व्यवस्था ही उपकारकारक तेव्हांच सिद्ध होईल, जेव्हा नव्या व्यवस्थेचा ठोस पाया भरण्याचा उपक्रम निर्माण केला जाईल. पण क्रांतीचा समग्र दृष्टिकोन ज्यांच्याजवळ आहे तेच हे करू शकतील.

भारतीय समाजजीवनाला येऊ पहाणारे शहरी रूप हे मानवी जीवनाचे कलहात्मक रूप आहे. म्हणून या बाबतीत माणसात एक प्रकारची घृणा निर्माण झाली पाहिजे. कारण मानवी सुखाच्या अवास्तव कल्पनांच्या मृगजळा-मागे लागलेला शहरी माणूस सुख अनुभवणारच नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शहरे निर्माण होण्याची प्रक्रियाच थांबली पाहिजे. यामुळेच मानवी नाते निर्माण करता येईल. मानवी नाते नसलेला समाज हा स्वतंत्र असू शकत नाही. तेव्हा हे नाते निर्माण करणारी व्यवस्था यापुढची हवी. खेड्यांचे शोषण बंद झाले की, शहरांची वृद्धि थांबेल. मोठ्या उद्योगांच्या सभोवती एकत्र झालेल्या माणसांच्या कळपाला सामाजिक आशय उरलेलाच नसल्यामुळे अशा समाजात मानवी गुणवत्ता असणारच नाही. तेव्हां कळप करून राहण्याचे थांबविले पाहिजे. माणसांचे स्वतःचे सामाजिक रूप माणसांनी गमवता कामा नये. ते त्यांनी गमावले तर माणूसच शिल्लक राहणार नाही. यासाठी खेड्यांना एकरस करण्याचे प्रयत्न आजच्याहून अधिक प्रमाणात व्हावे लागतील. कारण, या एक-रसतेमुळेच मानवी नाते निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू ठेवता येऊ शकेल. पण शहरांची एक एजन्सी म्हणून खेड्यातही पांढरपेशा वर्ग निर्माण झाला आहे. तो खेड्यांना शहरी बाहुपाशात घट्ट धरून आहे. त्यांची पकड ढिली करण्याचा प्रयत्न स्वयंपूर्ण ग्राम रचनेच्या चळवळीने केला. पण अशा अनेक चळवळी या देशातला भांडवलदार शहरी वर्ग पचवून टाकत आहे. तेव्हां, हे असेच घडत राहिल्यास खेड्यात शहरी एजंटांना हद्दपार करण्याची चळवळ जोर धरू शकेल. म्हणून या शहरी एजंटांचे मन वळविले पाहिजे. त्यांचे मतपरिवर्तन केले पाहिजे, नाहीपेक्षा खेडी शहरांशी असहकार करू लागतील. शहर विरुद्ध खेडे असा नवा संघर्ष उभा होईल. हा संघर्ष चालविण्याचे तत्वज्ञान माओने जगाला दिले आहे. पण त्यांतली उणीव माओच्याही लक्षांत आलेली दिसत नाही. खेडी संघर्षात उतरतील तेव्हा ती आपसातल्या संघर्षाने तुटण्याचा संभवच अधिक आहे. म्हणून शहरा-विरुद्ध भांडण्याची शक्ति खेड्यांमध्ये उरणारच नाही. तेव्हा, खेड्यातील लोकां-मधले आपसातले सहकार्य सिद्ध करता आले पाहिजे. कोणतीही किंमत देऊन का होईना पण खेड्यांनी त्यांची एकरसता सिद्ध केली पाहिजे. यासाठी नव्या जाणिवेचा, क्रांतीची नवी व्यूहरचना (स्ट्रॅटेजी) समजणारा कार्यकर्त्यांचा वर्ग या देशात उभा झाला पाहिजे. आजची भारतीय व्यवस्था तुटण्याच्या स्थितीत याची अत्यंत गरज आहे. खेड्यांची स्वयंपूर्ण नवरचना केली तर देशातली कोणतीही व्यवस्था तुटून पडली तरी देश तुटणार नाही. या देशातला माणूस तुटणार नाही. समाजजीवन विस्कटून जाणार नाही. माझ्या या पुस्तकात या बाबतीतले संकेत अनेक ठिकाणी पाहावयास मिळतील. राष्ट्रीय नियोजनाचा दृष्टिकोन काय असावा हे सांगण्यासाठीही मी चर्चा केलेली आहे. ती देशाच्या नव्या संदर्भात लक्षात घेणे तर जरुरीचेच

झाले आहे. राष्ट्रीय संरक्षण हे ग्रामीण नवरचनेच्या प्रेरणेतूनच प्रगट होणार आहे. म्हणून खेड्यांच्या क्रांतिकारी स्वरूपावरच राष्ट्रीय संरक्षणाचे स्वरूप निश्चित केले जाऊ शकेल. या दृष्टीने पुस्तकात मी केलेली चर्चा महत्वाची मानली जाऊ शकेल याचा मला भरवसा वाटतो. पुस्तकातल्या माझ्या विचारांचा किंवा चिंतनाचा मगदूर वाचकांनीच ठरवायचा आहे. तेव्हां त्याची काहीच चर्चा न करता वाचकांवरच पुढचे सर्व सोपविणे मी उपयुक्त मानतो.

लेखनाच्या दृष्टीने थोडेसेच सांगून हे निवेदन संपवायचे आहे. यातले काही लेखन प्राज्ञ पाठशाळेच्या 'नवभारत' मासिकातून, तसेच रामकृष्ण मिशन नागपूरच्या 'जीवन विकास' मासिकातून प्रसिद्ध झाले आहे. तसेच नागपूरच्या 'तरुण भारत,' वर्ध्याच्या साप्ताहिक 'साम्ययोगात' व मुंबईच्या 'सर्वोदय–साधने' तूनही कांही लेखन प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व संपादकांचा मी अत्यंत आभारी आहे. काही लेखन केवळ या पुस्तकांसाठीच लिहिलेले आहे. हे माझे लेखन एकत्र करून पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्याचा आग्रह माझ्या मित्रांनी मला अनेकदा केला होता. पण चळवळींचे काम करून पुस्तकाचे संपादन करणे मला शक्य नव्हते. पण माझी पत्नी सौ. वनिता चंदावार माझे सर्व लेखन सांभाळून होती व तिला पुस्तक प्रसिद्ध व्हावे असे सारखे वाटत होते. श्री. श्रीपाद केळकर व सौ. इंदुमति केळकर यांची भेट घेऊन सौ. वनितांनी त्यांना माझे सर्व लेखन दाखविले. श्री. केळकरांनी माझे लेखन आस्थेने वाचून काढले व माझ्या पुस्तकाचे संपादन करण्याचेही ठरविले. त्यांनीच प्रकाशनाची व्यवस्थाही केली. तेव्हां, हे माझे पुस्तक सौ. वनिता चंदावार हिच्या सदिच्छेमुळे व केळकर दंपतीच्या तिला मिळालेल्या प्रोत्साहनामुळे आज प्रसिद्ध होत आहे. पण त्याला सहाय्यक झाले प्रकाशक श्री. गोपाळ मोकाशी व महाराष्ट्रातल्या खादी कार्यातले निष्ठावंत अग्रणी श्री. बाबूराव सोवनी हे दोघे. या सर्वांच्या आस्थेतून हे माझे पुस्तक वाचकांच्या हातात पडत आहे. रुचि प्रकाशनच्या आणि रचना मुद्रणालयांतल्या सर्व मित्रांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. त्यांनी त्यांची जबाबदारी कौशल्याने पार पाडली आहे. माझे सर्वांना नम्र अभिवादन.

**–बाबुराव चंदावार**

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १८०२५

## स्वातंत्र्य : एक अबाधित सत्य

" आणि एखाद्या जुलमी राजाला तुम्ही पदच्युत करू इच्छित असाल, तर प्रथम आपल्या अंतःकरणात उभविलेले त्याचे सिंहासन नष्ट झाले आहे, हे बघा. कारण जर प्रजेच्या स्वतःच्याच स्वातंत्र्याच्या कल्पनेत जुलमाला आणि स्वाभिमानात लज्जेला स्थान नसेल, तर अशा स्वतंत्र आणि स्वाभिमानी प्रजेवर राजा राज्य कसे करू शकेल ? "

—खलील जिब्रान.

कुटुंब व सामाजिक जीवन जगण्याची आकांक्षा माणसात निर्माण झाली तेव्हा, स्वातंत्र्याच्या रक्षणाचीच निकड त्याला अधिक वाटली असावी. कारण ' आदि मानव ' स्थिती एकापरी स्वातंत्र्याचीच होती तरी कुटुंब व सामाजिक जीवन सुरक्षित करण्याकरिता जी मूल्ये जरूरीची होती ती ' आदि मानव ' स्थितीतल्या

स्वातंत्र्यातून निर्माण होऊ शकली नाहीत, सबब मनुष्य अथवा समाजाच्या विकासात स्वातंत्र्य सुरक्षित करणाऱ्या मूल्यांची आवश्यकता जाणवू लागली. तात्पर्य, विकासात स्वातंत्र्याचे स्थान व महत्व निश्चित करण्याची व टिकविण्याची जरूरी वाटू लागली.

मनुष्य, समाज व कुटुंब करून राहू लागला व प्रगतीची वाट धरली. पण, जसजशी प्रगती होऊ लागली तसतशी भौतिकतेमुळे लोभवृत्तीही वाढली. आणि जीवनात भौतिकतेचा प्रवेश अनियंत्रितपणे झाल्यामुळे मनुष्यजीवनाला अनियंत्रित भोगमयतेचा विकार जडला. याच भोगमयतेच्या विकारामुळे स्वातंत्र्याचे स्थान आणि महत्त्व मनुष्य व समाजाच्या जाणिवेतून निसटत चालल्याची स्थिति निर्माण होऊ लागली. या स्थितीच्या परिणामातून माणसाला पारतंत्र्याचे जीवन जगणे क्रमप्राप्त झाले. मनुष्य शासनाधीन झाला. शास्ते निर्माण झाले. शास्त्यांच्या कल्पनाच जीवनविकासाच्या कल्पना ठरल्या. मानवी इतिहासात शास्त्यांचा काळच सर्वात मोठा काळ असावा असे वाटते. स्वातंत्र्याच्या उर्मि शास्त्यांनी दाबून टाकल्या म्हणण्यापेक्षा समाजाच्या भोगमय जीवनकल्पनेमुळेच त्या दाबल्या गेल्या हे म्हणणेच जास्त संयुक्तिक होईल.

शास्त्यांचा काळ कितीही मोठा प्रभावी ठरला म्हटले, तरी ज्या मूळ कल्पनेने मनुष्य समाजजीवनात प्रविष्ट झाला, ती मूळ कल्पना किंवा त्याची स्वातंत्र्याची आकांक्षा कोणत्याही भोगमयतेमुळे किंवा शासनपद्धतीमुळे पुसून जाणारी नव्हती. कारण स्वातंत्र्याची जाणीव अथवा उर्मि ही माणसाच्या वैचारिक वैशिष्ट्यांची देणगी आहे. मनुष्याची स्वातंत्र्याची जाणीव (माणसाचे) वैचारिक वैशिष्ट्य आहे तोवर तरी नष्ट होणे शक्य नाही. याच कारणास्तव भोगमयतेच्या विकारामुळे शासन व शास्त्यांचा गुलाम झालेला माणूसही क्रांतिप्रवण झाला. पारतंत्र्याची बंधने तोडली. सुरुवातीला हिंसक स्वरूपातही पण स्वातंत्र्याकरिताच माणसाने धडपड सुरू केली. या धडपडीची राजकीय किंवा सामाजिक क्रांत्यांच्या रूपात इतिहासात नोंद झालेली आहे व पुढेही ही धडपड हिंसक अथवा अहिंसक पद्धतीने होत राहील यात शंका नसावी.

स्वातंत्र्याचे संग्राम होत राहतील व ते स्वातंत्र्याच्या जाणीवेनेच होत राहतील-तरी समाजजीवनात स्वातंत्र्याचे स्थान अबाधित करण्याचा प्रश्न सदासर्वकाळ कायमच राहील असे वाटते. कारण, नव्या संदर्भात स्वातंत्र्याचे स्थान आणि महत्व टिकविण्याचा प्रश्न नव्या रूपात नेहमीच उभा राहील. अशा प्रश्नाच्या

दृष्टीने नवी जाणीव सतत निर्माण होत राहावी लागेल. तरी स्वातंत्र्याची अभिव्यक्ति, स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति व स्वातंत्र्याचे रक्षण या सर्वसामान्य जाणीवेचा उद्भव समाजजीवनात निष्कलंकपणे होत राहणे अनिवार्य आहे. अर्थात या जाणिवेचा उद्भव कसा होईल हा खरोखरी चिंतनाचा विषय आहे.

स्वातंत्र्य हे अबाधित सत्य आहे. स्वातंत्र्याचा हक्क हा माणसाचा एक पवित्र हक्क आहे. म्हणून तो माणसाला मिळावा या विषयी तर्काची जरूरी नाही. स्वातंत्र्य तर्कातीत आहे. अबाधित सत्य आहे. पण, अभिव्यक्तीचा प्रश्न जेव्हा निर्माण होतो, तेव्हा स्वातंत्र्याचे अबाधित सत्य व तर्कातीत स्वरूप आम्हाला हवे त्या प्रमाणात स्पष्ट झालेले नाही हेच सिद्ध होते. आणि ही स्थिती आजची नाही. अनंत काळापासून चालत आलेली आहे. शिवाय या स्थितिपार मनुष्य किंवा मानवी समाज होईल किंवा नाही हेही सांगणे कठीण आहे. पण मानवी समाजाची आजवर झालेली प्रगती ही स्थिति पार करण्याच्या दृष्टीला थोडी तरी धरूनच आहे, हे नाकबूल करता येत नाही. ( अर्थात या दृष्टीतली सर्वेकषता व परिणामकारकता निरीक्षिली पाहिजे. )

आजवरची प्रगति स्वातंत्र्याचे स्वरूप स्पष्ट करण्याच्या दृष्टीला धरून आहे हे जरी गृहित धरले तरी स्वातंत्र्याच्या निश्चित स्वरूपाकडे जाता येईल अशी गति या दृष्टीला होती किंवा आहेच असे निश्चयाने म्हणता येत नाही. म्हणून स्वातंत्र्याचे अबाधित आणि तर्कातीत सत्य स्वरूप स्पष्ट व्हावे अशा गतिमानतेची जाणीव यापुढे अनिवार्य होऊन बसलेली आहे. अर्थात ज्याला आपण प्रगति म्हणतो ती निव्वळ (काळाधीन) कालगति असून चालणार नाही. काळालाही धक्का देणारी टरायला हवी. काळानुरूप होणारी प्रगति किंवा काळालाच गति दिल्याने होणारी प्रगति या दोहोत मूलभूत स्वरूपाचे अंतर आहे. हे अंतर लक्षात येण्याचे दृष्टीने किंवा स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून ‘ क्रांती ’ या शब्दाचा वापर केल्यास योग्य होईल. ‘ क्रांती ’या शब्दाला राजकीय परिवर्तनाच्या क्षेत्रातच आजवर प्रामुख्याने उपयोगात आणले गेले म्हणून तो शब्दही अत्यंत मर्यादित अर्थाने बद्ध झाला. तरी पण ‘ जीवनक्रांती ’ वगैरे शब्दांचा अलिकडे वापर होऊ लागला आहे. म्हणून ‘ क्रांती ’ शब्द व्यापक अर्थानेही उपयोगात आणला जाणे संयुक्तिक मानले जाते, हे सिद्ध होत आहे. क्रांतीचा व्यापक व सर्वस्पर्शी अर्थ मूल्यपरिवर्तन असा करणे सर्व दृष्टीने योग्य होईल, म्हणून कालगति आणि काळालाच गति दिल्याने होणारी प्रगति यातला मूलभूत स्वरूपाचा फरक लक्षात घेण्याकरिता मूल्यपरिवर्तन असा व्यापक अर्थ असलेला ‘ क्रांती ’ शब्द वापरणेच योग्य आहे.

कालगति आणि क्रांती या दोन गोष्टी अनुक्रमे विकास आणि परिवर्तन यातला भेद उलगडणाऱ्या आहेत. विकास म्हणजे कालानुरूप होणारी जाणीवशून्य वाढ आणि परिवर्तन म्हणजे काळावर मात करून होणारी जाणीवयुक्त वाढ. मानवी जीवनात स्वातंत्र्याचे अबाधित आणि तर्कातीत सत्य स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून काळाला गति देणाऱ्या मूल्यपरिवर्तनाच्या क्रांतीचीच खरी गरज आहे.

तात्पय, स्वातंत्र्याची अभिव्यक्ति मूल्यपरिवर्तनाच्या क्रांतीतूनच शक्य आहे. कालबाधीत मूल्ये ही जीवनात स्वातंत्र्याच्या हक्कप्राप्तिकरिता कधीच उपयोगी ठरत नाहीत. कारण, कालबाधीत मूल्ये स्वातंत्र्याला मर्यादा पाडण्याच्या स्वभावाची असतात. अर्थात, स्वातंत्र्याची अभिव्यक्ति मूल्यपरिवर्तनाच्या क्रांतीतूनच शक्य आहे.

मनुष्याचे सामाजिक जीवन सुरक्षित करण्याकरिताच स्वातंत्र्याच्या मूल्य निर्मितीची गरज असते. आणि ही गरज पुरी करण्याचे सातत्यही टिकवून धरावे लागते. समाजजीवन सहजीवनाने समृद्ध होते. अर्थात समाज-जीवनाची उपयुक्तता सहजीवनाच्या विशिष्ट पातळीतून सिद्ध केली जाते. तेव्हा, सहजीवनात व्यक्तीच्या स्वातंत्र्याची (समानतऱ्हेने व विकासशील) जपणूक होत असलेला मानवी व्यवहार चालावा लागतो. या व्यवहारातून समाजजीवनाची अशी पातळी निर्माण होईल की व्यक्तीच्या स्वातंत्र्याची योग्य तऱ्हेने जपणूक होत राहून समाजजीवनाची उपयुक्तताही पण सिद्ध होईल.

तात्पर्य व्यक्तीच्या स्वातंत्र्याची योग्य जपणूक होऊन, सहजीवनातून समाजजीवन समृद्ध करण्याच्या व्यवहारातून स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिती होत राहते आणि ही निर्मिति मंदावली की समाजजीवनात समृद्धीचा काल लांबणीवर पडतो. किंबहुना ही निर्मिति होणारच नसली तर समाजजीवनाच्या समृद्धीची आशाही करणे कठीण जाते.

सहजीवनातून समाजजीवन समृद्ध करण्याचा व्यवहार पुष्कळ बाबतीत शिक्षणा-वर अवलंबून असतो. अर्थात शिक्षणाचा अर्थ या ठिकाणी जीवन-शिक्षण असा आहे. जीवनाची उपयुक्तता व सार्थकता कळण्याइतपत मनुष्य विचारशील झाला की सहजीवनाचा व्यवहार हा समाजजीवन समृद्ध करण्याकरिताच होतो. पण, अशा शिक्षणाला संधी असावी म्हणून मनुष्यजीवनाच्या भवितव्याविषयीची योग्य

जाणीव बाळगणाऱ्या प्रभावी नेतृत्वाची नेहमीच गरज असते. अशा नेतृत्वाची निर्मिति होत रहावी लागते.

समाजजीवनाच्या समृद्धीची कल्पना ती हीच की, अधिकाधिक शांततामय सहजीवनाचा अनुभव प्रत्येक व्यक्तीला घेता येत आहे हे दिसावे. अर्थात शांततामय सहजीवनाचा अनुभव ज्ञानयुक्त जीवनव्यवहारातूनच शक्य होतो. शांति मनाचा स्वभाव झाला पाहीजे. शिवाय माणसाची शांततेच्या दृष्टीने सक्रियताही वाढली पाहिजे. निष्क्रियता ही शांततेचे लक्षण मानता येईल, पण त्याने समाजजीवनाच्या समृद्धीचा व स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीचा मार्ग चालता येणार नाही. शांति स्वतःकरिता उपयोगी व्हावीच, शिवाय ती दुसऱ्याला प्रेरणादायीही असावी. सहजीवनातून समाजजीवन समृद्ध करण्याचा व्यवहार जीवनात अधिकाधिक प्रेरक शांति आणू शकला की स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति अबाधीत रूपात होत आहे, व समाजजीवन अधिकाधिक सुरक्षित व समृद्ध होत आहे असे मानावे.

तात्पर्य, स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीचा प्रश्न व्यक्तीची मनोरचना व समाजरचना शांततामय सहजीवनाला अनुकूल करण्याचा प्रश्न आहे.

स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीतच स्वातंत्र्याच्या रक्षणाची बीजे आहेत, प्रेरक शांतीतून निर्माण झालेल्या सहजीवनाची अबाधितताच स्वातंत्र्याची प्रतिकारक्षमता आहे. तेव्हा, स्वातंत्र्याची सुरक्षितता ही स्वतंत्र प्रवृत्ति म्हणून मानली जाऊ शकत नाही. व्यक्ती अथवा समाज-जीवनात स्वातंत्र्य रक्षणाकरिता स्वतंत्रपणे योजना करण्याची जरूरी नसते. जेव्हा, तशी जरूरी वाटेल तेव्हा स्वातंत्र्याची उपासनाच सदोष पद्धतीची आहे असे मानावे लागते. स्वतःच्या अंतःकरणात जुल्माला स्थान नसेल तर कोणत्याही जुल्माचा परिणाम स्वातंत्र्याच्या उपासकावर होणार नाही. आवश्यक तेव्हा स्वातंत्र्याची वाट मृत्यूच्या दारातूनही जाईल. पण त्यामुळे स्वातंत्र्याच्या उपासकाला जुल्माचे मूल्य वाटणार नाही. जुल्माचे अवमूल्यन करून ज्यांनी स्वातंत्र्याची ज्योत सदैव अंतःकरणात तेवत ठेवली त्या व्यक्ती मानवजातीचे भवितव्य उज्ज्वल करणाऱ्या होत्या. त्यांनी ज्या जुल्माचे अवमूल्यन केले तो जुल्म मात्र अप्रतिष्ठित व मूल्यरहित ठरला. तेव्हा, स्वातंत्र्याचे रक्षण जुलमाची अप्रतिष्ठा व अवमूल्यनात आजवर झालेले आहे व पुढेही होत राहील. जुल्माचे अवमूल्यन व अप्रतिष्ठा होत असल्याचे ( प्रेरक शांतीतून निर्माण झालेल्या ) सहजीवनातून ठरून त्याचा समाजजीवनावरहि परिणाम होत असल्याचे

दिसू लागल्यास समाजजीवनात स्वातंत्र्याच्या रक्षणाच्या दृष्टीने प्रतिकार-क्षमता आलेली आहे, असे सहजच ठरून जाते.

स्वातंत्र्याची अभिव्यक्ति, स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति व स्वातंत्र्याचे रक्षण या तीनही गोष्टी मनुष्याचे समाजजीवन सुरक्षित, प्रतिष्ठित व प्रेरक असावे या करिता जरूरीच्या आहेत. तेव्हा, ही जरूरी लक्षात घेता माणसाची वृत्ति त्या दृष्टीने अधिकाधिक अनुकूल व्हावी, एवढेच नव्हे तर तिची समरसताही वाढावी याचीच सदैव जागरूकता ठेवावी लागते. म्हणून अशा वृत्तीची निर्मिति हीच समाजजीवनाची प्रवृत्ति ठरते.

● ● ●

## लोकशाही : एक प्रवृत्ति एक व्यवस्था

मानवी स्वातंत्र्याची जोपासना व वृद्धि लोकशाहीत होते असा आजचा समज आहे व तो बराच प्रतिष्ठित आहे. लोकशाहीची अभिव्यक्ति म्हणजेहि मानवी स्वातंत्र्याची जपणूक व वृद्धि मानली जाते. पण, सद्यःस्थितीत लोकशाही ही एक व्यवस्था आहे. ती जशी राजकीय आहे तशीच ती सामाजिक व आर्थिकहि असू शकते. म्हणून यापैकी कोणतीहि व्यवस्था माणसाच्या स्वयंप्रेरणेतून निर्माण झालेलीच असते असे नव्हे. पुष्कळ वेळा काही व्यक्तींच्या मतांना व वृत्तींना मुरड देऊनहि ही व्यवस्था निर्माण केली जाते. म्हणून लोकशाहीत बहुमताचे महत्व आहे. याचमुळे लोकशाही सर्वांच्या स्वातंत्र्याची जपणूक करण्यास नेहमीच समर्थ असू शकत नाही पण, लोकशाहीची वृत्ति लोकशाही व्यवस्थेहून भिन्न आणि श्रेष्ठ आहे. कारण, लोकशाहीच्या वृत्तींत सहिष्णुतेचा गुण असतो. असा

गुण लोकशाही व्यवस्थेचा असलाच पाहिजे असे नाही. अधिकांत अधिक लोकांच्या हिताची कल्पना लोकशाही व्यवस्थेत गृहीत असल्यामुळे अल्पमताची गळचेपीहि संभवते. पण, लोकशाहीच्या वृत्तीत याचा संभव कमी. कारण, लोकशाहीची वृत्ति दुसऱ्याच्या मानवी हक्काची कबुली देते. स्वतःच्या स्वातंत्र्याइतकीच दुसऱ्याच्या स्वातंत्र्याची जाण लोकशाहीच्या वृत्तींत अधिक असते. लोकशाही व्यवस्थेत अशी जाण नसूहि शकते. कारण लोकशाही व्यवस्था ही संस्थामूलक आहे. संस्थेचे निर्णय बहुसंख्येचे हितसंबंध सुरक्षित करण्याच्या भावनेतले असतील. म्हणून हे निर्णय कांही वेळा अल्पसंख्येला अन्यायकारकहि ठरू शकतात. पण लोकशाही वृत्तीचें तसें नाही. लोकशाही वृत्ति ही व्यक्तिमूलक आहे. व्यक्तीच्या जीवनांत मानवी गुणांची वृद्धि या वृत्तीमुळे होऊं शकते. ‘ एकस्तथा सर्वभूतांतरात्मा ’ या जाणिवेचा परिपोष होणे या लोकशाही वृत्तीमुळे शक्य आहे.

तात्पर्य, लोकशाही व्यवस्था आणि लोकशाहीची वृत्ति या दोहोतला फरक लक्षांत घेता मानवी गुणांची वाढ करणे लोकशाहीच्या वृत्तीमुळेच शक्य आहे असे दिसून येईल. लोकशाही व्यवस्थेतून मानवी गुणांची गळचेपीहि होऊं शकते. कारण, लोकशाही व्यवस्था बहुमताच्या निर्णयावर आधारित असते व हे बहुमत पुष्कळ वेळा आंधळेहि असू शकते. आंधळ्या बहुमताने जे निर्णय होतील ते मानवी गुणांच्या विरहित असतील. म्हणून लोकशाही व्यवस्था लोकशाहीच्या वृत्तीविना मानवी हिताची ठरत नाही. लोकशाहीची वृत्ति वाढविण्यास जिथे संधि असेल, किंवा अशी संधि निर्माण करण्याची ज्या लोकशाही व्यवस्थेत तरतूद असेल ती व्यवस्था मानवी गुणांची प्रतिष्ठा वाढवू शकते. अन्यथा मानवेतर गुणांची वाढ झाल्याचें प्रत्ययास येईल.

मानवी गुणवृद्धि हा मानवी विकासाचा मूळ पाया आहे. विकास म्हणजे तरी मानवी गुणविकासच ! म्हणून मानवी गुणांची वेचणी मानवी चित्ताच्या ठायी व्हावी लागते. मानवी चित्त मानवी गुण वेचून घेण्याइतपत एकाग्र असावें लागेल. चित्ताची एकाग्रता निरनिराळ्या कारणांमुळे होते. पण, मानवी गुण-संचयाचें कारण प्रमुख असावें लागेल. मानवी गुणांचा संचय अथवा गुणवृद्धि मानवी चित्ताचें प्रमुख आकर्षण व्हावें. आणि हे आकर्षण मानवी चित्ताला असले तरच मानवी भवितव्याची सुरक्षितताहि असेल. मानवी भवितव्याची सुरक्षितता ही खरी मानवी अस्तित्वाची व संस्कृतीची सुरक्षितता होय. म्हणून मानवी गुणवत्ता ही मानवी अस्तित्वाची किंवा सहअस्तित्वाची गुणवत्ता ठरते. मानवी गुण मानवी अस्तित्वाचे तसेच सहअस्तित्वाचे गुण

आहेत. मानव जगावा याचें एक महत्व आहेच पण त्याहिपेक्षा मानव मानवी गुणांसह जगावा यात मानवी अस्तित्वाचें खरेखुरे प्रयोजन आहे. सृष्टींतल्या इतर वस्तूंपेक्षा अथवा प्राणिमात्रापेक्षा माणसाचा वेगळेपणा हाच की; मानवाचें अस्तित्व मानवी गुणांकरिता प्रयोजनकारी आहे आणि वस्तूंचें अथवा प्राण्यांचें अस्तित्व मानवाकरिता प्रयोजनकारी आहे. अर्थात वस्तूंचें अथवा मानवेतर प्राण्यांचें अस्तित्व मानवी सुख-समृद्धीकरिता आहे.

तात्पर्य, मानवी गुणवृद्धि हे मानवी चित्ताचें प्रमुख आकर्षण असावें. कारण यामुळे मानवी अस्तित्वाचें अथवा सहअस्तित्वाचें प्रयोजन सिद्ध करतां येते. मानवी सहअस्तित्वाची कल्पना ही मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाची कल्पना आहे. म्हणून मानवी संस्कृतीला आड येणारी प्रवृत्ति ही गुणनाशक प्रवृत्ति होय. तेव्हा, मानवी संस्कृतीला पोषक व पूरक अशा सुखसमृद्धीची कल्पना हीच खरी मानवी विकासाची कल्पना ठरूं शकते. म्हणून मानवी विकासाला व सहअस्तित्वाला उत्तेजन ज्या वृत्तीमुळे मिळेल ती वृत्तिच उपकारक मानावी. लोकशाहीची वृत्ति ही एक अशीच वृत्ति आहे. कारण, सहअस्तित्वाची जाणीव तींत आहे. सहअस्तित्वाच्या जाणिवेमुळेच लोकशाहीची वृत्ति मानवी चित्ताचें आकर्षण ठरूं शकते.

मानवी गुण आणि लोकशाही वृत्ति यांचा परस्पर संबंध जसा सहअस्तित्व व मानवी विकास यांकरिता आहे, तसाच तो (संबंध) समाजाभिमुखहि असावा लागतो. म्हणून लोकशाही वृत्ति ही केवळ व्यक्तीचीच अभिव्यक्ति न ठरतां ती समाजाचीहि अभिव्यक्ति ठरण्याची गरज आहे. लोकशाहीची वृत्ति समाजाची अभिव्यक्ति ठरायची तर समाजाचें चित्तहि गुणाकडे आकर्षित व्हावे लागेल. लोकशाहीची वृत्ति आणि मानवी गुण यांचा सुमेळ व्यक्तीच्या जीवनांत जसा दिसतो, तसा सुमेळ सामाजिक जीवनांत दिसत नाही हीच खरी आजची अडचण आहे. पण, याची कारणेंहि शोधावी लागतील. लोकशाही वृत्ति असण्याऐवजी लोकशाही ही केवळ व्यवस्था म्हणून समाजानें स्वीकारल्यावर लोकशाहीच्या वृत्तिचें फलित खरोखरी मिळणार नाही, हे उघड आहे. कारण आजची लोकशाही व्यवस्था ही राज्य, अर्थ व समाज यांच्या स्थितीची प्रेरणा आहे. लोकशाही ही सामाजिक वृत्तीच्या स्थानी विराजमान झालेली नाही. राज्य, अर्थ व समाज यांच्या सोयीची व्यवस्था म्हणून लोकशाही स्वीकारली गेली. लोकशाहीच्या वृत्तीची अनिवार्यता

पटलेली आहे म्हणून लोकशाहीची व्यवस्था स्थिर झाली वा होते, असें कुठेंच दिसत नाही. म्हणून राज्यवादी, अर्थवादी आणि समाजवादी लोकशाही ही सह-अस्तित्वाच्या किंवा गुणवत्तेच्या जाणिवेंची असू शकेल याची कांहीएक खात्री देतां येत नाही. उलट अशा लोकशाहीतून विकृत प्रेरणाहि जन्माला येऊं शकतात, व त्या मानवी सहअस्तित्वाला व गुणवत्तेला बाधक ठरतात.

तात्पर्य, लोकशाही ही राज्य, अर्थ व समाज यांची प्रेरणा असून चालणार नाही; लोकशाही ही मानवी सहअस्तित्वाची व मानवी गुणांची प्रेरणा असावी लागेल व यांतूनच लोकशाहीची वृत्ति समाजाभिमुख करण्याचा मार्गहि शोधतां येईल.

व्यक्तीच्या जीवनांत लोकशाहीच्या वृत्तीची प्रेरणा असली तरी ती समाजाची प्रेरणा ठरत नाही हा सर्वसाधारण अनुभव आहे. म्हणून लोकशाहीची वृत्ति ही सामाजिक प्रेरणा कशी ठरेल हा एक चिंतनाचा विषय ठरतो. लोकशाहीची वृत्ति ही सामाजिक प्रेरणा ठरली की ती वृत्ति समाजाभिमुख झाली असें मानावें. पण, लोकशाहीची वृत्ति सामाजिक प्रेरणा ठरायची तर समाजाच्या विशिष्ट शिक्षणाची जरूरी भासेल. यालाच लोकशाही वृत्तीचें लोकशिक्षण म्हणावे. या लोक-शिक्षणांत मानवी गुणसमृद्धीच्या कल्पना या मुळांत जरूरीच्या मानून सामाजिक-व्यवहार व्हावा लागेल. समाजजीवनाची रचनाच मुळी मानवी-गुण समृद्धीच्या तत्वावर करावी लागेल. मानवी-गुण समृद्धीचें तत्व हें मानवी सहअस्तित्वाचेंच तत्त्व आहे. या तत्वानें संस्कारित असें सामाजिक मन तयार व्हावें लागेल. म्हणून मनुष्याच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक गरजांना सहअस्तित्वाच्या अंकुशांत ठेवण्याची गरज असेल. कारण आर्थिक, राजकीय व सामाजिक गरजांचा प्रभाव मानवी गुणांच्या व सहअस्तित्वाच्या विपरीतहि असतो. म्हणून आर्थिक, राजकीय व सामाजिक गरजांचा स्वतःचा प्रभाव असणे सहअस्तित्वाच्या दृष्टीने गैर आहे. सहअस्तित्वाच्या प्रभावानेंच या गरजा प्रकाशित असाव्या लागतील. सूर्याच्या प्रकाशानें सर्व ग्रह प्रकाशतात तशी मूळ प्रभावाची प्रकाशमान शक्ति सहअस्तित्वाचें तत्त्व असावें लागेल. या तत्वाच्या प्रभावी प्रकाशांत राजकीय, सामाजिक, आर्थिक किंवा भौतिक गरजा प्रकाशमान होऊं शकल्या तर ते धोक्याचें नाही. मग त्या गरजा विपरीत परिणामकारीहि ठरूं शकणार नाहीत.

भौतिक किंवा आर्थिक, राजकीय आणि सामाजिक गरजा अपरिहार्य जरी मानल्या तरी या गरजा म्हणजे कांही मूळ मानवी सुख-समृद्धीच्या गरजा नव्हेत.

कारण, या गरजा मानवी विकारांना प्रेरणाहि देतात. जीवनांत त्यांचा समतोल साधता आला नाही तर जीवन कलहग्रस्त होतें. वृत्तींना नको त्या दिशेला लावणाऱ्या या गरजा पुष्कळा वेळ मानवी जीवनाचें प्रयोजक मूल्यहि विसरायला लावतात. युध्दादि मानवी संहाराच्या कल्पना व वस्तुस्थिति या गरजांच्या विकारवशतेची पुरेपूर कल्पना देऊं शकतात. किंवा आर्थिक गरजांचे भौतिक स्तोम माजवून, आर्थिक समानतेच्या आड्न एकाधिकारशाहीची जोपासना करीत मानवी स्वातंत्र्याला बंधनकारक राजकीय व सामाजिक स्थिति निर्माण केली जाते त्यावेळी या गरजांचा मानवेतर भेसूर स्वभाव जाणवतो व नकोसा होतो.

तात्पर्य, लोकशाहीची वृत्ति सामाजिक प्रेरणा ठरावी म्हणून करावयाचा उपाय भौतिक किंवा आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक गरजांच्या प्रभावांतला नसावा. मानवी सहअस्तित्व या तत्वाच्या प्रभावांतला हा उपाय असावा. कारण, सह-अस्तित्वाच्या तत्वामुळे मानवी गुणांची वृद्धि होते. भौतिक किंवा आर्थिक आणि सामाजिक तसेंच राजकीय गरजांच्या प्रभावामुळे मानवी गुणांची गळचेपी होते. म्हणून या गरजांचा प्रभाव मानवी विकासाची खरीखुरी चित्तवृत्ति जाळून टाकतो. मानवी विकासाची चित्तवृत्ति सहअस्तित्वाच्या तत्त्वामुळे अबाधित राहते व मानवी जीवन-विकासाची संधि स्थिर होते. म्हणून लोकशाहीची वृत्ति ही मानवी विकासाची चित्तवृत्ति ठरायची तर सहअस्तित्वाचें तत्व ही लोकशाही वृत्तीची मूळ प्रेरणा असावी लागेल.

• • •

## सामाजिक विकासाची प्रेरणा कोणती ?

समाजजीवनाची बदलती स्थिति ही आकर्षक असल्यामुळे ती विकासाची आहे असा आमचा समज होतो. पण, समाजजीवनाची बदलती स्थिति ही मानवी मूल्यांशीं सुसंगत आहे किंवा काय याचा फारच थोडा विचार केला जातो. समाजजीवनाची बदलती स्थिति मानवी मूल्यांशीं सुसंगत असावी याचा आग्रहहि नसल्यासारखाच दिसतो. यामुळे, मानवी मूल्यरहित समाजजीवनाची निर्माण होणारी स्थिति आकर्षक जरी वाटते तरी ती विकासाची स्थिति आहे असें म्हणणें चुकीचेंच होईल. आजची दर क्षणी बदलणारी स्थिति व तिचा वाढता प्रभाव मानवी मूल्यांशी किती सुसंगत आहे, असल्यास तिच्या मूलतत्त्वाचा विकासाशी संबंध काय, किंवा ही स्थिति मानवी मूल्यांशीं सुसंगत नसल्यास तिच्या विकृततत्वाचें पोषण कोणत्या कारणामुळे होतें इत्यादि बाबींचा विचार करणें अगत्याचे झालें आहे.

आजची विकासविषयक कल्पना व तिच्याशीं निगडित असणारे तत्त्व किंवा या विकासविषयक कल्पनेची मूळ प्रेरणा तपासून तिच्या मानवी विकासाच्या प्रामाणिकतेविषयी खात्री पटावी लागेल. कारण, मानवी विकासाची प्रामाणिक स्थिति ही तिच्या प्रेरणेमुळेच सिद्ध होऊं शकते. म्हणून आजची दर क्षणीं बदलणारी स्थिति ही या मूळ प्रेरणेंतून निर्माण होते काय व निर्माण होत असल्यास ही बदलणारी स्थिति निश्चितपणें विकासाचीच मानतां येईल काय, असे प्रश्न सहजच निर्माण होतात व हे प्रश्न अजूनतरी अनिर्णीत आहेत. या प्रश्नांचा निर्णय लावण्याची मनोभूमिका पुरेशी तयार व्हावी लागेल व ही मनोभूमिका तयार होण्यास अधिक अवधि देणेहि चुकीचें होईल. कारण, जसजसा अवधि जाईल तसतसें या प्रश्नांचें स्वरूप अधिकाधिक गुंतागुंतीचें होईल. आजसुद्धा या प्रश्नांचें स्वरूप पुष्कळ प्रमाणांत गुंतागुंतीचें आहे. अर्थात या गुंतागुंतीचें स्वरूप कांहीसे सैल करावयाचें म्हटल्यास त्या दृष्टीने पुरेशी जाणीव तयार करावी लागेल.

तात्पर्य, समाजजीवनाची बदलती स्थिति ही विकासाचीच स्थिति होय हें निश्चित करतां येत नाही. म्हणून क्षणोक्षणीं बदलणाऱ्या स्थितीची प्रेरणा तपासणे जरूरीचें आहे. म्हणजे मानवी विकासाशीं प्रामाणिक अशा सामाजिक बदलाची किंवा परिवर्तनाची स्थिति ज्यांमुळे निर्माण होईल अशा प्रेरणा कितपत कार्यरत आहेत; त्या नसल्यास कार्यरत कशा होतील या प्रश्नांचा निश्चयाने व जाणीवपूर्वक मागोवा घ्यावा लागेल.

सामाजिक बदलाचा एक भरीव व प्रेरणादायी आशय लोकशाही व्यवस्थेंत अंतर्भूत आहे असा समज आहे. आणि हा समज निःसंशय स्थितींत असल्याचा कित्येकांचा दावाहि आहे. पण, लोकशाही व्यवस्था ही उचित सामाजिक बदलाची किंवा परिवर्तनाची प्रेरणा आहे असें म्हटल्यास या व्यवस्थेंत विकासाच्या मानवी मूल्यांची बूज कितपत राखली जाते हेंहि लक्षांत घ्यावें लागेल. आजवर लोकशाही व्यवस्थेंत या दृष्टीने काळजी घेतली गेली नाही, किंवा जात नाही, अशी सर्वसामान्य स्थिति आहे. म्हणून लोकशाही व्यवस्था (उचित) समाजपरिवर्तनाची व विकासाची प्रेरणा ठरते हें म्हणणें तितकेसें खरें नाही

लोकशाहीचें महत्त्व मानवी मूल्यांच्या सुरक्षिततेकरिता आहे हें जरी वारंवार सांगितले जाते तरी लोकशाहीमुळे मानवी मूल्यें सुरक्षित होतील अशी समाजस्थिति निर्माण होऊं शकली नाही, हेंहि नाकारतां येत नाही. कारण, लोकशाही ही राज्यव्यवस्थेच्या रूपांतच प्रकट झाली, ती समाजरचनेच्या रूपांत

कधीच प्रगट झाली नाही व लोकशाही ही समाजरचनेच्या रूपांत प्रकट न झाल्यामुळे तिची मानवी विकासाच्या दृष्टीने उपयुक्तता सिद्ध करणें कठीण झालें आहे. म्हणूनच विकासाच्या मानवी मूल्यांची वूज अशा लोकशाहीला असू शकत नाही हें म्हणावें लागतें. पण, लोकशाही ही समाजरचनेच्या रूपांत प्रगट झाल्यास विकासाची मूल्यें या रूपांत सुरक्षित होऊन विकसितहि होतील याविषयी संशय नसावा. अर्थात् लोकशाही ही समाजरचनेच्या रूपांत प्रकटायची कशी हा खरोखरी प्रश्न आहे. हा प्रश्न देखील लोकशाहीविषयीच्या आमच्या गैरसमजामुळे किंवा अयोग्य समजामुळेच निर्माण झाला किंवा होतो. कारण, लोकशाहीने राज्यव्यवस्था निर्माण करणे हे तिचे प्रयोजन नाही. पण, राज्यव्यवस्था निर्माण करणे हेंच लोकशाहीचें प्रयोजन होय, अन्य दुसरें कोणतेंच लोकशाहीचें प्रयोजन नाही असा भक्कम समज सर्वत्र वाढीला लागला. तो इतका वाढीला लागला की लोकशाहीची समाजरचना लोकशाहीच्या राज्यव्यवस्थेमुळेच निर्माण होईल. अन्यथा लोकशाहीची समाजरचना निर्माण होणारच नाही असें एक नवे (गैर)मूल्य प्रस्थापित झालें.

तात्पर्य, लोकशाहीला मानवी विकासाची चाड आहे हें तेव्हाच सिद्ध होऊं शकेल, जेव्हा लोकशाही ही राज्यव्यवस्थेचे रूप टाकून समाजरचनेच्या रूपांत प्रकटेल. कारण, विकासाची मानवी मूल्यें सुरक्षित व विकसित करण्याकरिताच हे रूप आवश्यक आहे व याकरिताच लोकशाहीचें महत्त्वहि आहे. राज्यव्यवस्थेंत लोकशाहीला जखडून ठेवण्याच्या सत्ताभोगाच्या प्रेरणा या वास्तविक लोकशाहीला मूल्यरहित करणाऱ्या आहेत. पण, या प्रेरणांनीच आंजवर लोकशाहीला राज्यव्यवस्थेंत अडवून ठेवले व तिची खरी प्रयोजकता सुस्पष्टपणें सिद्ध होऊं दिली नाही. तेव्हां, सत्ताभोगाच्या प्रेरणेमुळे राज्याच्या मर्यादेंत अडकलेली लोकशाही समाजरचनेच्या मुक्त प्रान्तांत यावी लागेल. कारण, अशा लोकशाहीच्या अनुरोधाने विकासाचीं मानवी मूल्यें समाजरचनेंत यशस्वीपणें दाखल होतील. अन्यथा हीं मूल्यें जळून नष्टहि होतील.

लोकशाहीचें प्रसरण म्हणजेच लोकशाहीची समाजरचना होय. पण, हें प्रसरण न झाल्यास बदलती समाजस्थिति ही केवळ दिशाहीन ठरते असेंच नव्हे, तर जीवनविकासाला घातकहि ठरते. म्हणून बदलती समाजस्थिति ही लोकशाहीचें प्रसरण होत असल्याची स्थिति ठरत असल्यास या बदलाचें एक विशिष्ट मूल्य निर्माण होईल. अर्थात् विकासाची मानवी मूल्येंहि या स्थितींत जिवंत राहतील व समाजजीवनाची वाढ मानवी मूल्यांच्या कुवतीची मानतां येईल. पण, लोकशाहीचें

प्रसरण हें मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचें लक्षण असल्यामुळे, हें प्रसरण स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचें प्रस्थापनच करील. म्हणून लोकशाहीच्या प्रसरणामुळे स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचें प्रस्थापन समाजजीवनांत होईल. लोकशाही ही समाजरचनेच्या मुक्त प्रान्तांत येण्याचें प्रयोजनच स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काच्या प्रस्थापनेकरिता आहे.

समाजजीवनाची बदलती स्थिति ही विकासमय स्थिति आहे किंवा कसें हें ओळखणें समाजजीवनाच्या चेहऱ्यावर मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांचा तजेला आहे किंवा नाही हें ठरविता आल्यासच शक्य आहे. अन्यथा ही बदलती स्थिति विनाशाच्यां आकर्षक गुंतावळयांत गुंतून मानवी विकासाची दिशाच रोखून धरणारी ठरणार आहे. रेशमाचा किडा रेशमांत गुंतून मरतो हीच स्थिति मनुष्याची व मानवी मूल्यांचीहि होईल. म्हणून विकासाचीं मानवी मूल्यें हीं मानवी स्वातंत्र्याच्या अनुभवाचीं व प्रेरणेचीं मूल्यें होत याविषयी सर्व पातळयांवर स्पष्टता हवी. या स्पष्टतेअभावीं सामाजिक बदलाला मूल्यच नसायचें. म्हणून मूल्यरहित सामाजिक बदलाला ' विकास ' म्हणतां येणार नाही.

तात्पर्य, लोकशाहीचे प्रसरण होण्याच्या प्रक्रियेमुळे समाजजीवनांत मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काची प्रस्थापना होऊं लागते. म्हणून मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत-हक्काच्या प्रस्थापनेचा आशय सामाजिक बदलाला असावा लागतो. हा आशयच खरा विकासाच्या सामाजिक स्थितीचा निदर्शक आहे. अर्थात् समाजाची बदलती स्थिति ही अशी विकासमय स्थिति ठरावी लागते. म्हणजे सामाजिक बदलाला मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काच्या स्थापनेचा आशय यावा लागतो. या आशयाविना जे सामाजिक बदल होतील ते सर्व भ्रमात्मक व विकासाच्या मानवी मूल्यरहित असतील. म्हणजेच मनुष्यजीवनाची व समाजजीवनाची विनाशमय स्थिति यामुळे संभवेल.

लोकशाहीच्या प्रसरणामुळे मूलभूत ( मानवी ) स्वातंत्र्याची प्रस्थापना होईल हें एकदा निश्चित झाल्यावर, लोकशाहीचें प्रसरण व्हायचें कसें हा एक प्रश्न निर्माण होतो व या प्रश्नाला अनुसरूनच मूलभूत स्वातंत्र्याची कल्पनाहि स्पष्ट व्हावी लागेल. म्हणजे मानवी स्वातंत्र्य व त्याचा मूलभूत हक्क म्हणजे काय असाच हा सरळ प्रश्न आहे.

स्वातंत्र्याचा संबंध उपभोगाच्या वृत्तीशीं व भोग्य वस्तूंशीं जोडला जातो.

उपभोगाच्या वृत्तीला उत्तेजन मिळत गेल्यास भोग्य वस्तूंच्या प्राप्तीकरिता मनुष्याची शक्ति कर्तृत्वशील बनत जाते. माणसाचें कर्तृत्व भोग्य वस्तूंची प्राप्ति करून उपभोगाच्या वृत्तीला शांत करण्याकरताच गतिशील असावी हें यामुळे ठरविलें जातें. म्हणजे अशा कर्तृत्वाकरिता माणसाला मोकळीक असणें म्हणजे माणसाचें मूलभूत स्वातंत्र्य होय हेंच आधुनिक जगांत कमीजास्त प्रमाणांत सर्वत्र मानले जात आहे. आणि याच हेतूला अनुसरून जगाचा मानवी व्यवहार उभारण्याचा खटाटोप केला जातो. या खटाटोपाच्या पायीं माणसाची चित्तवृत्ति ही पुष्कळ बाबतींत पिसाळून गेली व या पिसाळलेल्या चित्तवृत्तीने संघर्षाचे भयानक प्रसंग निर्माण केले. क्षुधा शमविण्यात आदिमानवांनी टोळ्या करून संघर्ष उभारला. तसेच उपभोगाच्या अतिरेकी जाणिवेमुळे माणसें व माणसांची राष्ट्रें किंवा राष्ट्रांचें गट, उपभोगाचें आकर्षक राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञान निर्माण करून, या तत्त्वज्ञानामुळे युद्धाकरिताहि प्रवृत्त झालेले आहेत. मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काकरिता हीं युद्धे अनिवार्य ठरतात व यामुळे होणारा मनुष्यसंहार क्षम्य ठरतो असें संघर्षाचें विरोध-विकासवादी तत्त्व निर्माण झालें (विरोधविकासवाद हें मार्क्सचेंच तत्त्वज्ञान नव्हे, तर उपभोगाची अतिरेकी जाणीव बाळगणाऱ्या सर्वांचें आहे.) व हें विरोधविकासवादी तत्त्व मानवी स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काच्या प्राप्तीचा दावा करायला किंचितहि कचरत नाही.

उपभोगाची चित्तवृत्ति ही मानवी स्वातंत्र्याची मूलभूत प्रेरणा आहे, याचें मूल्य निर्माण करण्याकरिता राष्ट्रेच्या राष्ट्रे सर्व शक्तीनिशीं झटत आहेत व जरूर तेव्हा या उपभोगाच्या स्वातंत्र्याकरिता हीं राष्ट्रें आक्रमकहि ठरत आहेत. जगांतील प्रक्षुब्ध मनःस्थिति ही वाढत्या उपभोगाची व उपभोगाच्या स्वातंत्र्याचीच मनःस्थिति होय. ही मनःस्थिति राष्ट्रवाद, समाजवाद व प्रसंगीं लोकशाहीनिष्ठा आदि मुखवटे चढवून जगासमोर येते. राष्ट्राराष्ट्रांतले संघर्ष, राष्ट्रांच्या गटातले राजकीय डावपेच, राष्ट्रांच्या गटातली बदलती शत्रुमैत्री या सर्व गोष्टी उपभोगाच्या अतिरेकी कर्तृत्वाचीं प्रतीकें होत. पण, हीं अतिरेकी कर्तृत्वाची प्रतीकेंच मानवी जीवनाचा आधार बनू पाहात आहेत.

तात्पर्य, स्वातंत्र्याचा संबंध उपभोगाच्या वृत्तीशीं जोडल्यामुळे उपभोगाची अतिरेकी वृत्ति ही स्वातंत्र्याची प्रेरणा ठरवून उपभोग्य वस्तु हस्तगत करण्याकरिता संघर्ष अनिवार्य ठरविले गेले. यामुळे उपभोगाची चित्तवृत्ति ही संघर्षाची चित्तवृत्ति ठरून उपभोगाची वाढती संधि म्हणजे स्वातंत्र्याची संधि होय असें एक विक्षिप्त

मूल्य प्रस्थापित झालें व या मूल्याच्या प्रभावांतच आजचा मानवी व्यवहार निर्माण झाला. पण यामुळे स्वातंत्र्याची वास्तविक प्रेरणा व तिचें मूल्य झाकाळून गेलें आहे. ढगाळल्या स्थितींत सूर्यप्रकाश दिसेनासा होतो तशा मानवी व्यवहारांत स्वातंत्र्याच्या खऱ्या प्रेरणा उरेनाशा झाल्या व ही महाभयंकर स्थितिच मानवी मूल्यांना धोक्याचा लाल कंदील दाखवीत आहे.

स्वातंत्र्याचा संबंध खरा आत्मसाक्षात्काराशीं आहे. आत्म्याचा विकास ही खरी स्वातंत्र्याची प्रेरणा आहे. मानवी विकास म्हणजे आत्मविकासाहून वेगळें असें कांहीच नाही. लोकशाहीचें प्रसरण म्हणजे स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचें प्रस्थापन. पण, स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क म्हणजे आत्मसाक्षात्काराची प्रेरणा जिच्यामुळे मिळेल त्या संधीचा हक्क. व्यक्तिजीवनांत वा समाजजीवनांत मानवी मूल्याचें अस्तित्व टिकून राहील, किंबहुना या मानवी मूल्यांच्या आधारावर मानवी व्यवहार उभारला जाईल अशी संधि निर्माण करावी लागते व त्याकरिता चित्तवृत्तीची भोगमय स्थिति नियंत्रित करणें अनिवार्य ठरते. उपभोगाची वृत्ति नियंत्रित करणें स्वातंत्र्याच्या प्राप्तीकरिता जरूरीचें होय ! कारण, स्वातंत्र्याचा अनुभव हा आत्मानुभवच असल्यामुळे उपभोगाच्या वृत्ति या अनुभवापासून नेहमीच दूर ठेवतील. तेव्हा, ही वृत्ति कायमची नष्ट करतां येत नसली किंवा शरीरधर्मानुसार तिचा आविष्कार स्वाभाविक मानला तरी या वृत्तीचा प्रभाव मानवी चित्तावर होणें व त्या प्रभावांत मानवी चित्त गुरफटून राहणें म्हणजे मनुष्य स्वातंत्र्य अथवा आत्मानुभव यांना अंतरणेंच होय. म्हणून स्वातंत्र्याची प्राप्ति किंवा आत्मानुभवाचा साक्षात्कार हा वस्तूच्या उपभोगांतून प्राप्त होणार नसून मानवी सहानुभूतींतून निर्माण होणाऱ्या चित्ताच्या स्नेहसंवर्धक स्वभावामुळे प्राप्त व्हावयाचा आहे. वस्तूंचा उपभोग या स्वभावाला बाधक होणार नाही अशा कुशलतेने वस्तूंना किंवा उपभोगाला जीवनांत नियोजिले पाहिजे. म्हणजे जीवनांत उपभोगाचें स्थान, मानवी चित्त विकारवश करण्याकरिता नसून मानवी चित्त विकासाकडे सतत आकर्षिलें जावें म्हणून साहाय्यक होण्याचें आहे व याच करिता उपभोगावर आत्मविचाराचे नियंत्रण असणें जरूरीचें आहे. आत्मविचाराच्या नियंत्रणाशिवाय उपभोगाच्या वृत्तीला मोकळीक देणे हें आत्मनाशास कारण ठरेल. सबब मानवी स्वातंत्र्याचा अनुभव उपभोगाच्या अनियंत्रित वृत्तीमुळे दुरावला जातो, तो दुरावू नये. कारण, या अनुभवापासून माणसाने वंचित राहणें म्हणजे मानवी हक्कापासून वंचित राहण्यासारखेच आहे व या मानवी हक्कापासून वंचित ठेवण्याची स्थिति

२...

उपभोगाचें भौतिक आकर्षण निर्माण करणाऱ्या सामाजिक वस्तुस्थितिमुळेच निर्माण झाली. म्हणून ही सामाजिक वस्तुस्थिति स्वातंत्र्याच्या आकर्षणांत बदलावी लागेल. म्हणजेच आत्मानुभवाची वस्तुस्थिति निर्माण करावी लागेल.

मानवी अथवा सामाजिक स्थिति मानवी सहानुभूतींतून निर्माण होणाऱ्या स्नेहसंवर्धक वृत्तीची असली तरच मानवी मूल्यें सुरक्षित राहू शकतात. आणि ही स्थिति अनियंत्रित उपभोगाच्या चित्तवृत्तीमुळे नष्टहि होते. म्हणून या चित्तवृत्तीवर नियंत्रण आणून मानवी स्वातंत्र्याची म्हणजे आत्मसाक्षात्काराची संधि निर्माण करण्याची क्षमता लोकशाहीला हवी. यामुळेच लोकशाही ही मानवी मूल्यें सुरक्षित ठेवण्याची प्रेरकशक्ति ठरायची आहे. तेव्हा, लोकशाहीचें मानवी स्वातंत्र्याच्या अनुभवाकरिता प्रयोजन ठरावें. त्यामुळेच मानवी मूल्यांशीं सुसंगत मानवी विकास संभवेल.

● ● ●

## भौतिक हव्यासाचें भयंकर संकट

आज सर्वत्र मानवी चित्तांत प्रक्षोभ दाटून असल्याचें दिसतें. प्रक्षोभाविना मानवी प्रश्नांची सोडवणूक होणेंच असंभव, असा समज सर्वत्र बळावत चालला आहे. बुद्धि, ज्ञान, तपस्या, कर्मकुशलता आणि प्रतिभा या सर्व मानवी वैशिष्ट्यांचें अवमूल्यन होत असून दंडशक्तीला प्रोत्साहन दिलें जात असल्याची वस्तुस्थिति निर्माण होत आहे. मानवी प्रश्न हे राजकीय, सामाजिक व आर्थिक मुखवटे घेऊन समोर येतांना दृष्टीस पडतात. पण यामुळे मानवी प्रश्न खऱ्या अर्थानें समोर येतात, त्यांतली वास्तविकता लक्षांत घेता येऊ शकते हें संभवत नाही. अर्थात् मानवी प्रश्नांनी धारण केलेले मुखवटे झटकून त्यांचें वास्तविक स्वरूप स्पष्ट व्हायला पाहिजे.

मानवी प्रश्न ज्यांना म्हणतां येईल, ते राजकीय असतात काय ? ते सामाजिक

व आर्थिक असतात काय? मनांत उत्पन्न होणारे संकल्प-विकल्प व त्यानुसार होणारे मानवी व्यवहार यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय आशय आहे. कारण, मनाची भूमिका बाह्याकारेंः म्हणून ऐहिक सुखाची असते. पण यामुळे मानवी प्रश्न मनाच्या पातळीवर राहून समजले जाऊं शकतात असें मात्र नव्हे. कारण, मानवी समस्या लक्षांत घेण्याचा मनाहून वेगळा निकष आहे. तो निकष म्हणजे आत्मप्रत्ययाचा होय. तेव्हा, मानवी समस्या म्हणतां येण्याजोगी समस्या ही आत्मप्रत्ययांतून ओळखली जाऊं शकते. हा आत्मप्रत्यय दुर्मिळ होत चालला आहे. कारण, मानवी चित्तावर भरपूर भौतिक आवरण असल्यामुळे मानवी चित्त दडपलें जात आहे. म्हणजे मनुष्य चित्तहीन होईल की काय अशा तऱ्हेचें भौतिक दडपण मानवी चित्तावर येत आहे. म्हणूनच मानवी प्रश्नांचा निश्चितरूपाने मागोवा घेणें कठीण होऊन बसलें— अडचणीचें होऊन बसलें आहे.

तात्पर्य, मानवी प्रश्नांची सोडवणूक चित्तांत प्रक्षोभ दाटून ठेवल्याने व्हायची नाही. कारण, प्रक्षोभ हा मनोविकार आहे. हा मनोविकार सामाजिक, राजकीय व आर्थिक मुखवटे चढवून पुढे येतो. पण सामाजिक, राजकीय व आर्थिक मुखवटे खरे मानवी प्रश्न नव्हेत. ते मानवी चित्तावर चढलेले आवरण होत. म्हणून या आवरणांना आत्मप्रत्ययाचा आशय नाही. अर्थात् मानवी समस्या आत्मप्रत्ययांतून ओळखली पाहिजे.

मानवी समस्यांचा शोध हा एक आत्मप्रत्ययाचा विषय आहे. हा आत्मप्रत्यय मानवी अस्तित्वाच्या अनिवार्य स्थितीचा शोध घेतोच. शिवाय अमरत्वाचीं द्वारे सताड उघडी करून जीवनसाफल्याचें दिशादर्शन करतो. तेव्हा, आत्मप्रत्ययाविना जीवनसाफल्याचा मार्ग चालता येत नाही हें निश्चित होय. मानवी समस्या, या मार्गातून चालतांना उकलतील. उकलत उकलत संपुष्टांत येतील. अर्थात् 'मानवी समस्यांचा शोध' म्हणजे देखील जीवनसाफल्याचा मार्ग चालण्याचा हव्यास होय. चित्ताला या मार्गाकडे आकर्षित केल्यानेच मानवी प्रवृत्तींत हा हव्यास दाखल होईल. अन्यथा मानवी प्रवृत्ति या हव्यासाविना रिकामी राहील. मानवी प्रवृत्तीची ही रिकामी स्थिति आज समस्यांची गुंफण करीत आहे. मानवी जीवन याचमुळे दुःखकारक होत चाललें आहे.

जीवनसाफल्याचा मार्ग मानवी चित्ताचें आकर्षण व्हावा व हा मार्ग मानवी प्रवृत्तीचा हव्यास व्हावा. पण, जीवनाचा हेतु कळल्याशिवाय हा हव्यास मानवी

प्रवृत्तीला जडायचा कसा ? या हेतूविषयीचें अज्ञान सर्व समस्यांचे मूळ ठरले आहे. जगांतले सर्व संघर्ष आणि संहार या अज्ञानांतूनच जन्माला आलेले आहेत. धर्मांनी, दर्शनांनी हें अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. पण, धर्मांतून आणि दर्शनांतून कालांतराने प्रयोगशीलता निघून जाऊं लागल्यामुळे, धर्मांत आणि दर्शनांत देखील अज्ञान वाढविण्याचें, टिकवून ठेवण्याचें पाखंड निर्माण झाले. एका धर्माचें ज्ञान दुसऱ्या धर्माचें अज्ञान ठरलें. एका दर्शनाचें तत्त्व दुसऱ्या दर्शनाला निःसत्त्व वाटूं लागलें ! एका तऱ्हेचा भ्रम निर्माण करून मानवी चित्त त्या भ्रमांत गुरफटवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला. आत्मप्रत्ययाला यामुळे वाव उरला नाही. धर्माची व दर्शनाची गुंगी ही अफूच्या गुंगींत लोळत राहण्याच्या योग्यतेला आली. एकूण, धर्मांच्या व दर्शनांच्या अस्तित्वाच्या जाणिवे-ऐवजी, त्यांतल्या पाखंडाच्या अस्तित्वाची जाणीव महत्त्वाला चढली. यामुळे जीवनाचा हेतु व त्यांचें ज्ञान प्राप्त करणें दुरापास्त झालें. यांतून अजूनहि सुटका झालेली नाही, आणि नजिकच्या काळांत अशी सुटका होणें संभवत नाही. कारण, रक्तांत भिनलेलें विष जसें त्याहून प्रभावी तत्त्वाच्या संपर्काशिवाय उतरत नाही, तसें जीवनाच्या हेतूविषयी मानवी चित्ताचें आकर्षण प्रभावाने रोजच्या जीवनांत किंवा मानवी व्यवहारांत तळपून निघाल्याशिवाय मानवी जीवनाची सार्थकता साधतां यावयाची नाही.

तात्पर्य, जीवनसाफल्याचा मार्ग चालण्याचा हव्यास मानवी प्रवृत्तीला जडणे तेव्हाच संभव आहे की जेव्हा, जीवनाच्या हेतूचें ज्ञान होण्याच्या मार्गांतले—धर्मांनी आणि दर्शनांनी नव्हे पण त्यांतल्या पाखंडांनी निर्माण केलेले—अडसर दूर होतील. कारण, धर्मांतल्या व दर्शनातल्या या पाखंडांनी स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव प्रभावीपणें बाळगली व जीवनाच्या हेतूच्या ज्ञानाकडे पाठ फिरवली. तेव्हा, जीवन-हेतूचा प्रत्यय अशा पाखंडाने असंभव झाला आहे. म्हणून मानवी जीवन हें जीनवहेतूच्या प्रत्ययाविना नासकें होत आहे.

नव्या जगाने उत्कर्षाचा प्रचंड वेग धरला आहे म्हणतात. अज्ञानाचें समूळ उच्चाटण करणें या उत्कर्षाचा उद्देश सांगितला जातो. पण नव्या जगाने धरलेला वेग हा आत्मप्रत्ययांतून निर्माण झाला किंवा कसें हे शोधले पाहिजे. हा वेग जर आत्मप्रत्ययकारी असेल तर जीवनसाफल्याचा मार्ग चालला जात आहे, असेच मानावे लागेल. पण, नव्या जगाने धरलेला उत्कर्षाचा ‘ प्रचंड वेग ’ हा मानवी चित्ताचें आकर्षण ठरतांना दिसतो तरी मानवी चित्तांतला

क्षोभ कमी झालेला नाही, तो वाढतच असल्याची वस्तुस्थिति आहे. क्षोभाचें मूळ मानवी चित्ताला दडपणाऱ्या भौतिकतेंत आहे. तेव्हा, उत्कर्षाचा 'प्रचंड वेग' ज्याला म्हटलें जातें तो वेग एक भौतिक प्रक्रिया आहे. त्याला आत्मिक तजेला नाही. आणि आत्मिक तजेला या वेगाला असता तर मानवी चित्तांतून क्षोभ समूळ नष्ट झाला असता. मानवी संघर्ष, राष्ट्राराष्ट्रांतले संघर्ष, धर्माधर्मांतले संघर्ष, दोन दर्शनांतले संघर्ष आजवर उरते ना! पण आज हे सर्व संघर्ष पूर्वीहून व्यापक झाले आहेत. मानवी जीवनच संघर्षाने व्यापलें जात आहे. म्हणून दंडशक्ति (शासनशक्ति)– जी हिंसादेवीची उपासक आहे ती– मानवजातीवर स्वतःचें अधिराज्य निर्माण करील असें दिसू लागले आहे.

तात्पर्य, उत्कर्षाचा म्हटला जाणारा 'प्रचंड वेग' हा मानवी भावना संवेदनशील करण्याऐवजी, ती भावना प्रक्षोभक व हिंसक करण्यास मदतरूप होत असल्यामुळे हा वेग आत्मप्रत्ययांतून निर्माण झाला नाही हें सिद्ध आहे. म्हणूनच जीवनसाफल्याचा आशय या 'प्रचंड वेगा'ला नाही. अर्थात् या वेगांतून मनोविकारांचाच प्रादुर्भाव होतांना दिसतो.

एकूणच जीवनविकासाची जाणीव उत्कर्षांच्या म्हणविल्या जाणाऱ्या 'प्रचंड वेगा'त किंचित् आहे. म्हणून या उत्कर्षाला मानवाचें मूल्य वाटेनासें झालें. डोळे दिपविणारे, मनाला हेलकावे देणारे, चित्ताकर्षक शास्त्रीय शोध पुरोगामित्वाची साक्ष पटविण्यास पुरेसे नाहीत काय? —असा प्रश्न या 'प्रचंड वेगा'ने मानवजातीसमोर ठेवला आहे. एवढ्यावरच संतोष न मानतां 'जीवनाच्या वाढत्या गरजा भागविण्याची क्षमता या शोधांतूनच प्राप्त करतां येऊं शकते, अन्यथा जीवन दुःखकारकच राहील' असा निर्वाळाहि या 'प्रचंड वेगा'ने दिला आहे. पण ही उत्कर्षाची एकूण प्रक्रिया माणसाला शाबूत ठेऊं शकते काय? आजवर ठेऊं शकली काय? तसा प्रत्यय मानवजातीला आला काय? —या ज्वलंत प्रश्नांकडे पाठ फिरवून 'उत्कर्षा'च्या या 'प्रचंड वेगा'ने मानवजातीच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचे सुरूच ठेवलें आहे. नव्हे, असें केल्यानेच मानवी चित्तावरचें भौतिक आवरण घट्ट बसू शकतें, व तें घट्ट बसावें हा या प्रचंड वेगा'चा उद्देश ठरला आहे.

मानवाचें व मानवतेचें मोल देऊन पुरोगामित्व पत्करण्याची जाणीव ही मानवी असू शकत नाही. पण ही जाणीव म्हणजेच मानवी जाणीव किंवा मानवी आकांक्षा असें म्हटलें जात आहे. भौतिक आवरणाने निर्माण झालेल्या आकांक्षा या मानवी मनात निर्माण झाल्या असल्या तरी त्या जीवन

विकासाच्या आकांक्षा नव्हेत. जीवन-विकासाच्या आकांक्षा या आत्मप्रत्ययांतूनच निर्माण होतात. अशा आकांक्षा संवेदनशील असतातच. शिवाय सहजीवनाच्या मर्यादाहि या आकांक्षांना ओळखतां येतात, पटलेल्या असतात. तेव्हा, मानवाची किंवा मानवतेची शाबूत स्थिति ही संवेदनशील आकांक्षेमुळे स्पष्ट होते. ही संवेदनशील आकांक्षा वस्तुनिष्ठ राहत नाही, आत्मनिष्ठ राहते. आत्मप्रत्ययाची ओढ या आकांक्षेला असते. चित्ताची स्थिति आत्मप्रत्ययकारी करण्याची धडपड या आकांक्षेमुळे मनुष्याला करतां येते. अर्थात याचमुळे जीवनसाफल्याचा मार्ग माणूस चालू लागतो.

तात्पर्य, उत्कर्षाचा म्हणविणारा ' प्रचंड वेग ' मानवी चित्तावरील भौतिक आवरण अधिकाधिक घट्ट करीत आहे. यामुळे मानवाची शाबूत स्थिति नाहीशी होतांना दिसते. संवेदनशील आकांक्षा मानवी चित्तांत दिसल्यास मानवाची शाबूत स्थिति पटूं शकते व असें चित्तच आत्मप्रत्ययकारी असतें. पण, याचें मूल्य मानवी जीवनांत निर्माण व्हायला पाहिजें.

मानवी चित्तांतला प्रक्षोभ हा चित्तावरील भौतिक आवरणाच्या दडपणानेच निर्माण होत आहे. कारण, चित्ताची विचल स्थिति भौतिक आकर्षणामुळे निर्माण झाली आहे. भौतिक वातावरणाहून इतर श्रेष्ठ वातावरणाचा सुगावा अशा चित्ताला लागूं नये याची काळजी घेण्याची कुशलता भौतिकतेंत आहे. तेव्हा, चित्ताची विचल स्थिति हीच भौतिकतेची यशस्विता ठरते. कारण, या विचल स्थितीमुळे चित्त सदोदित भौतिक हव्यासांत राहू शकतें. किंबहुना भौतिक हव्यासांत चित्त राहणें म्हणजे चित्ताची विचलता ! ही विचलताच गतिमान होऊन प्रक्षोभाचें रूप धारण करते. या प्रक्षोभाने चित्ताची तृप्ति होत नसते. कारण, भौतिक वातावरणाच्या शृंखला तोडून बाहेर जाण्याइतपत चित्ताला प्रगल्भता येत नाही. तशी प्रगल्भता येऊं नये अशी भौतिक वातावरणाची रचना होऊन बसते. अर्थात् या वातावरणांतून चित्ताची सुटका होत नाही तोंवर भौतिक हव्यासांतून निर्माण झालेला प्रक्षोभ शमत नसतो. उलट हा प्रक्षोभ पाशवी शक्तींचा उपासक बनतो व तो तसा बनलेला मानवी इतिहासांत ठिकठिकाणीं दिसेल. त्याशिवाय मानवी इतिहासच अस्तित्वांत आला नाही. तेव्हा, चित्तांतला प्रक्षोभ, मानवी चित्त भौतिक वातावरणांतून सुटून आत्मप्रत्ययांच्या वातावरणात विचरत नाही तोंवर कायम राहील. एवढेच नव्हे, त्याची सदोदित वाढ होत जाऊन, मानवी जीवन ग्रासून घेण्याची त्याची महत्त्वाकांक्षा मानवजातीचें संकट होऊन बसेल. तेव्हा, हें मानवजातीचें संकट टाळतां येणें, मानवी चित्त भौतिक वातावरणांतून किंवा त्याच्या दडपणांतून अलगद बाहेर काढलें तरच शक्य आहे.

• • •

## उन्नतावस्था आणि दंडनीति

मनुष्यसंस्कृति उन्नतावस्थेला आली असे आपण म्हणतो. पण माणसाच्या प्राथमिक अवस्थेच्या खुणा पार नाहीशा झाल्या आहेत असे मात्र म्हणता येत नाही. कारण आजच्या उन्नतावस्थेत देखील प्रथमावस्थेची मानवी वृत्ती अनेकदा प्रत्ययास येते. मनुष्याची प्रथमावस्था ही आदिमानवाची अवस्था मानली जाते. या अवस्थेत इतर प्राणी आणि माणसात फारसा भेद नव्हता म्हणतात. एक दुसऱ्याला मारून माणसाचे अस्तित्व सिद्ध केले जात होते. याला आपण रानटीपणा अथवा जंगलाचा न्याय देखील म्हणतो. बळाचा उपयोग दुसऱ्याला पराजित करण्यासाठी होत होता. बळ हे स्वामित्वाचे साधन मानले जात होते. जेता (परा)जितांचा स्वामी बनत होता. स्वामी आणि सेवक हे नाते यातूनच निर्माण झाले. म्हणून बलोपासना व बलसंवर्धना ही त्यावेळी माणसाची

अनुक्रम ... दि: ...17५५...
क्रमांक ...2262...



गरज होती. ' पराक्रमा ' शिवाय ही गरजपूर्ती होत नव्हती. म्हणून स्वामित्वासाठी युद्धनीती जन्मास आली. युद्ध हे स्वामित्वाच्या आकांक्षेतून जन्मास आलेले तत्व आहे. हे तत्त्व पराक्रमामुळे प्रतिष्ठित केले गेले. पराक्रम ही जी माणसाच्या प्राथमिक अवस्थेची जाणीव ती तशीच कायम राहिली; एवढेच नव्हे तर अस्तित्वा-साठी पराक्रम हे न्यायाचे मानले जाऊ लागले. माणसाची स्वामित्वाची मूळ प्रवृत्ती ही आक्रमक प्रवृत्ती. या प्रवृत्तीचा त्याग करणे ( प्रगत अवस्थेत देखील ) माणसाला अजून शक्य झालेले नाही. म्हणजे त्याची स्वामित्वाची भावना नाहीशी झालेली नाही.

सामाजिक नीतिनियम स्वामित्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या पराक्रमाच्या प्रभावापासून दूर राहू शकले नाहीत. कारण ते शक्यच नव्हते. म्हणून बलवंतांची दंडनीती समाजव्यवस्थेचा कणा बनली. हा कणा कधी ताठ तर कधी वाकलेला, समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांचा प्रतीक म्हणून इतिहासात दिसतो. पण मानवी इतिहास हा दंडनीतीची बदललेली मूल्ये प्रस्थापित करण्याचाच इतिहास आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, माणसाची सामाजिक अवस्था ही दंड-नीतिशिवाय सिद्ध करता येत नाही हा आग्रह इतिहासात पदोपदी दिसतो. आणि भावी काळावर परिणाम घडवीत राहण्याचा संकल्प या आग्रहाचा आहे. तेव्हा मनुष्यसमाज हा दंडनीतीपासून वेगळा असू शकतच नाही आणि तो वेगळा झालाच तर माणसांची सामाजिक अवस्थाच संपुष्टात येईल असेच मानले जात होते व आजही मानले जाते. पण त्यामुळे मानवी संस्कृतीची उन्नतावस्था मनुष्यसमाजाला प्राप्त होणे केवळ अशक्य होय. म्हणून आजची उन्नतावस्था ही प्रथमावस्थेच्या आक्रमक प्रवृत्तीपासून मुक्त नाही. ती मुक्त राहू शकत नाही. स्वामित्वाची भावना व दास्यपरंपरा चालूच राहील. आक्रमण, स्वामित्व व दास्य या तीन प्रवृत्ति मनुष्यसमाजाचा स्थायीभाव म्हणूनच शिल्लक राहतील. अर्थात उन्नतावस्थेचा मुखवटा घालून प्रथमावस्थेतच मनुष्य राहील. अजूनहि तो प्रथमा-वस्थेतच आहे. म्हणून समाजाच्या उन्नतावस्थेचा विचार इतिहाससिद्ध गोष्टी गृहीत धरून करताच येणार नाही.

राज्य व धर्म दंडनीतीवरच चालत आले व चालतात. म्हणून आजवर राज्याचे आणि धर्माचेच समाजावर शासन राहिले. राज्य आणि धर्मातून दंडनीती काढून घेतल्यास दोघांचेही अस्तित्व समाजातून नाहीसे होईल. अर्थात दंडनीतीवरच धर्म व राज्याचे अस्तित्व सिद्ध झाले आहे. म्हणून धर्म व राज्याचे

स्वयंसिद्ध स्वरूप कोणत्याच काळी नव्हते, हे अमान्य होण्यासारखे नाही. धर्म व राज्याचे अस्तित्व परस्परावलंबी आहे. धर्माने राज्याचे अस्तित्व व महत्त्व मान्य केले. तसे राजाने देखील धर्माचे अस्तित्व व महत्त्व मान्य केले. राजा हा विष्णूचा अवतार मानण्याची कल्पना नुसती धार्मिक कल्पना नाही तर ती धार्मिक श्रद्धाही आहे. यात राज्य आणि धर्माचे सख्य ठळकपणे नजरेत भरते. धर्मनीती ही राज्याच्या दंड-नीतीहून वेगळी कधीच नव्हती. आणि राजादेखील धर्मनीतीच्या वेगळे आचरण करू शकत नव्हता. धर्माचरणात न बसणारे आचरण हे धर्मबाह्य आचरण तर होतेच; पण हे आचरण राजनीतीलाही अमान्य होते. म्हणून धर्मबाह्य आचरण करणाऱ्या राजाचा विनाश घडवून आणणे धर्मकृत्यच मानले जात होते. बलिष्ठ राजांच्या विनाशासाठी ऋषींची तपश्चर्या होत होती. या तपश्चर्येतून राजाच्या विनाशासाठी विनाशकारी शक्ति व दिव्यास्त्र संपादन केले जात होते. अर्थात धर्म, राजासाठी दंडनीती वापरीत असे. आणि राजा लोकांसाठी धर्ममान्य दंडनीती उपयोगात आणीत असे. अशा तऱ्हेने दंडनीती धर्म व राजाच्या आधीन होती. आज याच्या जुन्या स्वरूपात बदल झालेला दिसतो. पण नव्या स्वरूपात देखील दंडनीतीचे महत्त्व कायमच आहे. आणि दंडनीतीचा उपयोग करण्याचे देखील थांबलेले नाही.

मानवी समाजाला शांततामय सहअस्तित्वाची नवी प्रगत अवस्था प्राप्त व्हावी अशी आकांक्षा मानवी चित्तात निर्माण झाली. पण सहअस्तित्वासाठी दंडनीती सहायक ठरत नाही. उपायकारक तर नाहीच नाही, उलट अपायकारकच ठरते. तेव्हा, दंडनीतीचे अस्तित्व मान्य करून सहअस्तित्वाची प्रगत अवस्था मनुष्य-समाजाला प्राप्त व्हावयाची नाही. सहअस्तित्वासाठी दंडनीतीचे अवमूल्यनच झाले पाहिजे. दंडनीतीला सहअस्तित्वाविषयी कधीच आस्था वाटली नाही: वाटणारही नाही. कारण अशी आस्था वाटणे दंडनीतीच्या स्वभावाला अनुसरून नाही. तेव्हा सहअस्तित्व आणि दंडनीती एकत्र नांदणे कधीही शक्य नाही. दोहोंचे स्वभाव परस्परांहून भिन्न म्हणजे विरुद्ध दिशेचे आहेत.

( अ ) दंडनीय माणसाचे अस्तित्व जगात नसावे हे दंडनीती सांगत आहे. किंवा अशा माणसाचे अस्तित्व राहिले तरी त्याची प्रतिष्ठा असू नये. दंडनीतीनुसार म्हणे तो अप्रतिष्ठितच राहिला पाहिजे ! यामुळे अशाच माणसाचे अस्तित्व मान्य होईल की जो दंडनीय नाही. पण दंडनीती ही स्वामित्वाची व बळाची नीती असल्यामुळे स्वामी आणि बलवान हेच फक्त दंडनीय नसतात. बाकीचे सेवक किंवा दास

आणि बलहीन अंत्यज नेहमीच दंडनीय असतात. तेव्हा दास किंवा अंत्यजांचे अस्तित्व राहिले तरी स्वामी आणि बलवानांचे ते अंकितच राहतील. त्यांना स्वतःचे व्यक्तित्व असता कामा नये हे यात गृहीत धरले गेले आहे.

(आ) सहअस्तित्वाची जाणीव ही सर्वांची समान प्रतिष्ठा मानणारी जाणीव आहे. प्रत्येकाचे अस्तित्व हे प्रत्येकाचे व्यक्तित्व सिद्ध करण्यासाठीच असावे. हेच वास्तविक अस्तित्वाचे प्रयोजन होय. म्हणून स्वामित्व आणि पराक्रमाची प्रवृत्ति कोणाच्याही शोषणाची प्रवृत्ति म्हणून जगात शिल्लक राहू नये. यासाठी स्वामित्व आणि पराक्रम गुणवत्तेचे लक्षण मानले जाऊ नये. ते मानवी विकृतीचेच लक्षण मानले जावे. असे सहअस्तित्वाच्या जाणिवेत गृहीत आहे. सहअस्तित्वात क्षमाशील वृत्तीचा परिपोष होत राहील. कोणीही दंडनीय असणार नाही. चुका या नेहमी हीन चित्तामुळे घडतात. चुका न घडाव्यात म्हणून चित्तशुद्धीचाच उपाय करीत राहिले पाहिजे. अशी संधी सहअस्तित्वाच्या जाणिवेत प्रामुख्याने आहे. यामुळे माणसाची व मनुष्यसमाजाची प्रगत अवस्था शक्य होईल. मनुष्य क्षमेस पात्र असावा; तो कोणत्याच कारणामुळे दंडनीय ठरू नये; माणूस दंडनीय ठरला तर माणसे नेहमीच हीनचित्त राहतील. दंडनीयता ही माणसाची हीनचित्त स्थिती कायम ठेवण्याची बळजबरी आहे. यामुळे अंततोगत्वा माणसाचे अस्तित्व अमान्य केले जाते. हे सहअस्तित्वाच्या जाणिवेच्या अगदी विपरीत आहे.

सहजीवनातले मानवी अस्तित्व प्रतिष्ठेसह आहे. प्रतिष्ठेशिवाय नाही. म्हणून सहजीवनाची जाणीव मनुष्यप्रतिष्ठेची जाणीव मानली पाहिजे. पण समाजात सह-जीवनाची मूल्ये प्रस्थापित व प्रतिष्ठित झाल्याशिवाय दंडहीन समाजव्यवस्था निर्माण व्हायची कशी? म्हणून सहजीवनाची मूल्ये प्रस्थापित करण्याचा उपायच केला पाहिजे. तो करता आला तर सहजीवनाचा मार्ग सोपा होईल. त्यासाठी प्रथम दंडनीतीचे आधार तोडावे लागतील. मनुष्य दंडनीय असू नये म्हणजे दंडनीतीचे अस्तित्व असणार नाही हे समाजाला पटवावे लागेल. दंडनीय नसणे हे मनुष्यप्रतिष्ठेचे लक्षण आहे हे समाजाच्या गळी उतरावे लागेल. म्हणून राज्य वा दंडनीतीचा पुरस्कार करणाऱ्या कोणत्याही तत्त्वावर अवलंबून न राहण्याची मनुष्याची प्रवृत्ति व्हावी लागेल. म्हणजे कोणत्याही शासनव्यवस्थेच्या आधीन तो असता कामा नये. शासनव्यवस्था म्हटली की दंडनीतीचे अस्तित्व आलेच. तेव्हा शासनमुक्त सामाजिक जाणीव वाढीला लागली पाहिजे. कोणतेही शासन दंडमुक्त

असणार नाही. म्हणून शासनाचा त्याग हाच दंडमुक्त होण्याचा खराखुरा उपाय ठरतो. अर्थात शासनमुक्त अवस्था ही खरी मानवाची प्रगत अवस्था होय.

मनुष्य दंडनीय नसावा म्हणजे तो 'स्वतंत्र' असावा. 'स्वतंत्र' म्हणजे कोणतेच तंत्र नव्हे. तर ती एक प्रवृत्ति आहे. तंत्र आणि प्रवृत्तीत फरक आहे. प्रवृत्ति स्वेच्छेतून निर्माण होते. तंत्र हे परिस्थितीच्या प्रभावात निपजलेले असते. अशा तंत्राचा अंगिकार म्हणजे 'स्वतंत्र' नव्हे. 'स्वतंत्र'तेत अभिक्रम स्वतःकडे असतो. उपक्रमशीलता स्वतःची असते कोणत्याही तंत्रात अभिक्रम किंवा उपक्रम स्वतःचा नसतो, इतरांचा असतो. स्वतःचा अभिक्रम जागृत करणे व स्वतः उपक्रमशील होणे म्हणजेच स्वतः चैतन्य म्हणून वावरणे, हे 'स्वतंत्रते'त गृहीत आहे. तंत्रात हे गृहीत नाही. कारण ते 'रेडीमेड' असते. तयार माल असतो. म्हणून तो परप्रत्ययाचा एक परिणाम असतो.

स्वतंत्र माणूसच दंडनीय नसतो. म्हणून हाच दंडनीतीच्या अवमूल्यनाचा उपाय ठरतो. पण मनुष्यसमाजाला स्वतंत्रतेची जबाबदारी पेलता आली पाहिजे. ती पेलवली जात नाही म्हणून जगात दंडनीती, पराक्रम, युद्ध व शोषण टिकून आहेत. ही सर्व हिंसेचीच वेगवेगळी रूपे आहेत. या रूपांची, हिंसा हीच मुख्य प्रेरणा आहे. तेव्हा जगात दंडनीतीच्या, पराक्रमाच्या, युद्धाच्या व शोषणाच्या रूपांत वावरणारी हिंसा स्वातंत्र्याच्या प्रत्ययाअभावीच वावरते आहे हे सोलीव सत्य माणसाच्या जाणिवेतून निसटता कामा नये. म्हणून स्वातंत्र्याची जबाबदारी पेलण्याची क्षमता माणसात आली पाहिजे. याचमुळे तो खऱ्या अर्थाने प्रगत अवस्थेकडे जाईल व समाजाची प्रगत अवस्था सिद्ध होईल. याने शांततामय सहजीवनाच्या आकांक्षेची पूर्ति होईल.

● ● ●

## हृदयाचा भाव : एक स्फोटक शक्ति

परिवर्तनीय जगाचे अपरिवर्तनीय असे एक रूप आहे. पण त्या रूपाकडे पाहण्याचे धैर्य आमच्यांत आले नाही. कोणत्याही विद्रुप माणसाकडे पाहणें जसें धैर्याचे असते तसे या अपरिवर्तनीय रूपाकडे पाहणेसुध्दा धैर्याचेच असते. पण विद्रुपतेच्या खुणा मनात किळस निर्माण करणाऱ्या जशा असतात तशा त्या विद्रुप माणसाविषयी संवेदना निर्माण करणाऱ्याही असू शकतात. म्हणून विद्रुपता ही भीतीदायक असली तरी ती मानवी संवेदना व सहानुभूतीच्या मर्यादा तोडणारी नसतेही. उलट सहानुमूती व संवेदनेतून मानवी हृदयांत करुणेचा झरा वाहू लागतो. 'बुडती हे जन न देखवे डोळा' अशी चित्तात कालवाकालव निर्माण होते. यातूनच सेवेचा भाव प्रगटतो. सेवेच्या व्रतातून उपेक्षितांना संजीवन दिले जाते. म्हणून विद्रुपता निव्वळ उपेक्षित राहत नाही. आजवर ती उपेक्षित

राहिलीही नाही. मानवी चित्ताचे शुद्धिकरण या विद्रुपतेने केले आहे. जगाच्या अपरिवर्तनीय रूपाकडेही चित्ताच्या शुद्धिसाठीच पाहिले पाहिजे. तें पाहण्यासाठी धैर्य आमच्यांत आले पाहिजे.

मनुष्य हा स्वातंत्र्यप्रिय आहे असे म्हटले जाते व तें खरेही आहे. या स्वातंत्र्यप्रियतेमुळें माणसाच्या स्वातंत्र्याची पूर्ती होतेच असे मात्र म्हणता येत नाही. कारण स्वातंत्र्यपूर्तीसाठीं त्याला स्वातंत्र्याची जबाबदारी अजूनतरी स्वीकारता आलेली नाही. म्हणून स्वातंत्र्यासाठीं झगडण्याच्या लायकीचा मनुष्य झाला असला तरी तो स्वातंत्र्य अनुभवितो आहे अशी वस्तुस्थिति जगांत कुठेच ( अजून ) निर्माण झालेली नाही. आणि हेंच परिवर्तनीय जगाचे अपरिवर्तनीय रूप आहे. पण या रूपाचे रहस्य लक्षांत घेता आले पाहिजे. ( स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या माणसाला ) स्वातंत्र्याच्या उपलब्धीसाठी याची जरूर आहे. स्वातंत्र्याची उपलब्धि स्वातंत्र्यासाठी झगडण्यातून निर्माण होणार नाही असा याचा अर्थ नाही. पण स्वातंत्र्याचा झगडा हा स्वातंत्र्याच्या उपलब्धीसाठीच असावा ही जाणीव मानवी चित्तातून मुळांत निसटता उपयोगीचे नाही. पण ती निसटत चालली आहे. अशी शंका निर्माण झाली असल्यामुळें ' स्वातंत्र्याची जबाबदारी पेलण्याची पात्रता माणसांत यावी ' हें बोलले जात आहे.

मार्टिन ल्यूथर किंगनी आपली शंका बोलून दाखविताना म्हटले होते की, माणूस आकाशांत पक्षांसारखा उडू शकतो. समुद्रातल्या पाण्यात माशांसारखा तरंगू शकतो. पण तो माणसाजवळ माणूस म्हणून राहू शकत नाही. किंगच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की, जगाची प्रगति होत असली तरी मानवी सहजीवन अजून शक्य होत नाही. परिवर्तनीय जगांत राहणाऱ्या माणसाने त्याचें नाते अवकाश व आकाशाशी जोडले. समुद्राशी व त्याच्या खोलीशी जोडले. सृष्टीतल्या अज्ञात तत्वाशी जोडले व जोडण्याच्या प्रयत्नांत आहे. यासाठीं तो जाणीव झिजवितो. कष्ट उपसतो. प्राण संकटात लोटतो व अनेकदा प्राणांनाही मुकतो. मानवी सुखांत भर पाडण्याच्या हेतूनेच हे सर्व होते. तरी त्याचे माणसाशी जडावे तसे नाते अजून जडलेले नाही. माणसाचे दुःख पाहून तो दुःखी होतो. त्याची सहानुभूती जागते व दुःखी माणूस सुखी व्हावा हे त्याला वाटते देखील. पण त्याची जागलेली सहानुभूती ही दुःखी माणसाचे दुःख निवारण्यास फारशी सिद्ध होत नाही. पाण्यावर वलये येतात आणि जातात. तसे माणसाच्या चित्तात सहानुभूतीची वलये येत– जात असतात. संवेदनेतली वेदना ही क्षणजीवीच

राहू पाहते. या क्षणजीवी संवेदनेला माणसाशी नाते जोडण्याचे सामर्थ्य नसते. असमर्थ संवेदनतेतून हृदयाचा भाव प्रगटत नाही. हृदयाचा भाव प्रगटविणारी संवेदना भूकंपासारखी व ज्वालामुखीसारखी स्फोटक असते. ती तशी असते म्हणून (गंजलेल्या) प्रस्थापित मूल्यांची मुळें हलू लागतात. उखडू लागतात. चक्रीवादळात उन्मळून पडणाऱ्या झाडांसारखी व कोसळणाऱ्या इमारतींसारखी अवस्था या मूल्यांची होऊन जाते. अर्थात माणसाच्या चित्तात क्षणभर टिकणाऱ्या माणसाविषयीच्या सहानुभूतीला तसा अर्थ नसतो. जो असतो तो देखील माणसाशी नाते जोडण्याच्या पूर्वतयारीचा नसतो. म्हणून मानवी नाते निर्मिणाऱ्या सहानुभूतीची व त्याच्या स्फोटक तत्वाची साठवण मानवी हृदयांत होणे जरूरीचे झाले आहे. यासाठी आजच्या मानवी चित्तात साठलेल्या आकांक्षांना उपसावे लागेल. चित्त निव्वळ रिक्त करावे लागेल. साठलेल्या अशुद्धतेला बाहेर जाण्यासाठी वाट करून दिल्याशिवाय शुद्धतेचे वास्तव्य असंभव असते, तसे चित्तात साठलेल्या आकांक्षांना बाहेर घालविण्यासाठी वाट करून दिल्याशिवाय मानवी नाते पक्के करणाऱ्या आकांक्षेचें स्थान चित्तात निर्माण होणार नाही. शुद्ध पाण्यांत अशुद्ध पाणी मिसळले की ते सर्वच पाणी अशुद्ध होते. शुद्धता ही अशुद्धतेबरोबर नांदू शकत नाही. ती स्वतंत्र असते. म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. तिचे कोणाबरोबर सहविचरण शक्य नाही. तेव्हा मानवी चित्त जसजसे रिक्त होत जाईल, तसतसे चित्तात येणाऱ्या आकांक्षांना टवटवीतपणा व नवेपणा येईल. आकांक्षा साठून राहिल्यामुळेंच ती अशुद्ध होत असते. तशी ती मूळात अशुद्ध नसते. पण आकांक्षांना संदर्भ आहे तोवर त्यांचे प्रयोजन असते. संदर्भरहीत आकांक्षा प्रयोजनकारी नसतात. मानवी चित्तातल्या आजच्या आकांक्षा प्रयोजनशून्य आहेत. म्हणून त्या अशुद्ध बनल्या आहेत. अर्थात या दृष्टीने चित्ताची रिक्तता ही आकांक्षेची शुद्धता असते. चित्तशुद्धीची हीच प्रक्रिया आहे. ही प्रक्रीया सुरू राहिली तरच हृदयाचा स्फोटक भाव प्रगटविणाऱ्या आकांक्षेला चित्तात स्थान राहील. अन्यथा हृदय देखील संवेदनेपासून दूर जाऊं लागेल. हृदय संवेदनशून्य बनेल. यातूनच माणसाचे रूप पालटेल. तो अमानवी होत जाईल. म्हणून तो मानवी सहजीवनाच्या योग्यतेचा उरणार नाही. जंगलचा न्याय चालविणाऱ्या आदि मानवाच्या रूपांत तो दिसू लागेल. तसाच तो असेलही.

हृदयाचा स्फोटक भाव हा कवच फोडून बाहेर पडणाऱ्या शक्तिसारखा असतो. तो बहुदा एकाकी असतो. तरी बंडखोर असतो. म्हणून तो एकाच्या हृदयांत प्रगटला तरी जग हादरून जाते. जगाच्या परिवर्तनाला तो कारणीभूत ठरतो. हा

स्फोटक भाव येशूच्या हृदयात प्रगटला. बुद्धाच्या हृदयात प्रगटला. मार्क्स व गांधींच्या हृदयांत प्रगटला म्हणून ही माणसे सुरुवातीला एकाकी होती. पण जनहृदयाची प्रातिनिधिक होती. जनहृदयाचा प्रत्येक अंश त्यांच्यात सामावला होता. म्हणून ते एकाकी बाहेर पडले तरी सर्व जग थरारून गेले. प्रस्थापित सत्तेचे आसन हलू लागले. मानवी मुक्तीची प्रक्रिया जगांत सुरू झाली. नवी जीवनमूल्ये जगात प्रस्थापित झाली. हृदयाचा स्फोटक भाव हा असा परिणामकारी ठरलेला मानवी इतिहासात पाहता येतो.

स्वातंत्र्यप्रियता हें माणसाचें वैशिष्ट्य जरी असले तरी मानवी संबंधांतून तें प्रगट झाले पाहिजे. तें या संबंधांविना प्रगट होऊं शकेल कदाचित. अव्यक्ताचा ध्यास धरणारा माणूस स्वातंत्र्य अनुभवील देखील. पण यातून मानवी संबंध स्वातंत्र्याचे बनतीलच असे नाही, उलट तसे ते बनणार नाहीत हेच आजवर प्रत्ययाला आले. अव्यक्ताच्या पातळीवर वावरणाऱ्या माणसाच्या चित्ताला अिहलोकाचे आकर्षण कमी असते. किंबहुना नसते. अर्थात परलोकाच्या आकर्षणाने त्याचे चित्त व्यापलेले असते. अशा चित्ताने मानवी संबंध प्रस्थापित होत नाहीत. उलट मानवी संबंधात द्वैत निर्माण होते. हे द्वैत पुढे जाऊन ( वर्ग, वर्ण, भाषा व जाती ) भेदाचे रूप धारण करूं लागते. तेव्हा, सुसह्य मानवी संबंध ज्यातून निर्माण होतील अशा मानवी स्वातंत्र्याची कल्पना करता आली पाहिजे. असह्य मानवी संबंधांची कल्पना ही स्वातंत्र्याची व अभेदाची नसते. तर दास्य व विभेदाची म्हणून विलगतेची असते. वर्गवादाच्या भयानकतेची असते. म्हणून वर्गीय-स्वातंत्र्य, भाषिक व जातीय स्वातंत्र्य अशा भेदमूलक स्वातंत्र्याची कल्पना ही स्वातंत्र्याच्या संकोचाचीच कल्पना असल्यामुळे, मानवी संबंधांच्या विरोधी व वेगळी असणारी कोणतीही स्वातंत्र्याची कल्पना स्वीकारण्याजोगी नाही.

मानवी सहजीवन हे सुसह्य मानवी संबंधातून निर्माण होईल. पण हेंच मानवी समाजाला अशक्य होत आहे. याशिवायचे सर्व त्याला शक्य होत आहे त्याला जे शक्य होत आहे तें मानवी स्वातंत्र्याच्या अनुभूतीसाठी मोठा अडसर आहे हें अजून त्याच्या लक्षात येत नाही. ज्याला तो स्वातंत्र्य म्हणतो तें त्याच्या अनुभूतीचे नाही. कल्पनेचे व स्वप्नाचे आहे. पण ही कल्पना किंवा तें स्वप्न चित्ताच्या दोषांची प्रतिक्रिया आहे. अर्थात ही प्रतिक्रियाच तो मोठे साध्य समजतो. म्हणून हें मृगजळामागें धावण्यासारखे आहे. पण धावणारा केव्हां तरी थकतोच. तसे माणसाची जाणीव देखील थकली भागली

झाली आहे सध्या ! म्हणून तो अंतरविरोधात ( इनर कॉंट्रॅडिक्शन ) वावरत आहे. परिवर्तनीय जगांत माणसाचे अपरिवर्तनीय रूप अजूनही कायम असणे हा मोठा अंतर्विरोध आहे. हा अंतरर्विरोध सुसह्य मानवी संबंध कधीच निर्माण करणार नाही. म्हणून यातून मानवी समाजाला आग्रहपूर्वक बाहेर यावे लागेल.

● ● ●

## निवडणुका : लोकशाही : लोकमत

'लोकमताचे कांहीहि सांगता येत नाही' असे सहज आपण बोलून जातो. कां तर लोकमताचे निश्चित स्वरूप सांगणे कठीण जाते! ईश्वर अथवा आत्म्याच्या स्वरूपाविषयी जो वाद निर्माण होईल तसाच वाद लोकमताच्या स्वरूपाविषयीहि होऊ शकेल. तरी लोकमत अजमावण्याच्या काही पद्धति आहेत. त्यातल्या कांही पद्धति प्रतिष्ठित गणल्या गेल्या आहेत. लोकमत अजमावण्याची अशीच एक विशिष्ट व प्रतिष्ठित पद्धति म्हणजे निवडणूक असे आपण मानतो. अलिकडेच ओपिनियन पोल सारख्या पद्धतीहि अस्तित्वांत आल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे लोकमत अजमावण्याचीच प्रक्रिया साधली जाते. परंतु लोकमत अजमावणे व लोकमत निर्माण करणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. दोघांचे प्रयोजन वेगवेगळ्या कारणांकरितां आहे. शिवाय लोकमत अजमावणे सहज

शक्य असले तरी योग्य लोकमत निर्माण करणे तसे सहज शक्य नाही. म्हणून योग्य लोकमत निर्माण करण्याकरितां लोकशिक्षणाची आवश्यकता मानली गेली.

भारतीय लोकशाही आपल्या देशांत नावारूपाला येत आहे. पण लोकशाहीच्या आजच्या प्रक्रियेत लोकमताचा प्रश्नच अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. कारण लोकशाहीचे लोकमत म्हणून सांगण्यासारखी वस्तुस्थिति आज या देशात नाही. ज्याला लोकमत म्हणून आपण संबोधतो ते वास्तविक लोकशाहीचे लोकमत नव्हे. कारण, लोकशाहीचा समज ज्या लोकमताला नाही ते लोकशाहीचे लोकमत कसे असू शकेल ? कोणी प्रश्न निर्माण करील की, आज निवडणुकाद्वारे अजमावले जाणारे लोकमत लोकशाहीचे लोकमत नव्हे तर कशाचे ? निवडणुकाद्वारे अजमावले जाणाऱ्या लोकमताचा संबंध लोकशाहीशी फारच थोडा आहे. हेंच या प्रश्नाचे समर्पक उत्तर होय. पण हे प्रश्नाचे परिपूर्ण उत्तर समजले जाण्याची शक्यता कमी आहे. या उत्तराने कित्येकांचे समाधानही होणार नाही. कारण, लोकशाहीच्या लोकमताचा प्रश्न अप्रयोजक असल्याची एक विचित्र मनोभूमिका बहुतेकांची होऊन बसली आहे.

लोकशाहीचा समज असलेले लोकमत म्हणजे काय, व असे लोकमत निर्माण करणे शक्य होईल किंवा कसे, याचा साधार विचार झाला पाहिजे. हा विचार झाला नाही तर या देशातल्या लोकशाहीचा अर्थच बदलून जाईल. लोकांची लोकशाही असा अर्थ उरणार नाही. लोकशाहीचा वेगड मढवलेली कोटली तरी शाही, म्हणजे 'सिंहाचे कातडे पांघरलेले गाढव' एवढाच अर्थ आजच्या लोकशाहीचा उरेल.

स्वातंत्र्याची हमी लोकशाहीमुळे मिळते. हीच लोकशाहीची खरी उपयुक्तता होय. पण स्वातंत्र्य स्वैराचारात परिणत होऊं लागले तर लोकशाहीचा संकोच होत असल्याचे सहजच ठरून जाते. तेव्हा स्वातंत्र्याची एक विशिष्ट मनोवृत्ति असते हे गृहीतच धरले पाहिजे. हीच मनोवृत्ति लोकशाहीचा खराखुरा आधार असते. आता लोकशाहीचा समज म्हणजे काय हे समजायला फारसे कठीण नाही. लोकशाहीचा समज म्हणजे स्वातंत्र्याचा समज आणि लोकशाहीचे लोकमत म्हणजे स्वतंत्र लोकमत. निवडणुकांद्वारे अजमावले जाणाऱ्या लोकमताचा लोकशाहीशी फार थोडा संबंध आहे, हे जे मी वर म्हटले त्याचे कारण हेच की, लोकमत अजून स्वतंत्र नाही. लोकमत स्वतंत्रपणें प्रकटावे असे प्रयत्न केले जात नाहीत.

म्हणजे निवडणुकांद्वारा प्रकट होणारे लोकमत हे खऱ्या अर्थाने लोकशाहीचे लोकमत नव्हे.

लोकमत स्वतंत्र नाही म्हणजे ते लोकशाहीची वृत्तिनिदर्शक नाही. तेव्हा निवडणुकांद्वारे व्यक्त होणाऱ्या लोकमताचे आजचे स्वरूप काय, असा प्रश्न निर्माण होतो. लोकमत स्वतंत्र नसल्याचे अनेक प्रकार आहेत. घटनात्मकदृष्ट्या लोकमत स्वतंत्र नसल्याचा प्रकार हुकूमशाही अथवा कम्युनिस्ट राष्ट्रांतला आहे. भारतात लोकमत घटनात्मकदृष्ट्या स्वतंत्र आहे. विचार अथवा प्रचार स्वातंत्र्याची बंधने असणे हाहि लोकमत स्वतंत्र न ठेवण्याचाच प्रकार होय. याहि बाबतीत भारतांत कोणतीच बंधने लादलेली नाहीत. घटनात्माकदृष्ट्या तसेंच विचार व प्रचारदृष्ट्या या देशांतील लोकमत स्वतंत्र आहे. तरीहि या देशांतले लोकमत स्वतंत्रपणें प्रगट्त नाही, ही समस्या कायम आहे. कारण लोकशाहीच्या लोकशिक्षणाचा संपूर्ण अभाव आहे. विचार आणि प्रचार स्वातंत्र्यांतून लोकशिक्षणाचा प्रश्नच हाताळला जात नाही ही खरी अडचण आहे. म्हणजे विचार आणि स्वातंत्र्याचा लोकशाहीच्यादृष्टीने उपयोग केला जात नसून अन्य संकुचित बाबींकरिता केला जातो व या संकुचित बाबीच लोकशाहीचे लोकमत स्वतंत्रपणे प्रगटण्यास आडकाठी ठरल्या आहेत. म्हणून घटनात्मकदृष्ट्या मिळालेले स्वातंत्र्य उपकारक मार्गाने उपगोगांत आणण्याचा प्रश्न अजून कायम आहे.

या देशांत लोकांचे लोकमत बनविण्यास हवी तशी लोकांची मनःस्थिति आहे काय ? ती निर्माण झाली काय ? ती का निर्माण झाली नाही ? आर्थिक आणि सामाजिक रचनेतील आजच्या स्थितीच्या मुळांत जी कीड लागली आहे, ती कीड या देशांतली मानवी मनःस्थिति आतल्या आत पोखरून पोकळ करीत आहे. क्षयाचा पीडित वरून सुरेख दिसला तरी आंतून तो रोगीच असतो. हेंच या देशातल्या समाजाविषयी देखील म्हणता येईल. यामुळे संकुचित बाबींचा प्रभाव वाढता आहे. संकुचित बाबीपैकीच एक जात जमातीची बाब घेऊ या. अंतर्मुख होऊन विचार केल्यास ही बाब एक मूलभूत बाब वाटणेच अधिक संभवते. कारण जातीय सुरक्षिततेचा जो अनुभव आजच्या माणसाला येतो तो सर्व समाजात येत नाही. म्हणून या देशांतली मोठयात मोठी मंडळी देखील जात जमावापासून अलिप्त नाहीत. जातियवाद वाईट खरा. पण या देशातल्या माणसाला सर्व समाजात राहून सुरक्षिततेच्या व प्रतिष्ठेचा अनुभव घेता येत नाही, तोवर लोकशाहीशी संबंधित अशा सर्व प्रश्नांवर जातीयतेची संकुचित बाजू मात करीत राहील – आजवर

मात करीत आली. तेव्हां, लोकशाहीच्या प्रक्रियेवर प्रभाव गाजविणाऱ्या बाबी संकुचित असल्या तरी दुर्दैव असे की या देशांतला सर्वसामान्य माणूस या बाबी-मुळेच स्वतःला सुरक्षित समजतो हे दृष्टीआड करता येत नाही. जसे जातजमातीत माणूस स्वतःला सुरक्षित समजतो अगदी तसेच तो धर्म व संप्रदायांत स्वतःला सुरक्षित समजतो. त्यामुळे या देशांतले लोकमत जात -जमात तसेच धर्म व संप्रदायाच्या अधीन झालेले असल्यास नवलाचे नाही. नवलाचे असल्यास हे नवल सामाजिक आणि आर्थिक रचनेतल्या दोषांनीच निर्माण केलेले आहे हे लक्षांत घेतले पाहिजे. तेव्हा आजची सदोष सामाजिक आणि आर्थिक वस्तुस्थिति बदलविण्याचा पुरुषार्थ नेटाने होत नाही तोवर लोकशाहीच्या स्वतंत्र लोकमताची अपेक्षा करणे चुकीचे होय.

या देशाच्या दृष्टिने सर्वांत दुःखाची गोष्ट अशी की, निर्दोष किंवा लोकशाहीला अनुकूल अशा आर्थिक आणि सामाजिक रचनेच्या प्रश्नाकडे सामान्य जनता आकर्षिलेली नाही. या दृष्टीने संकल्पाने भारावून गेलेले सामाजिक नेतृत्व उभे झाले नाही. उलट लोकशाही जीवनमूल्यांची आस्था नसलेल्याच्या राजकीय चळ-वळीच यशस्वी ठरतांना दिसतात. अशा चळवळींचाच प्रभाव जनमनावर उमटून जातो. सामाजिक व आर्थिक स्थितीत बदल करण्याचा दृष्टीकोन आजच्या या देशांतल्या राजकीय चळवळीत अभावानेच दिसतो. निषेधात्मक चळवळी पुष्कळ होतात. पण, रचनात्मक चळवळीची प्रतिष्ठा निर्माण केली जात नाही. याचे कारण असे की, कोणत्याही उपक्रमाला राजकीय मूल्य असले पाहिजे, त्याशिवाय तो उपक्रम निर्जीवच होय असा सर्वसाधारण समज होऊन बसला आहे. या राजकीय मूल्यांच्या हव्यासामुळेच आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचा प्रश्न मागे पडून आहे. राजकीय मूल्यांची प्रतिष्ठा आजच्या सारखीच वाढती राहिली तर राजकीय सत्तेतच आजची लोकशाही कोंडली जाईल व कोंडमार होऊन लोकशाहीचे प्राण कंठांत येतील. या प्रश्नाकडे क्षुल्लक बाब म्हणून पाहणे योग्य नव्हे. कारण, लोकशाही राजकीय सत्तेच्या मर्यादेत अडकून राहिल्यास लोकशाहीला व्यक्तिस्वातंत्र्यापासून आज ना उद्या वेगळे व्हावे लागेल. व स्वातंत्र्याशिवाय लोकशाही म्हणजे आई-शिवाय मूल अशी स्थिति निर्माण होईल. जीवनाची प्रत्येक बाब राजकीय सत्तेच्या आवरणाखाली येत आहे. प्रसिद्ध पत्रकार व विचारवंत श्री. पां. वा. गाडगीळांनी एका ठिकाणी म्हटले आहे की, स्वराज्य मिळण्यापूर्वी खाजगी जीवनांत कायद्यांचा हस्तक्षेप केवळ पांच टक्के होता. आज तो हस्तक्षेप पंचावन्न टक्केपर्यंत वाढला आहे. असाच खाजगी जीवनांत कायद्याचा हस्तक्षेप वाढत राहिल्यास या देशांतल्या लोकांचे खाजगी जीवनच संपुष्टात येईल. हा लोकशाही व्यवस्था राजकीय सत्तेत

अधिकाधिक गुरफटत असल्याचाच परिणाम नव्हे काय ? तेव्हा या देशातले लोक-मत राजकीय असून चालणार नाही. हे स्वतंत्र राहून लोकशाही अनुकूल सामाजिक व आर्थिक रचनेस कारणीभूतहि ठरले पाहिजे. अर्थात याकरिता लोकशाहीच्या जीवनमूल्यांचे आकर्षण लोकांत निर्माण व्हावे लागेल. आजचे लोकमत लोकशाही जीवनमूल्यांची आस्था नसलेले म्हणजे केवळ राजकीय आशय असलेले लोकमत आहे. अशा लोकमताला लोकशाही व स्वातंत्र्याची तमा राहू शकत नाही. लोकशाही व स्वातंत्र्याशी संबंध नसलेले डावे कम्युनिस्ट केरळात बंदिस्त राहूनहि निवडून येऊ शकले. याचा अर्थ काय करावयाचा ? लोकमताला लोकशाहीची जाग आहे असा करायचा काय ?

तेव्हा, आज तरी या देशातले लोकमत म्हणजे एक चिंतेचीच बाब आहे व ही चिंता राजकीय सत्तेच्या आकर्षणामुळे वाढली आहे. ती कमी करता येत नाही. जोपर्यंत लोकमत लोकशाहीच्या समाजाने परिपूर्ण करता येत नाही, तोवर लोकशाहीचा आकार व आशय असलेले लोकमत निर्माण होणार नाही. एकीकडे सदोष सामाजिक व आर्थिक रचनेमुळे लोकमत संकुचित स्वार्थाकडे झुकले आहे. दुसरीकडे अशा लोकमताला लोकशाहीचा आकार व आशय नसल्यामुळे, लोकशाहीविरोधी प्रवृत्तींना अनुकूलता प्राप्त होत असल्याचे आत्मविश्वासपूर्वक बोलले जात आहे. अर्थात ही स्थिति लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय चिंताजनक होय असेच कोणत्याहि लोकशाहीप्रेमी व्यक्तीला वाटेल.

„लोकशाहीचे लोकमत किंवा स्वतंत्र लोकमत ही एक आज दुर्मिळ बाब होऊन बसली आहे. याविषयी पुन्हा फारसे सांगायला नको. पण अशा लोकमताच्या अभावी लोकशाहीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे याची विशेष रूपाने दखल घेतली जात नाही याचे वाईट वाटते. कारण लोकशाहीवर वेळोवेळी विश्वास व्यक्त करणाऱ्या या देशांतल्या राजकीय संघटनांना लोकमत स्वतंत्र राहावे असे वाटत नाही. सत्तारूढ अथवा विरोधी अशा सर्व राजकीय संघटनांना राजकीय सत्तेचे जेवढे आकर्षण आहे तेवढे स्वतंत्र लोकमताचे आकर्षण नाही. तेव्हा, पर्यायाने या कोणत्याच राजकीय संघटनांचा लोकशाहीवर विश्वास नाही असाच निष्कर्ष काढता येऊ शकतो. पण, असा निष्कर्ष काढणे म्हणजे या राजकीय संघटनांचा रोष पत्करणेच होय. परंतु हे लक्षांत घेतले पाहिजे. की, या देशातली सामान्य जनता कोणत्याच पक्षाची नाही. तिच्यावर प्रभाव टाकून सत्ता बळकाविली जाते. पण या सर्वसामान्य जनतेच्या मतांचा

प्रभाव अजून या पक्षावर पडत नाही. तो पडावा व लोकशाहीचे किंवा स्वतंत्र लोकमत प्रगटावे याची धडपड सुरू झाली पाहिजे. समाजात तटस्थ व सज्जन समजला जाणारा वर्ग पुष्कळ काही करू शकतो व आजची राष्ट्रव्यापी निराशा टाळू शकतो. हे घडावे, सज्जनांना जाग यावी व सज्जनांनी सर्व सामान्य जनतेला जागवावे, हीच गणराज्याची मागणी आहे. हाच गणराज्याचा संदेश आहे. स्वतंत्र जनमत हाच गणराज्याचा भक्कम पाया होय. तो सातत्याने व आत्मविश्वासपूर्वक भरत राहीला पाहिजे, हेच लोकशाहीप्रेमी लोकांचे आद्य कर्तव्य होय.

• • •

## राजनीति नको लोकनीति हवी

राजकीय अस्थिरता हा एक चिंतेचा विषय झाला आहे. पण अस्थिर-तेत स्थित्यंतर अंतर्भूत आहे. म्हणून सुयोग्य परिवर्तनाला अस्थिरता उपकारकहि ठरू शकते. तरीहि जडतेने बंदिस्त झालेली जाणीव अस्थिरतेची भीति बाळगून आहे. अशा जाणीवेला राजकीय अस्थिरता भेडसावून सोडीत आहे, असे भारताची आजची राजकीय परिस्थिति अवलोकिल्यास दिसते.

पक्षराजकारणाचा अनिर्बंध पुरस्कार या देशाने केला. पण पक्षराजकारणाचा लोकशाहीच्या दृष्टिने कितपत उपयोग होण्यासारखा आहे या बाबतीत दक्षता मात्र घेता आलेली नाही. म्हणून पक्षराजकारणातून ( पार्टी पॉलिटिक्स ) उद्भवलेल्या राजकीय प्रश्नांचे स्वरूप आज लोकशाहीला भीतीच्या गर्तेत लोटीत आहे. पक्षराजकारणाची राजकीय स्थित्यंतरे ही लोकशाहीच्या सुदृढ वाढीकरता

कधीच उपयोगी असणार नाहीत हे आजवर ओळखताच आलेले नाही. आता मात्र लोकशाहीच्या सुदृढ वाढीचे लक्षण ओळखणे अपरिहार्य होऊन बसले आहे. म्हणून लोकशाही व पक्षराजकारणाच्या मर्यादा निश्चित केल्या पाहिजेत व या दोहोंचा परस्पराशी असलेला संबंध पुन्हा एकदा पडताळून घेतला पाहिजे. लोक-शाहीला पक्षराजकारणाच्या स्वाधीन न करता मानवी स्वातंत्र्याची व विकासाची प्रेरणा म्हणूनच मानवी चित्तात तिचे स्थान अबाधित राहिले पाहिजे या दृष्टीने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

पक्षराजकारणाचा अनिर्बंध पुरस्कार केल्यामुळे लोकशाही पक्षराजकारणाच्या स्वाधीन झाली. म्हणजे यामुळे लोकशाही पक्षराजकारणावर अवलंबून राहू शकली. हीच भारताच्या लोकशाहीची खरोखुरी दुर्बल अवस्था होय. ही अवस्था पक्ष-राजकारणातल्या सत्तेच्या हव्यासामुळे झालेली आहे. म्हणून सत्तेची विशिष्ट प्रकारची मक्तेदारीहि या अवस्थेतून निर्माण झाली. अर्थात पक्षराजकारणाला लोकशाहीचे व लोकशाहीच्या गुणवत्तेचे आकर्षण राहिले नाहीच पण राजकीय सत्तेचे आकर्षण अधिकाधिक वाढत गेले. यामुळेंच पक्षराजकारणातून लोकशाहीच्या गुणवत्तेचे स्थान कमी होत होत शेवटी नाहीसे झाल्यासारखे आज दिसते.

पण हे असे का घडत आहे ? या प्रश्नाचे उत्तर मानवी प्रवृत्तीत शोधले पाहिजे. या प्रश्नाशी केवळ मानवी प्रवृत्तीचाच सरळ संबंध येतो. अर्थात मानवी चित्तात जे आकर्षण उभे होईल त्यांतूनच ( माणसाला ) बऱ्या वाईट पोषक व घातक घटना घडत जातील. पण या मानवी चित्ताकडे संपूर्ण दुर्लक्ष करून राजकारणाची दिशा निर्माण केली जाते व माणसाला फरफटत या दिशेने ओढलेही जाते. मानवी चित्ताची दारे बंद करून माणसाची विचारशक्ति क्षीण केल्यास त्यावर सत्ता गाजविणें शक्य आहे हे धूर्त राजकारण्यांच्या लक्षांत आले असावे. अशा राजकारण्यांनीच माणसाचा उपयोग त्यांची मक्तेदारी निर्माण करण्यास आज-वर करून घेतला. पण यांतून माणसाची सुटका झाल्याशिवाय राहणार नाही. कारण माणसाला सर्वात प्रिय त्याचे स्वातंत्र्य आहे.

पक्षराजकारण व त्यांतील सत्ता माणसाच्या स्वातंत्र्याला कधीच पोषक राहणार नाहीत हे लक्षांत घेऊन माणसाचा राजकारणाशी व राजकीय व्यवहारांशी संबंध प्रस्थापित व्हावा. या संबंधाने मनुष्य राजकारणाच्या स्वाधीन न होता तो स्वतंत्र असावा व राजकारण कोणत्याही मक्ते-दारांच्या स्वाधीन न राहता मानवी गुणवत्तेच्या स्वाधीन राहावे अशी रीत अव-

लंविली गेली पाहिजे. या रीती-अभावीच आजच्या राजकारणांतले दोष जाणवत आहेत व हे दोष माणसाला गुलाम करतील अशी भीतीही निर्माण झाली आहे. म्हणून राजकारणातली पक्षनिष्ठा ही सत्तानिष्ठा होता कामा नये. पक्षनिष्ठा लोकशाहीनिष्ठाच असावी. याविषयी सर्वांचे एकमत झाले पाहिजे. यामुळेंच भारतीय समाज स्वातंत्र्य अनुभवू शकेल.

पण पक्षनिष्ठा ही लोकशाहीनिष्ठा व्हावयाची कशी ? पक्षनिष्ठा ही सत्तानिष्ठा बनलेली आहे म्हणून हा प्रश्न निर्माण झाला. सत्तेच्या आकर्षणांतून पक्षाची मुक्तता होणे म्हणजे लोकशाहीनिष्ठा होय. पण मग पक्षाचे प्रयोजनच काय, असा प्रश्न निर्माण होतो. आणि लोकशाहीत पक्षाचें प्रयोजन आहे किंवा कसे हाच खरा विचार करण्याचा प्रश्नही उपस्थित होतो. पक्षाचे प्रयोजन सत्तेकरताच मानले गेले व मानले जाते. आणि लोककल्याण हे पक्षराजकारणाचे उद्दिष्ट वारंवार घोषित करून लोककल्याणाच्या दिशेने सत्तेला राबवायचे हे विनचूकपणें सांगितलेही जाते. म्हणजे पक्षाचे प्रयोजन लोककल्याणासाठी आहे हे ठरले. पण लोक-कल्याणाचा उद्देश हा लोकशाहीचा उद्देश असू शकत नाही. कारण लोककल्याण हें मानवी स्वातंत्र्याशी सुसंगत असेलच याची खात्री देता येत नाही. उलट लोक-कल्याणाचा उद्देश माणसाच्या स्वातंत्र्याला संकोच करूनच गांठता येतो हे कल्या-णकारी राज्यांचा कारभार पाहिल्यास कळण्यासारखे आहे. तेंव्हां लोककल्याण आणि लोकशाही या दोहोत जे मूलभूत अंतर आहे त्याचा बोध पक्षराजकारणाला अजून झालेला दिसत नाही. म्हणूनच लोककल्याण हेंच लोकशाहीचे उद्दिष्ट सम-जले जात आहे. पण लोककल्याण हे लोकशाहीच्या उद्दिष्टाहून निश्चितपणें भिन्न आहे. राजा व एखादा हुकूमशहा देखील लोककल्याण साधू शकेल. माओ देखील त्याच्या कुंपणात 'सहस्त्रफुलें फुलोत' म्हणतो. मानवी व्यक्तित्वाचा नाश ( ब्रेन-वॉश ) करून त्यांच्या भौतिक गरजा पुऱ्या करणे म्हणजे कल्याण साधणें होय अशी स्थूल कल्पना कल्याणाची आहे. अर्थात माणसाच्या आत्मविष्काराला जेथे संधी नाही अशा कल्याणाची कल्पना लोकशाहीत असू शकत नाही. उलट लोकशाहीत आत्मविष्काराचीच कल्पना असू शकते. म्हणून मानवी स्वातंत्र्याचें महत्व सर्वाधिक आहे. कारण, यामुळें मनुष्य उच्चतम जीवनाचा अनुभव घेण्यास स्वतंत्र असतो. आणि हें उच्चतम जीवन म्हणजे केवळ भौतिक जीवन नसून संस्कृतिप्रधान मानवी जीवन होय. या जीवनात कल्याणाची कल्पना स्थिर होवू शकत नाही. कारण कल्याण कल्पनेला गुलामीचा आशय प्राप्त झाला आहे. आणि तो स्वातंत्र्याला निश्चितपणें बाधक आहे.

परिवर्तनाची लोकशाहीमूलक स्थिति कोणत्या प्रेरणेतून निर्माण केली जाऊ शकेल - हा एक अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. कारण प्रगतीसाठी परिवर्तन अनिवार्यच असते. पण समाजाची गतिमान व प्रगतिमान स्थिति निर्माण करतांना लोकशाही मूल्यांचा पाठपुरावा करणारी प्रेरणा बाजूला पडता कामा नये. आणि लोकशाहीची अशी प्रेरणा निश्चितपणे कोणती असू शकेल हे ठरविणे देखील अजून शक्य झालेले नाही आम्हाला! राज्य ही एक परिवर्तनाची प्रेरणा मानली जाते. पण ही प्रेरणा आजपर्यंत लोकशाहीच्या मूल्यांचा पाठपुरावा करूं शकलेली नाही. तसा इतिहास नाही. म्हणून राज्यपरिवर्तनाची प्रेरक शक्ति असूनही या शक्तीचा अनिर्बंध उपयोग राज्यवादाच्या समर्थनासाठीच होतो हे भारतीय लोकशाहीच्या परिस्थितीतही सत्य आहे. म्हणून परिवर्तन व प्रगतीच्या दृष्टिने राज्यावर कितपत अवलंबून असावे हे ठरविण्याची वेळ आतां समीप येऊन ठेपली आहे. भारतात राज्याची क्षमता हीच परिवर्तन व प्रगतीची क्षमता आज तरी ठरलेली आहे. यामधें लोकांची क्षमता किंवा लोकाभिक्रम कुठेच दिसत नाही. भारतीय समाज हा राज्यावर व राज्याच्या कार्यक्रमांवर सतत अवलंबून राहू लागला तर लोकशाहीवर राज्यवाद प्रभुत्व गाजवीलच ! या प्रभुत्वाचा अर्थ काय होते हें सर्वांना सहज कळण्यासारखे आहे. लोकशाहीवर राज्यवादाने प्रभुत्व गाजविल्यास लोकशाहीचा संकोच होत होत ती नाहींशी होते हे समजणें कोणालाही कठीण नाही. म्हणून परिवर्तनाची व प्रगतीची प्रेरणा राज्यशक्तीच्या ऐवजी लोकशक्ती असली पाहिजे. राज्यशक्तीला ( खराखुरा व लोकशाहीला सर्वस्वी अनुकूल )पर्याय लोकशक्तीच आहे. पण ही लोकशक्ती भारतात तरी प्रगटलेली नाही. म्हणून राजकीय अस्थिरतेचे परिणाम या देशाला जाणवतात. क्रियाशील पण सुबुद्ध लोकशक्ति या देशांत प्रगटली असती तर राजकीय अस्थिरतेमुळे होणाऱ्या कोणत्याच वाईट परिणामांची भीती बाळगताच आली नसती. म्हणून राजकीय अस्थिरतेमुळे वाटणारी भीती ही खरी लोकशक्तीच्या अभावाची भीती होय.

पक्षनिष्ठा ही सत्तानिष्ठा झाली त्याचवेळी लोकशक्ति पक्षनिष्ठेपासून वेगळी पडली व ती पोरकी झाली. पण लोकशक्तीच्या पोरकेपणातूनच आता लोकशाहीचे प्राण कंठांत येऊ लागले आहेत, कारण पक्षांना लोकनिष्ठेचे पालन पोषण करता आले असते तर सत्तेचे आकर्षणच निर्माण झाले नसते. सत्तेच्या आकर्षणांतूनच पक्षनिष्ठा ही सत्तानिष्ठा ठरली हे खरे की नाही ? तेव्हां पक्षराजकारणाने राज्यवादाचा जो ऊठसूट पुरस्कार केला व लोकनिष्ठा घालवली, त्याच्या परिणामातून लोकशाही संकटात आलेली आहे. ही

जाणीव ज्या क्षणाला होईल त्या क्षणापासून लोकशाहीचे भवितव्य सुरक्षित होईल. पण पक्षवादी अजूनही राज्यनिष्ठा बाळगून आहेत. त्यांना राज्यनिष्ठेवाचून पक्षवादाचे प्रयोजनच वाटेनासे झाले आहे. म्हणजे पक्षाचे प्रयोजनच मुळीं राज्यसत्ता काबीज करण्यासाठी आहे असे पक्षवाद्यांना मनोमन वाटते. पण राज्यनिष्ठेमुळे लोकशाहीची मूल्यें जळून जातात. तशी ती आजच्या पक्षीय भूमिकेमुळे जळालेली आहेत हें प्रांजळपणें कबूल केले जात नाही याचेच खरे वाईट वाटते- आणि म्हणूनच लोकनिष्ठा जोपासणे देखील अशक्य झाले आहे. तेव्हां, पक्षनिष्ठेला व त्यातल्या राज्यवादाला पर्यायी शक्ति म्हणून लोकनिष्ठा उभी राहील व पक्षसत्तेशी झुंज घेईल त्याच दिवशी लोकशाहीच्या सुरक्षिततेची हमी देता येईल आणि तो दिवस मला तरी जवळ दिसतो. लोकशाहीच्या सुरक्षिततेकरता लोकाभिक्रम जागृत व्हावाच लागेल. म्हणून सुबुद्ध लोकशक्तीचे संघटनही व्हावे लागेल. हे संघटन झाले तर लोकशाहीमूलक परिवर्तन व प्रगतीचा मार्ग मोकळा होतो. अर्थात राज्यवादी प्रेरणेचा संकोच होऊन लोकाभिक्रमाची प्रेरणा प्रतिष्ठित करणें हाच लोकशाहीला तारण्याचा मार्ग होय आणि हीच आजची लोकनीती असावयाला पाहिजे. म्हणून आज पक्षनीती-राजनीती नको तर लोकनीती हवी. ती निर्माण करता आली पाहिजे.

● ● ●

## लोकशाहीची रक्षक : लोकशक्ति

भारताच्या अस्थिर राजकीय परिस्थितीने लोकशाहीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण केला आहे असे विचारवंतांना वाटते. अर्थात हा प्रश्न निव्वळ लोकशाही पद्धतीच्या राज्यकारभाराशीच संबंधित नसून तो भारतीय स्वातंत्र्याशीहि संबंधित आहे. तेव्हां लोकशाहीच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा भारतीय स्वातंत्र्याच्या सुरक्षिततेचाहि प्रश्न ठरतो. म्हणजे हा प्रश्न व्यापक प्रमाणांत विचारात घेण्याचा आहे. तो निव्वळ राजकीय वर्तुळात गुंतवून ठेवण्याचा नव्हे. राजकीय वर्तुळांत गुंतवून ठेवल्याने आजवर त्याच्या वास्तविक स्वरूपाचे दर्शन आम्हाला झालेले नाही. ही वस्तुस्थिति आम्ही दृष्टिआड करू नये. यादृष्टीने विचारवंतांचा या बाबतचा दृष्टिकोन आजच्याहून अधिक स्वच्छ व्हावयाला पाहिजे. लोकशाहीच्या सुरक्षिततेचा विचार बहुधा राजकीय परिस्थितीचा आधार लक्षांत घेऊनच केला जातो. निदान आज तसा विचार केला जात

आहे. राजकीय परिस्थिती खेरीज इतर अनेक महत्वाचे आधार आजच्या परिस्थितीत उपस्थित आहेत. पण त्या आधारांकडे आमचे म्हणावे तसे लक्ष नाही. अर्थात या आधारांच्या वस्तुस्थितीचा विचार नीट झाला तर राजकीय परिस्थितीतल्या आधारांचा विचार गौण ठरण्याची शक्यता आहे. उलट राजकीय परिस्थितीतले आधार पुष्कळ बाबतीत फसवेही असू शकतात. आणि हे आधार खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या सुस्थितीचे आधार नसतातच ! तरीही हेच आधार मूलभूत मानून लोकशाहीच्या सुरक्षिततेचा विचार आपण करीत असतो. तेव्हा या दृष्टिकोनात मूलतः फरक केला पाहिजे. या दृष्टीने राजकीय परिस्थितीतल्या आधारांची मर्यादा आम्हांला कळली पाहिजे. त्या शिवाय लोकशाहीच्या सुरक्षिततेचा मूलाधार आपण शोधू शकणार नाही, गाठू शकणार नाही.

लोकशाहीतल्या सत्तापरिवर्तनामुळे राजकीय अस्थिरता आली की ती लोकशाहीला घातक असते, असे साधारणपणे आज मानले जात आहे. पण सत्तापरिवर्तनाने आलेली राजकीय अस्थिरता खऱ्या अर्थाने लोकशाही दृढमूल करणारीही असू शकते.पण सत्तापरिवर्तनाचा उद्देश हा लोकशाही दृढमूल करण्याचा असला पाहिजे एवढेच ! भारतात आज होत असलेले सत्तापरिवर्तन, लोकशाहीला धोकादायक आहे ते तिच्या परिवर्तनशीलतेमुळे नसून, परिवर्तनाचा उद्देश सत्ताकांक्षा, सत्ता स्पर्धा व सत्तालोलुपवृत्ति हा असल्यामुळे होय. तेव्हा लोकशाहीला राजकीय परिवर्तनाची अस्थिर स्थिति धोकादायक नसते तर परिवर्तनातली सत्तालोलुपवृत्ति धोकादायक असते हे आधी आम्हाला स्पष्ट झाले पाहिजे. अर्थात लोकशाहीच्या आशयाने परिपूर्ण झालेले लोकमत निर्माण झाल्यास, ते निर्माण करता आल्यास होणारे कोणतेहि सत्तापरिवर्तन लोकशाहीला समृद्धच करील. पण आज या देशापुरता तरी हाच खरा प्रश्न आहे. या देशात लोकशाहीच्या आशयाने परिपूर्ण असलेले लोकमत अजून तरी निर्माण झालेले नाही. एवढेच काय लोकशाहीचे लोकमत या देशांत आहे, हे म्हणणे देखील चुकीचेच ठरेल. तेव्हां आम्हाला नावापुरती लोकशाही मान्य होऊ शकली पण लोकशाहीची जीवनदृष्टि मात्र आम्हाला मान्य होऊ शकलेली नाही. आणि ही जीवनदृष्टि सामाजिक स्तरावर फुलत व फळत नाही तोवर नुसती राजकीय लोकशाही ( जी निव्वळ प्रतिनिधिशाहीच आहे ) उपयोगाची नाही. उलट राजकीय लोकशाहीच्या गतिमान स्थितीमुळे लोकशाहीचा राज्यकारभार आशयहीन ठरलेला आहे. आणि तो या देशातल्या मानवी स्वातंत्र्याला फार मोठ्या प्रमाणांत धोकादायकहि आहे. कारण; या राजकीय लोकशाहीने प्रगतीची धुरा राज्यशासनावर ठेवली आहे. म्हणजे

सामाजिक पातळीवर लोकांनी ही धुरा स्वतःकडे घेतलीच नाही. लोकांचे भवितव्य राज्यशासनाच्या कृतीवर अवलंबून ठेवले गेले, सामाजिक परिवर्तनावर नव्हे. राज्यशासनाची कृति ही शासनातल्या व्यक्तींच्या वृत्तीवरच अवलंबून आहे– सामाजिक वृत्तीवर नव्हे. म्हणून राज्यशासनातल्या व्यक्तींची सत्तावृत्ती जास्तीत जास्त सर्वंकष होत जाऊन सामाजिक जीवन स्वतःच्या मुठीत ठेवण्याची महत्वाकांक्षा या व्यक्तींच्या चित्तात घर करून राहू शकली. याचमुळे सत्तेचे आकर्षण या देशांतल्या प्रत्येक व्यक्तीला वाटू लागले आहे. सत्तेमुळेच सर्व परिवर्तन येऊ शकेल असा विश्वास होऊन बसला. तेव्हां लोकशाहीला सुरक्षित करावयाचे असल्यास सर्वप्रथम लोकशाही वृत्तीला धोकादायक असणाऱ्या राज्यसत्तेचे आकर्षण कमी केले पाहिजे, नव्हे राज्यसत्तेचे अवमूल्यन होत गेले पाहिजे. प्रगतिशील समाज व राष्ट्र निर्माणाचे माध्यम राजकीय सत्ता व त्या सत्तेतल्या व्यक्ती नसून समाजजीवनाशी निगडित असलेला सामान्य माणूस व त्याचा समाज हा खरा प्रगतीचा माध्यम ठरला पाहिजे. राज्य-सत्तेचे अवमूल्यन होऊन या माध्यमाच्या मूल्यांची प्रतिष्ठापना झाली पाहिजे. तेव्हां सामान्य माणसाची चित्तवृत्ति व त्याची जाणीव लोकशाहीच्या दृष्टीने संस्कारित झाल्यशिवाय व या वृत्ति व जाणिवेला सामाजिक तथा राजकीय घटनांचा बोध होऊन स्वतःची लोकशाहीमूलक निर्णयशक्ति या माणसाला निर्माण करता आल्या-शिवाय लोकशाही व सामाजिक स्वातंत्र्य यांना भवितव्यच राहणार नाही. अशा चिंतनाचा आजच्या विचारपद्धतीत फार मोठा अभाव आहे. राज्यसत्तेच्या मूल्याविना लोकशाही स्वतःचे अस्तित्व सिद्ध करू शकत नाही असा अट्टाहास आजच्या लोकशाहीविषयक विचारपद्धतीत प्रामुख्याने दिसतो. म्हणून राज्याचा, सत्तेचा, राज्यकारभाराचा व या सर्वांच्या परिवर्तनामुळे निर्माण होत असलेल्या वस्तुस्थितीचा मागोवा ही विचारपद्धति घेत आली. परंतु सामान्य माणसाच्या चित्तवृत्तीला व त्याच्या लोकशाहीविषयक अभिव्यक्तीला ही विचारपद्धती साधा-रणपणें स्पर्ष करीत नाही असेच आज दिसतें.

तसे पाहता सामान्य माणूस जसा आहे तशी आजची लोकशाही आहे. आरशांत आपले रूप असेल तसे दिसेल. तेव्हा, आपले रूप सुंदर दिसावे असे वाटत असल्यास आरशांत बदल करून उपयोग नाही. आपले रूपच तसे घडविले पाहिजे – जेणे करून तें आरशांत सुंदर दिसेल. जात – जमात, धर्म, भाषा, प्रदेश, संप्रदाय, आर्थिक लोभ व अशाच अनेक बाबी पुढें करून मतयाचना करणाऱ्या व मतदान करणाऱ्या समाजात लोकशाहीचे स्वरूप संकुचिततेपासून अलिप्त कसे राहील? मत विकणारा मतदार या देशांत जोवर आहे, तोवर देशाचे ब्रीद विकणारे नेतृत्वही

संभवनीय आहे. या देशांत मतदान केले जात नाही. आमीष दाखवून मतें बळकावली जातात. अर्थात नेतृत्व मते बळकावणारांचे निर्माण होत असते. तेव्हा, समान्य माणसात लोकशाहीची खरी अभिरूचि निर्माण झाल्याशिवाय व ती निर्माण केल्याशिवाय लोकशाहीच्या सुस्थितीची आम्ही कल्पनाच कां करावी ?

तात्पर्य असे की, लोकशाही संकुचिततेपासून अलिप्त असावी असे वाटत असल्यास सामान्य माणसातली संकुचितता घालवली पाहिजे. थोडक्यांत सामान्य माणसाने 'स्व'-रूप पाहिले पाहिजे. सामान्य माणसाने 'स्व'-रूप पाहिले की सत्तेचे जे अवास्तव महत्व वाढले आहे त्याच्या मुळाशी तो स्वतः आहे हे त्याच्या लक्षात येईल. त्याची निष्क्रियता परिस्थितीला कारणीभूत आहे हे त्याला कळेल. हेंच दुसऱ्या भाषेत सांगावयाचे तर लोकशाहीच्या कारभारात लोकांचा सहभाग (पार्टिसिपेशन) वाढला पाहिजे. लोकशाहीच्या कारभारात लोकांचा सहभाग निर्माण करणे (पार्टिसिपेटिंग डेमॉक्रसी) हाच सत्तावादाचे महत्व कमी करण्याचा खराखुरा उपाय होय, आणि हेंच लोकशाहीतल्या समजाच्या प्रगतीचे माध्यम होय.

लोकजीवन लोकशाहीने ओतप्रोत होण्याकरता लोकांचा लोकशाहीच्या राज्यकारभारात सहभाग हवा. अर्थात हा सहभाग निर्माण करतांना भाषिक, प्रादेशिक, धार्मिक, आर्थिक हितसंबंध सुरक्षित करण्याची कल्पना टाळता येण्यासारखी नाही. कारण, लोकशाही लोकजीवनात जसजशी प्रसरण पावेल तसतशी ती लोकजीवनातल्या प्रश्नांच्या संपर्कात येईल. ती अशी संपर्कात आल्यामुळे तिचे रूप पालटेल अशी भीति बाळगणे योग्य नव्हे. कारण, समाजातल्या सर्व स्तरातल्या घटकांना लोकशाहीचे फायदे मिळण्याची तरतूद करताना त्या घटकांच्या स्वातंत्र्याचाही विचार करावाच लागेल. शेवटी लोकशाही ही प्रत्येकाच्या स्वातंत्र्य रक्षणाकरताच नाही काय ? ज्याचे त्याला स्वातंत्र्य देणें, तशी संधि निर्माण करणे हे खरे लोकशाहीचे कार्य होय. अर्थात हे स्वातंत्र्याला बाधक ठरूं नये एवढा विवेक पाळता आला पाहिजे. तेव्हां, आज दिसणारे अनेक वाद- भाषावाद, प्रदेशवाद, जातीयवाद आदि- हे सर्व हितसंबंध सुरक्षित करण्याची क्षमता असलेल्या राष्ट्रीय नियोजनांच्या अभावी निर्माण झालेले आहेत. अर्थात लोकशाही लोकांपर्यंत पोचवायची तर लोकांच्या जीवनाशी, भावनांशी निगडित अशा वस्तुस्थितीचाही विचार करता आला पाहिजे व लोकजीवनाची या देशात फुलणारी-फळणारी विविध रूपे सुरक्षित व विकसित करून एकत्र नांदवली पाहिजेत. सर्व वादांना आज उग्र रूप आलेले आहे, पण हें उग्र रूप राजकीय सत्तेच्या

अभिलाषेमुळे आलेले आहे. सर्व प्रादेशिक भावभावनांचे संवर्धन राजकीय सत्तेमुळेच होणार असे वाटून सत्तेच्या प्राप्तीस्तव ईर्ष्या, मत्सर व स्पर्धा निर्माण केली जात आहे. तेव्हा, सांस्कृतिक मूल्यांची जोपासना व वृद्धि राज्यसत्तेच्या माध्यमातून होणार नसून सामाजिक चळवळीतून व सामाजिक परिवर्तनातून होईल, याची जाणीव होण्याची यावेळी खरी गरज आहे. या करिता सत्तानिरपेक्ष उपक्रम या देशांत मोठ्या प्रमाणात निर्माण करता आला पाहिजे. लोकशाहीच्या पद्धतीत सत्तानिरपेक्ष वृत्तींना समावेश झाल्यास ज्या निरनिराळया वादांनी देशाचे ऐक्य धोक्यात आले आहे असे आम्ही म्हणतो, ते टाळता येऊ शकतील.

राष्ट्रीय ऐक्याचा प्रश्न महत्वाचा आहेच; पण हे ऐक्य प्रादेशिक हितसंबंधांवर बंदुक रोखून धरल्याने साधता यावयाचे नाही. प्रादेशिक स्वयंपूर्णता व स्वायत्तता या दोन महत्वाच्या बाबीही लक्षांत घ्याव्या लागतील. स्वयंपूर्णतेकरिता स्वायत्ततेची गरज आहेच. अर्थात ही स्वायत्तता राजकीय हेतूची नसावी. या बाबतीत योग्य ती काळजी घेतली जात नाही म्हणून प्रश्न निर्माण होतो. लोकशाहीत प्रादेशिक स्वायत्ततेचे महत्व नाही असे म्हटले तर खरे देशाचे तुकडे पडतील. तेव्हां, प्रादेशिक स्वायत्ततेचे तत्व आम्हाला मान्यच व्हायला पाहिजे. कारण याचमुळे भारत एक राहील. अमेरिकेत प्रादेशिक स्वायत्तता मान्य झालेली आहे तरी तेथे राष्ट्रीय ऐक्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही. तेव्हां, प्रादेशिक स्वायत्तता ही राष्ट्रीयतेकरिता समस्या ठरणार नसून राष्ट्रीय ऐक्याचा तो उपाय ठरणार आहे. याकरिता राष्ट्रव्यापी सहिष्णुवृत्तीची खरी गरज आहे. यातून एक समन्वयमूलक राष्ट्रीय दृष्टिकोन तयार होईल- ज्याची या देशाला या काळात अतिशय जरूरी आहे.

भारतीय लोकशाहीच्या भवितव्याचा विचार मनात येतो तेव्हां, लोकशिक्षणाच्या निरपेक्ष भावनेची व वृत्तीची खरी उणीव जाणवते. स्वराज्यात राजकीय सत्तास्पर्धा टाळण्याकरिता कॉंग्रेसचे राजकीय स्वरूप संपुष्टात यावे व कॉंग्रेसचा लोकसेवक संघ बनावा या महात्मा गांधींच्या म्हणण्याचा अर्थ पंडित नेहरूंच्या लक्षात आला असता तर कदाचित आज भारतीय लोकशाहीच्या सुरक्षिततेचा भेडसावणारा प्रश्न उपस्थित होता ना. अजून देखील राज्यसत्तेवर अंकुश करणारी लोकशाही-मूलक लोकशक्ति निर्माण करता आल्यास प्रश्न सुटण्यासारखा आहे. सत्तेच्या खुर्च्यांकडे लागलेल्या रांगा लोकशिक्षणाच्या पुरूषार्थाकडे वळवता आल्या पाहिजेत. यामुळे लोकशाहीच्या जीवनमूल्यांची आस्था सबंध देशांत निर्माण करता येईल. लोकशाहीच्या जीवनमूल्यांची आस्था निर्माण करण्याची महत्वाची

कामगिरी यापुढें करावीच लागणार आहे. याकरिता सत्तात्यागाची भूमिकाहि समर्थनीयच नव्हे तर प्रशंसनीय ठरणार आहे. लोकशाही लोकांच्या लोकशाहीजीवननिष्ठेमुळें सुरक्षित होणार की राजकारण व सत्तावाद यामुळें सुरक्षित होणार याचा निर्णय आता केलाच पाहिजे. राजकारण व सत्ताकारण यांत गुंतलेले मन लोककारणाकडे वळवतांना प्रयास पडणार आहेत. अर्थात लोकांच्या मनातल्या सत्तेच्या मान्यता बदलविण्याचे व त्याजागी लोकशाही जीवननिष्ठा स्थिर करण्याचे काम सोपे मुळीच नाही, पण हे करावेंच लागेल. लोकशाहीच्या सुरक्षिततेकरिता तरी करावेंच लागेल. आजचे सर्व प्रश्न राजकारणातल्या सत्तावादामुळे निर्माण झालेले आहेत हे लोकांना पटवता आले पाहिजे. लोकांना राजसत्तेवर अवलंबून ठेवणे लोकशाही वृत्तीला साजेसे नाही याचा उमज राजकीय पक्षांना देखील यावा लागेल. या शिवाय लोकांना स्वातंत्र्याची व त्याकरिता झीज सोसण्याची जबाबदारी घेता येणार नाही. तशी संधि उपलब्ध होणार नाही. " स्वातंत्र्य सर्वांना हवे; पण त्याची जबाबदारी कोणालाच नको," हे जयप्रकाशजींचे म्हणणें आजच्या वैफल्याच्या परिस्थितीत लक्षात घेण्यासारखे आहे.

राज्यकारभाराच्या स्थितीमुळे लोकशाही सुरक्षित होणार नसून लोकांच्या मनातली सत्तेची मूल्यें गळून पडल्याने ती सुरक्षित होणार आहे. अर्थात लोकशाहीच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा लोकशक्तीवर अवलंबून आहे. ही लोकशक्ती अनत्याचारी मार्गानें कशी जागवता येईल याचा उपाय केला पाहिजे. या करिता लोकशाहीवाद्यांनी धडपडले पाहिजे.

• • •

(१.३) ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
[illegible] वि: [illegible]
[illegible] मों: वि: [illegible]

[illegible] ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८२५

## गणराज्याला स्वास्थ्य कसें लाभेल ?

स्फोटक परिस्थिति ही अनेकदा निर्णयाला पोषक ठरते. कारण, अ-निर्णय हीच स्फोटकतेची प्रेरणा असू शकते. हे इतर कोणत्याहि वस्तुस्थितीपेक्षा भारतीय वस्तुस्थितीस अधिक जुळणारे आहे असे दिसते. अलिकडे अनेक प्रश्नांना स्फोटक स्वरूप आले आहे. यामुळे भारताच्या एकात्मतेविषयी शंका निर्माण केली जात आहे. पण ही शंका वास्तविकतेत बदलू पहते म्हणून एकात्मतेचा प्रश्न अधिक प्रमाणात जाणवू लागला आहे. हा प्रश्न अधिक प्रमाणात जाणवतो तरी तो द्विराष्ट्रवादाच्या पुरस्कारातून निर्माण झाला आहे हे लक्षांत घेतले पाहिजे. अर्थात द्विराष्ट्रवादाच्या पुरस्कारातून स्वराज्य साकार झालेले आहे याकडे दुर्लक्ष होता कामा नये. भारताचे खंडित स्वरूप हाच याचा खराखुरा पुरावा नव्हे काय? खंडित-भारताचे (खंडित) स्वराज्य ही स्वराज्याची अपूर्णता होय. ही अपूर्णता कधीच कोणाला स्वस्थता अनुभवू देणार नाही. म्हणून भारताचे

गणराज्य स्वस्थतेचे सुख उपभोगू शकणार नाही. तेंव्हा, भारताच्या संपूर्ण स्वराज्याचा व अखंडतेचा प्रश्नच मुळांत समर्थपणें विचारता घ्यावा लागेल. तो विचारात घेतला गेला तरच स्फोटकतेचा वाईट परिणाम टाळता येऊं शकेल व भारताच्या गणराज्याला स्वस्थता लाभावी याची शक्यता निर्माण होईल. म्हणून आजची स्फोटक वाटणारी परिस्थिति गणराज्याच्या स्थैर्य व स्वस्थतेच्या निर्णयाला पोषक वस्तुस्थिति मानावयाची.

द्विराष्ट्रवादाच्या परिणामातून पाकिस्तान जन्मले. ब्रिटिशांच्या मुत्सद्देगिरीला आलेलें ते (कटु) फळ असल्याचे आम्ही बोलतो. पण द्विराष्ट्रवाद हा पाकिस्तान-पुरताच मर्यादित नाही. तो अल्पसंख्यांक जाती-जमाती व प्रादेशिक तसेच भाषिक अस्मितेला अवास्तव महत्व दिल्याचाही परिणाम आहे. तेव्हां द्विराष्ट्रवाद केवळ पाकिस्तानी प्रवृत्तीमुळे पोसला जातो हे खरे नव्हे. द्विराष्ट्रवाद वंश, भाषा, प्रदेश, जात, संस्कृति व धर्मामुळेही पोसला जात आहे याकडे आमचे दुर्लक्ष होऊ नये. पाकिस्तानी प्रवृत्ति ही देखील धर्माच्या अवास्तव आग्रहातून निर्माण झालेली जनांची अपप्रवृत्तीच होती व आहे. पण याला इतर धर्मांचे स्वरूपही कारणीभूत आहे. अर्थात इतर धर्मांनी विशेषतः हिंदु धर्माने धर्मातल्या माणसांत जवळीक साधता येईल अशी संधी निर्माण केली नाही. या धर्मात एकसंधपणा निर्माण झाला नाही. सबब इस्लामधर्म ' इस्लाम एक ' या घोषणेने संघटित होऊ शकला व हे धर्माचे संघटित स्वरूप राष्ट्र कल्पनेस जन्मास आणूं शकले. पण अलिकडच्या काळात धर्माचे संघटित स्वरूपच द्विराष्ट्रवादाचे मूळ कारण राहिलेले नाही. वंश, भाषा, प्रदेश व संस्कृति ही द्विराष्ट्रवादाची कारणे ठरूं पाहत आहेत. विशेषतः जंगल पहाडातून वास्तव्य करतात त्या मागास जाती व द्रविडी संस्कृति यांचा वंशाभिमान व प्रदेशाभिमान पूर्वी नव्हता त्या प्रमाणात जागा झालेला दिसतो व हा अभिमानच द्विराष्ट्रवादाचा आधार ठरूं पाहत आहे. आणि हा अभिमान भारताच्या एकराष्ट्रीयत्वाला आव्हानही देऊ लागला आहे. भारताचे आजचे राजकीय स्वरूप देखील वंश, संस्कृति व स्वदेशाभिमानामुळेंच बदलते राहील याची फार मोठी शक्यताही निर्माण झाली आहे. तेव्हां राष्ट्रीयता व राष्ट्रीय एकात्मता द्विराष्ट्रवादाच्या वाढत्या प्रवृत्तीमुळें अधिकच धोक्यात आहे हे सांगायलाच नको. पण यावर काही उपाय आहे काय याचाहि विचार केला पाहिजे. उपाय आहे. पण मोकळया अंतःकरणाने व पूर्वग्रहांचा त्याग करूनच या उपायाचा शोध घेता येईल अन्यथा ते अशक्य आहे हे या बाबतीत सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे.

राष्ट्रीयतेची कल्पना आज म्हणावी तेवढी स्पष्ट नाही. कारण धर्म, वंश, भाषा व संस्कृति यांच्या मर्यादेतच राष्ट्रीयतेला आम्ही ओळखतो. पण ही मर्यादा राष्ट्रीयतेला संकुचित करणारी आहे हे आता प्रत्ययाला येत आहे. कारण 'एकवंश एक राष्ट्र' ही राष्ट्रीयतेची कल्पना दुसऱ्या वंशांच्या विरोधी आहे. 'एक भाषा एक राष्ट्र' कल्पना भिन्न भाषांना विरोधी आहे. 'एक धर्म एक राष्ट्र' ही कल्पना दुसऱ्या धर्मांची विरोधी आहे व 'एक संस्कृति एक राष्ट्र-' कल्पना अन्य संस्कृतींना प्रतिकूल आहे. तेव्हा राष्ट्रीयतेच्या कल्पनेला व्यापक स्वरूप असेल तरच तिच्या स्थैर्याची शक्यता अधिक आहे. आणि या स्थैर्यामुळेंच भारतीय राष्ट्रीयतेला चिरस्थायी स्वरूपही येऊ शकेल. म्हणून राष्ट्रीयतेच्या कल्पनेत सर्वसमावेशकता असली पाहिजे. सर्व धर्म, वंश, भाषाभगिनी व संस्कृतींना संवर्धनाचे व सहअस्तित्वाचे स्थान म्हणजे, राष्ट्र किंवा राष्ट्रीयता असे ठरले पाहिजे. अर्थात राष्ट्रीयतेची सर्वसमावेशक मर्यादा ही राष्ट्रीयतेच्या स्थैर्याची व चिरस्थायीपणाची खात्री होय हें या देशातल्या राष्ट्रीयकांना पटले पाहिजे. पण पूर्वग्रहाने दूषित झालेली बुद्धि राष्ट्रीयतेच्या स्थैर्याला व चिरस्थायीपणाला नख लावीत आहे. म्हणून राष्ट्रीयता फुललेली – फळलेली दिसत नाही. हा राष्ट्रीय एकात्मतेला सर्वात मोठा धोका होय.

राष्ट्रीयता ही भिन्न धर्मीय, भिन्न संस्कृतीय व भिन्न वंशीयांतील सहिष्णुतेमुळेंच सर्वांच्या सहअस्तित्वाची व मानवी विकासाची प्रेरणा ठरूं शकणार आहे. पण सहिष्णुतेच्या अभावी सहअस्तित्वाची प्रेरणा व जाणीव पुसट होऊं लागल्यामुळें आजच्या राष्ट्रीयतेने परस्परात जवळीक निर्माण केलेली नाही. म्हणून राष्ट्रीयता ही चीन-पाकिस्तानी संकटविमोचनाची समर्थ जाणीव ठरावी असे आम्ही मानले व त्यानुसार भारतीय समाजाला वेळोवेळी आवाहन केले गेले तरी यातून भारतीय समाज संकटमुक्त होईल याची खात्री केव्हांच देता आलेली नाही. याला अनुसरूनच एकात्मतेच्या अभावाची प्रभावी कारणें शोधली पाहिजेत.

भारताच्या परिस्थितीत एकात्मतेचा अभाव हा शोषणाच्या वस्तुस्थितीतून जन्मास आला आहे. शोषण करणाऱ्या संस्था, व्यक्ति किंवा त्यांच्या गटांना या देशातल्या राजकीय व सामाजिक चळवळींनी या ना त्या कारणास्तव प्रोत्साहनच दिले आहे. शोषणाच्या प्रवृत्तीचा शाब्दिक निषेध अनेकदा होतो. पण स्वतःला शोषणाची संधी प्राप्त व्हावी अशा हेतूनेच हा निषेध केला जातो असे अलिकडे दिसू लागले आहे. कारण ज्या गटांनी, संस्थांनी, किंवा व्यक्तींनी शोषणाविरुद्ध

चळवळ उभारली त्या चळवळीतल्या त्याच व्यक्ति शोषणाचे उत्तम प्रकारे पोषण होवू देतांना आज दिसते. नाहीतर म. गांधींच्या ट्रस्टीशिपच्या कल्पनेला मूर्तरूप येण्यास उशीर झाला नसता. गांधींच्या नावाने चालवल्या जाणाऱ्या संस्था या राजकीय असोत किंवा सामाजिक परिवर्तनाच्या असोत, पण शोषणाला कळत न कळत प्रोत्साहन देतात हे आज उघड दिसते. साम्यवाद्यांच्या या बाबतीतल्या आक्षेपांना आपण फारशी किंमत द्यावी किंवा नाही हा भाग वेगळा. पण स्वराज्यानंतर गांधीजीवन-दर्शन मान्य करणाऱ्या संस्था व संघटनांना ट्रस्टीशिपच्या कल्पनेला मूर्तस्वरूप देता आले नाही ही एक अक्षम्य तत्वच्युति आहे व भावी इतिहास या तत्त्वच्युतीला क्षमा करणार नाही. तेव्हा, आर्थिक व सामाजिक आणि इतर अनेक प्रकारच्या शोषणाला अडविता आलेले नाही. उलट ते वाढविले गेले ही या गणराज्याची वस्तुस्थिती आहे. मला वाटते नक्षलवाऱ्यांची नवी प्रवृत्ति हा त्याचा चालताबोलता पुरावा आहे. विनोबा व त्यांच्या इतर असंख्य कार्यकर्त्यांनी भूमि-प्रश्न सुटावा म्हणून रात्रंदिवस कष्ट घेवून काही केले आहे व ते मोलाचेही आहे. तसेच या देशातल्या शासनामार्फत भूमिविषयक नवनवे प्रगत ( ? ) कायदेहि झाले आहेत. तरीही नक्षलवाऱ्यांच्या प्रवृत्तीला भारतव्यापी चालना मिळू शकलेली आहे हे आम्ही रोज ऐकतो पाहतो. अर्थात आर्थिक व सामाजिक शोषण नाहिसे व्हावे याचा प्रभावी उपाय आम्हास करता आलेला नाही म्हणून नक्षलवाऱ्यांची प्रवृत्ति वाढली व वाढत आहे हे आम्ही मोकळ्या मनाने मान्य करू तर कदाचित नवा इतिहास व नवी पिढी आम्हाला प्रामाणिक म्हणेल. पण मूळ प्रश्नाच्या बाबतीत आमची अकार्यक्षमता, अकर्मण्यता व दृष्टिहीनता भारतीय समाजाला संकटमुक्त करू शकलेली नाही व पाकिस्तान-चिनी संकट-मुक्तीचा नुसता आभास निर्माण केला, हा एक भयंकर गुन्हा म्हणूनच इतिहासात नोंदला जाईल. याला क्षमाही नसायची.

शोषणाच्या प्रवृत्तीला संधी आहे तोवर भारतीय समाजाला राष्ट्रीयतेची व एकात्मतेची प्रेरणा व्हायची नाही. म्हणून या विरुद्ध सामाजिक, आर्थिक न्यायाची प्रभावी चळवळच या देशात सर्वप्रथम जरूरीची आहे. ती निर्माण करण्यात यश आले तरच भारताच्या राष्ट्रीयतेला अर्थ प्राप्त होईल आणि हे अशक्य असल्यास धार्मिक, भाषिक, वांशिक, जातीय व सांस्कृतिक विलगतेच्या ( व यातून निर्माण होणाऱ्या द्विराष्ट्रवादाच्या ) आवाहनापोटीच भारताचे विघटन सुरू होईल. अर्थात सर्व तऱ्हेच्या शोषणाची संधी भारतीय समाजात जोवर आहे तोवर राष्ट्रीयतेची शक्ति निर्माण व्हावयाची नाही, हे या बाबतीत जाणले पाहिजे. विशेषतः नाहीरे

(हॅवनॉट) वर्गाला राष्ट्रीयतेचे महत्व पटणार नाही व मानवणारही नाही. म्हणून या स्थितीतले गांभीर्य आमच्या लक्षांत आले पाहिजे.

एकात्मतेच्या अभावाची प्रभावी कारणे लक्षांत घेतांना प्रादेशिक हितसंबंधांचा विचार प्रामुख्याने करावा लागेल. कारण हा विचार आजच्या स्थितीत अधिक चर्चेचा असून या विचाराचे महत्व राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सध्या खचितच सर्वाधिक मानावे लागते. कारण प्रादेशिक हितसंबंधांच्या परिणामातून भारतीय गणराज्याला स्वस्थता लाभेल किंवा असलेली नाहीशीहि होईल. म्हणून गणराज्याच्या स्वस्थतेशी प्रादेशिक हितसंबंधांचा प्रश्न सरळ संबंधित आहे हे मान्यच करायला हवें.

भारत एक असला तरी तो प्रादेशिक वैशिष्ट्याचा आहे. प्रत्येक प्रदेशाचे एक वेगळेपण आहे. म्हणून भिन्नतेची सांस्कृतिक, भाषिक व नैसर्गिक अशी प्रत्येक प्रदेशाची स्वतंत्र मर्यादा आहे. अर्थात प्रादेशिक अस्मिता ही भारताच्या वैशिष्ट्याचाच एक भाग मानला पाहिजे. पण या दृष्टीने राष्ट्रीय नियोजन कार्याची अकर्मण्यता व असमर्थता गेली अनेक वर्षे जाणवत असल्यामुळे प्रादेशिक विकासाचा समतोल राष्ट्रीय पातळीवर साधता आलेला नाही. म्हणूनच प्रादेशिक विलगतेची भावना जोर करू लागलेली आहे. तेव्हां, कोणत्याही प्रदेशाला किंवा सर्वांना एकाच भूमिकेवर किंवा समान भूमिकेवर ठेवता येईल अशी खबरदारी राष्ट्रीय नियोजनातून घेता आलेली नाही हे या बाबतीत दिसतें. अर्थात प्रगत प्रदेशांनी मागास प्रदेशांकडे अधिक सहानुभूतीने पाहण्याची आवश्यकता होती तीही पुरी झाली नाही. पण हा दोष देखील राष्ट्रीय नियोजनाच्या कार्यपद्धतीचाच आहे. अर्थात राष्ट्रीय नियोजनाच्या असमर्थतेतूनच प्रादेशिक स्वायत्ततेचा वाद निर्माण झाला हे या बाबतीत लक्षांत घेण्यासारखे आहे. म्हणजे प्रादेशिक स्वायत्ततेचा वाद हा प्रादेशिक अस्मिता रक्षणाच्या दुराग्रहातून निर्माण झालेला नसून तो नियोजनाच्या अपयशातून निर्माण झाला आहे हे पटणे अवघड वाटू नये. तेव्हा प्रादेशिक स्वायत्ततेच्या वादाला यापुढे योग्य वळण द्यावयाचे तर प्रादेशिक विकासाची संधी प्रदेशातच निर्माण केली जाईल व त्याला केंद्रीय सहाय्य मिळवून देण्याची संधीहि उपलब्ध करून देता येईल अशी तरतूद करावी लागेल. म्हणून प्रादेशिक प्रशासन यापुढे अधिक स्वायत्त केले पाहिजे. लोकशाहीत लोकांचे राज्य लोकांपर्यंत पोचवायचे तर स्वायत्ततेच्या तत्वाला क्रमाने लोकापर्यंत पोचवावेंच लागेल. पण आजच्या स्थितीत प्रशासनिक स्वायत्ततेचे तत्व प्रदेशापर्यंत आणलेच पाहिजे. त्याशिवाय भारताच्या राष्ट्रीयतेला व राष्ट्रीय विकासाला खराखुरा अर्थ प्राप्त होणार नाही.

कारण, एक गोष्ट अनुभवातून स्पष्ट झाली की, केंद्रीयीकरणामुळे प्रादेशिक विकास असंभव ठरला आहे.

या बाबतीत आमच्या मनात अनेक प्रकारची भीति आहे. प्रादेशिक स्वायत्ततेमुळे भारतात विलगतेची भावना वाढीला लागेल हा या भीतीचा आशय आहे. पण प्रादेशिक स्वायत्तता आम्ही नाकारीत असू तर केंद्रीयीकरणाचा पुरस्कार आम्ही करतो असा त्याचा सरळ अर्थ केला पाहिजे. अर्थात या केंद्रीयीकरणामुळे विकास संभवत नाही. विकेंद्रीकरणामुळे विकास संभवतो हे तत्व व या बाबतीतला अनुभव आम्ही दृष्टिआड करू शकत नाही. म्हणजे केंद्रीयीकरणाबाबच आमचा आग्रह असल्यास या देशाची राष्ट्रीयता तर शिल्लक राहणारच नाही, पण लोकशाहीहि उरणार नाही. केंद्रीयकरण सर्वंकषतेकडे वाटचाल केल्याशिवाय राहत नाही व ही वाटचाल भारताचे गणराज्य संपुष्टात आणील. तेव्हा प्रादेशिक स्वायत्ततेचा विचार करताना प्रशासनिक सोयीच्या दृष्टीने राज्याचे घटक आजच्याहून अधिक आटोपशीर व लहान असावे लागतील. म्हणून आजची प्रादेशिक रचना जी भाषिक तत्वावर आधारित आहे तीही बदलावी लागेल. एकभाषेचे अनेक प्रदेशही करावे लागतील. याशिवाय प्रशासनिकदृष्ट्या क्षमता निर्माण करता येणार नाही. अर्थात प्रादेशिक स्वायत्ततेचे तत्त्व आम्हाला राष्ट्रीय एकात्मतेकरताच मान्य करावे लागेल. कारण यामुळेच भारताची राष्ट्रीयता अभंग राहू शकेल व द्विराष्ट्रवादाला संधी उरणार नाही.

राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न प्रादेशिक स्वायत्ततेमुळे सुटेल, व भारताचे गणराज्य प्रादेशिक स्वायत्ततेमुळेच स्वस्थ होईल. यामुळेच स्वराज्याला स्वस्थता लाभेल.

● ● ●

## लहान राज्यें आवश्यक

राष्ट्राचे सूत्रसंचालन हें केंद्रातून किंवा राष्ट्राच्या राजधानींतून व्हावे हें मानले गेलें आहे. यामुळें केंद्रित कारभार, हें राष्ट्राचे अविभाज्य तत्व ठरलें आहे. पण केंद्रित कारभारामुळेंच राष्ट्र कल्पनेची ओळख पटावी ही स्थिति मात्र लोकशाहीला कधीच अनुकूल असणार नाही. म्हणून केंद्रीकरण हें लोकशाहीला पूरक असणार नाहीं. हेंच लोकशाहीचें वैशिष्ट्य होय आणि हीच खरी लोकशाहीची गुणवत्ता होय. राष्ट्र आणि लोकशाही हीं दोन तत्वें भिन्न होती तेव्हा राष्ट्र केंद्रिकरण या कल्पनेशी निगडीत राहू शकलें, पण राष्ट्र आणि लोकशाही हीं दोन तत्वें एकत्र आल्यामुळें केंद्रीकरणाशी निगडीत असणारे राष्ट्र हें सर्व सामान्याचें व्हावें अशी गरज निर्माण झाली. म्हणून सर्व सामान्यांचे राष्ट्रच लोकशाहीचें राष्ट्र असें समीकरण झालें. केंद्रीकरणामुळें सर्व सामान्यांच्या लोकशाहीची गति अवरुद्ध होत असल्यास

केंद्रीकरणाचें विकेंद्रीकरणात परिवर्तन करणें या समीकरणामुळें अनिवार्य होऊन बसतें.

लोकशाहीची गतिशीलता केंद्रीकरणामुळें अवरुद्ध होते म्हणून विकासाची गतीही निर्माण होत नाही. सत्वत्र लोकशाही व विकास सर्व सामान्यांपर्यंत जावयाचें तर विकेंद्रीकरणाचें तत्व मान्यच व्हावें लागतें. भाषावार प्रांत रचनेचा उगम यांतूनच झाला, व ते अनिवार्यच होतें. भाषेच्या प्रश्नानें पुष्कळच गोंधळ उडाला हें जरी खरे असलें तरी भाषावार प्रांतरचनेचा तो दोष आहे असें समजून भाषावार प्रांतरचनेला जे विरोध करतात ते या रचनेच्या चांगल्या उद्देशांकडे दुर्लक्ष करतात असेच म्हणावें लागते. राज्य पुनर्ररचना आणि भाषावार रचना यांत फरक आहे. राज्यपुनर्रचना भाषेच्या तत्वावर केली जावी हा आग्रह लोकशाही व विकास गतिशील करण्याकरितां ठेवला गेला. पण, राज्यपुनर्रचना प्रशासनिक सोयीच्या उद्देशानें करण्याचा मानस असू शकतो. तो अिंग्रजांच्या काळात व त्यापूर्वीही होता म्हणून राजकीय सत्तेनें प्रशासनिक सोयीकरता देशांतली राज्यरचना त्यांच्या दृष्टीनें अनेकदा केली होती. पण लोकशाहींत राज्यरचनेचा उद्देश प्रशास-निक सोय एवढाच असून चालण्यासारखे नाहीं. राज्यपुनर्रचनेचा उद्देश प्रशासनाचा लाभ सर्व लोकांना समान तऱ्हेनें घेता यावा व विकासाची समान संधी प्राप्त व्हावी असा असला पाहिजे. राज्यकर्त्यांना सोयीची रचना म्हणजे राज्यपुनर्रचना हे परकीय सत्तेचें तत्त्व स्वराज्यात अमलात आणणें म्हणजे स्वराज्याच्या फायद्यांपासून लोकांना वंचित ठेवणें होय.

लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीनें प्रशासनाची कल्पना ही स्पष्ट असली पाहिजे. ती अस्पष्ट असल्यामुळे पुष्कळ घोटाळे निर्माण झाले आहेत. प्रशासन केंद्रीकर-णाच्या आकर्षणांतून निर्माण होते तेव्हां प्रशासनाचा लाभ लोकांना मिळावा ही जाणीवच प्रशासनांतून निघून जाते, म्हणून लोकशाहीचे फायदे लोकांना देण्याची कुवत प्रशासनांत उरत नाही- पण प्रशासनांतून लोकशाहीचे प्रत्यक्ष फायदे लोकांना मिळावेत अशी कल्पना केली तर प्रशासनाला विकेंद्रीकरणाचेंच आकर्षण असावे लागतें. म्हणून या दृष्टीनें प्रशासन हे नेहमी लवचिक असावे लागेल. प्रशासन ताठरच असावें, त्यांत लवचिकपणा नसावा असें काही म्हणतात व या लवचिक-पणामुळें प्रशासनाची आब राखली जात नाही, कायदे न पाळण्याची वृत्ति निर्माण होते व यांतूनच अराजकाला प्रोत्साहन मिळतें, हें ताठर प्रशासनाच्या समर्थनार्थ वारंवार सांगितलें जातें. पण ताठर प्रशासनाचें समर्थन करणारी मंडळी लोकशा-हींतल्या प्रशासनाचा उद्देश विचारांत न घेतांच बोलतात असें म्हणावें लागते.

आणि ही मंडळी बहुधा इंग्रज प्रशासनाचा पुरावा पुढें करतात. अर्थात आतां या देशांत स्वराज्य आहे याचें भानच या मंडळीला राहत नाही. म्हणजे स्वराज्याचें प्रशासन हें लोकांच्या सोयीकरता निर्माण झालेलें आहे ( किंवा ते असावे ), स्वराज्याच्या पूर्वीचे समाजजीवन हें प्रशासनाच्या सोयीप्रमाणें चालणारे होतें हा फरक लक्षांत आला म्हणजे प्रशासनातला लवचिकपणा कसा अनिवार्य आहे हें कळूं शकेल. पण, कायदे न पाळल्या जाण्याच्या प्रवृत्तीचें किंवा अराजकतेचें असमर्थन करण्याकरतां प्रशासनाच्या लवचिकपणाची अनिवार्यता मला पटवून द्यावयाची नाही. उलट अराजकतेची किंवा कायदे न पाळण्याची प्रवृत्ति ही प्रशासनाचे प्रत्यक्ष फायदे लोकांपर्यंत पोचत नाहींत म्हणून निर्माण होतें हें मला मुद्दाम सांगावयाचें आहे. अर्थात प्रशासनातल्या लवचिकतेचें स्वरूप प्रशासनाच्या विकेंद्रित रचनेचें असलें पाहिजे.

स्वराज्याचें प्रशासन हें लोकांचें असल्यामुळें लोकांच्या ( कारभारविषयक ) ज्ञानांत सतत भर पडत गेल्यास यांतूनच लोकांमध्ये प्रशासनाविषयक जबाबदारी येईल. पण या दृष्टीनें निरपेक्ष वृत्तीच्या लोकसेवकांची आज खरी उणीव आहे. निरपेक्ष वृत्तीचा लोकसेवक वर्ग असावा याची गरज आजच्या–प्रशासकांना वाटत नाही. सबब शासक–प्रशासकांचा शासक–प्रशासकीय ताठरपणा हाच मुळी अराजकाच्या वृत्तीला प्रोत्साहन देत आहे. म्हणून अराजकाच्या वृत्तीला खरे जबाबदार लोक नसून शासक–प्रशासकीय अवास्तव ताठर वृत्तीच जबाबदार आहे. कारण ही ताठर वृत्ति लोकांना विकासाची समान संधी प्राप्त व्हावी या जाणिवेंतली नसून सत्ताभोगाच्या संकुचित जाणिवेंतली आहे. म्हणून हा ताठरपणा वाकविण्या-करतां लोकांना कायदे न पाळण्याच्या वृत्तीचा किंवा हिंसात्मक उद्रेकाचा, अर्थात अराजकाचा आश्रय घ्यावा लागतो, अर्थात यामुळे लोकांना हवें तें मिळविता येतें, एवढेंच नव्हे तर हिंसात्मक उद्रेकामुळेंच लोकांना हवें तें मिळविणें शक्य आहे असा सार्वत्रिक समजही झाला आहे. याचें कारण उघड आहे. तें असे की आजच्या शासनकर्त्या वर्गाला शासन लोकाभिमुख व्हावें असें वाटतच नाही. प्राप्त झालेली सत्ता ही एक पर्वणी समजून तिचा हव्या त्या तऱ्हेनें उपभोग घेणें हेंच शासनकर्त्यांना महत्वाचे वाटतें. याचमुळे आजचे शासन हें लोकाभिमुख नसून सत्ताभिमुख किंवा भोगाभिमुख आहे असें म्हणावें लागतें. तेव्हा अशा शासनाला किंवा शासन प्रमुखांना वाकविण्याकरता हिंसात्मक उद्रेकाचा लोक आश्रय घेतात ही अत्यंत स्वभाविक बाब म्हटली पाहिजे. तथापि ही गंभीर बाब म्हणून तिचे महत्व वाढविण्यातही अर्थ नाही. उलट शासनकर्त्यांचा आजच्या प्रशासन-

विषयक दृष्टिकोण बदलविण्याचा विचार केला पाहिजे. स्वराज्यातल्या प्रशासनाचा दृष्टिकोण अजूनपर्यंत शासक कार्यकर्त्यांना प्राप्त झाला नाही हीच मुळी गंभीर बाब होय. म्हणून याचे महत्त्व वाढविलें पाहिजे. या दृष्टीनें वातावरण निर्मिलें पाहिजे. त्यामुळें प्रशासकांचा व शासनकर्त्यांचा दृष्टिकोन त्यांना प्राप्त होऊ शकेल.

शासनकर्त्यांजवळ स्वराज्यातल्या प्रशासनाचा दृष्टिकोन नसला म्हणजे काय परिणाम निघतात याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे तेलंगण प्रकरण होय. राष्ट्रीय नियोजन कार्यांत विकासाचा समतोल साधण्याची क्षमता नसल्यामुळें प्रादेशिक भावनांचा हिंसात्मक उद्रेक निर्माण केला जातो. तेलंगण या दृष्टीनें नेहमीच आघाडीवर राहिलें आहे. तेलंगणातली गरिबी आणि बेकारी लक्षांत घेऊन कम्युनिस्टांनी तेलंगणाला प्रयोगक्षेत्र केलें. असें असतांना त्या प्रदेशांतल्या जनतेच्या न्याय्य मागण्या विचारात घेतल्या गेल्या नाहींत. दंडशक्तीनें जनतेच्या भावना दडपून टाकण्याचा प्रयत्न स्वराज्यात तरी हास्यास्पदच ठरतो हें अनेकदा प्रत्ययास आलें, तरी दंडशक्तीच्या साह्यानें तेलंगणची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न होतच गेला. शेवटी भावनांचा उद्रेक हिंसेतून प्रगटला. कारण जनभावना दंडशक्तीहून अधिक प्रभावी असते हें या प्रदेशातल्या शासनकर्त्यांना, शक्तिमान इंग्रज या जन-भावनेच्या प्रकोपामुळें भारत सोडून गेले हें माहित असून देखील, उमगत नाही. दंडशक्तीची भीति निर्माण करून शासन चालविण्याची स्थिति उरली नाहीं हें जर शासनकर्त्यांना कळलें तर तेलंगणांतला उद्रेक हिंसेच्या मार्गानें निर्माणच झाला नसता. शासनकर्त्यांच्या अदूरदर्शित्वाचा हा परिणाम आहे या विषयी किंचित देखील शंका बाळगता येत नाही. लोकाभिमुखतेमुळें शासनाला उपयुक्त असा लोकांचा दृष्टीकोनही तयार करता येऊं शकतो व म्हणून भावनांचा उद्रेक हिंसेच्या मार्गानें प्रगट होण्याऐवजी तो शांततेच्या व आत्मक्लेशाच्या मार्गानें प्रगट करता यावा अशी संधी निर्माण करता आली पाहिजे. नेहमीच हें दुर्लक्षिले गेलें. आता तेलंगणचा प्रश्न हा प्रादेशिक स्वायत्ततेचा प्रश्न होऊन बसला आहे. म्हणूनच तो वेगळें तेलंगण राज्य झाल्याशिवाय मिटणार नाही अशा अवस्थेला आला आहे.

लोकांना प्रशासनातून लोकशाहीचे फायदे देता यावेत या दृष्टीनें प्रादेशिक स्वायत्ततेच्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. म्हणून भाषिक प्रांत रचनेनंतर पुन्हा राज्यपुनर्रचनेला वाव उरत नाही अशी आग्रही भूमिका कुणाचीही असता उपयोगाची नाही. लोकशाहीचे प्रशासन लोकांना सोयीचे व्हावें म्हणून भाषिक प्रांत रचनेचा पुरस्कार करण्यांत आला. पण एकाच भाषेची अनेक राज्यें केल्यामुळें

लोकांना लोकशाहीचे प्रत्यक्ष फायदे मिळणें संभवनीय असल्यास तसें कां करूं नये ?

हा या बाबतींतला प्रश्न आहे. अनेक राज्यें अस्तित्वात आल्यामुळें राष्ट्रीयतेचा संकोच होतो असा वृथा समज तरी आम्ही कां करून घ्यावा ? उलट लहान राज्यांमुळे प्रशासन लोकांच्या जवळ जाईल म्हणून राष्ट्रीयतेला यामुळे बळकटीच येईल. प्रशासनातून लोकांना लोकशाहीचे फायदे न मिळाल्यास राष्ट्रीयता टिकून राहूं शकेल काय ? आणि टिकून राहीली तरी कोणत्या भरंवशावर ? दंडशक्तीच्याच की नाही ? दंडशक्तीमुळे राष्ट्रीयता टिकवून धरणें आजच्या काळांत शक्य आहे काय ? आणि शक्य झालें तरी दंडशक्ति ही लोकशाहीची असणार नाही याकडे दुर्लक्ष होता कामा नये. दंडशक्ति ही शस्त्रशक्तीहून भिन्न नसल्यामुळे शस्त्रशक्तीचा पहिला प्रहार लोकशाहीवरच होईल व यांतून लोकांचे स्वातंत्र्य संपुष्टात येईल. तेव्हा लोकांच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन राष्ट्रीयतेचा आग्रह ठेवला जावा की लोकांच्या स्वातंत्र्याला अधिकाधिक संधि निर्माण करून राष्ट्रीयता बळकट करावी हा खरोखरी विचाराला चालना देणारा व महत्वाचा प्रश्न आहे. राष्ट्रिकांचे स्वातंत्र्य संपुष्टांत आलेल्या राष्ट्रीयतेचे प्रयोजन काय असा जेव्हा विचार करूं तेव्हां वाटेल की राष्ट्रीयता ही देखील लोकांच्या स्वातंत्र्यामुळेच टिकूं शकेल, फुलूं व फळूं शकेल. म्हणून स्वातंत्र्याला धोका निर्माण करणारी कोणतीच नुसत्या नांवाची राष्ट्रीयता पत्करायची तरी कशाकरतां ?

भारताची राष्ट्रीयता राज्यें लहान करून प्रशासन लोकांपर्यंत नेल्यामुळेच बळकट होईल. म्हणून लहान राज्यांना राष्ट्रीयतेची सबब पुढें करून विरोध करणें चुकीचे होय. कारण, लहान राज्याद्वारे प्रशासनिक सोयी उपलब्ध होणें अगत्याचे आहे. कारण यामुळेच लोकशाही व विकास गतिशील करता येईल. लोकशाहीत विकास गतिशील नसल्यामुळेच तर आज हिंसात्मक उद्रेकांना संधि आहे व देशाची एकात्मता टिकवायची तर प्रादेशिक स्वायत्ततेचा पुरस्कार करावाच लागेल. विकासाची गति वाढविण्याकरता राज्यें लहान करून त्यांना आजच्याहून अधिक अधिकार द्यावेच लागतील.

● ● ●

## हक्क आणि जबाबदारीची जाणीव

लोकशाही हा सर्वांचा तारक मंत्र आहे. कम्युनिस्टांचा देखील. कारण, या देशात लोकशाहीवादी राहणे अपरिहार्य आहे. त्याशिवाय कोणालाच प्रतिष्ठित होता येत नाही. या भूमीचा हा गुणच समजला पाहिजे. पण, लोकशाहीचा उद्‌घोष करतांना लोकशाहीचा मूळ अर्थ सर्वांनाच अभिप्रेत असतो असे मात्र नाही. जसे रशियातही लोकशाही आहे- ज्याला ते समाजसत्ताक राज्य म्हणतात. चीनमध्ये देखील समाजसत्ताक राज्य असल्याचे तेथील नेते सांगतात. म्हणजे साम्राज्यशाही विरुद्ध दिलेला लढा व लढ्याच्या यशस्वीतेतून निर्माण झाले ते समाजसत्ताक राज्य, अशी लोकशाहीची चीन–रशिया मधली कल्पना आहे. भारतातदेखील त्यांचे भाऊबन्द लोकशाहीचा उच्चार करतात. पण समाजसत्ताक राज्याच्या अर्थानेच. अर्थात ही गोष्ट फारशी ते पुढे येऊ देत नाहीत.

कारण, लोकशाहीच्या कल्पनेहून समाजसत्ताक राज्याची कल्पना वेगळी असल्याचे लोकांनी समजू नये म्हणून !

फ्रांस, ब्रिटन, अमेरिकेसारख्या राष्ट्रांना स्वातंत्र्याचे महत्व वाटते, म्हणून स्वातंत्र्याची संधी असलेली राज्यव्यवस्था ही लोकशाही व्यवस्था होय असे त्यांचे म्हणणे आहे. पण ही राष्ट्रें (पूर्वी) साम्राज्यविस्ताराच्या लोभाने साम्राज्यवादी बनली होती. अजूनही या राष्ट्रांची साम्राज्यतृष्णा शमलेली नाही हे त्यांच्या व्यवहारावरून जाणवते. जगातून वसाहतवादाची समाप्ती होत असतानांच, दुसरीकडे शस्त्रसंधीच्या-लष्करी करारांचे नवे वसाहतवादी धोरण स्वीकारले जात आहे. याची सुरुवात पश्चिमी राष्ट्रांनीच केली. एकमेकांना साहाय्य करण्याच्या कल्पनेत जागतिक सत्तेचा समतोल साधण्याच्या हेतूनेही जगात स्थान निर्माण केले आहे व त्या निमित्ताने जगात सत्तागट निर्माण झाले. आज जगातल्या दोन सत्तागटात स्पर्धा निर्माण झाली आहे. म्हणून आता पश्चिमी राष्ट्रेच साम्राज्यवादी राहिलेली नाहीत तर चीन-रशियासुद्धा विस्तारवादी झालेले आहेत. विस्तारवादानेच तिबेट गिळंकृत केला. साम्राज्यवाद आणि विस्तारवाद यात फरक तसा दिसत नाही. हेतू वेगवेगळा वाटतो. पण दोहोंची परिणती एकाच गोष्टीत होते. व्हिएटनामच्या प्रश्नावर अमेरिकेचे आजचे धोरण कितीहि चुकीचे म्हटले तरी चिनी विस्तारवाद थोपवून धरण्याचाच तो एक प्रयत्न आहे हेही नजरेआड करता येत नाही. अर्थात अमेरिका शस्त्रास्त्रबळाने हा विस्तारवाद थोपवून धरू शकेल असे नव्हे. पण, अमेरिकेच्या अनेक उद्देशांपैकी विस्तारवाद थोपवून धरण्याचाही एक उद्देश आहे. व्हिएटनाममध्ये मानवी जीविताची व मानवतेची जी क्रूर थट्टा आरंभली गेली ती अमेरिकेचे अदूरदर्शित्व आणि आणि चीनचा विस्तारवादी हस्तक्षेप या दोहोंमुळेच होय.

रशिया-चीनने समाजसत्तावादाच्या सोज्वळ नावाखाली मानवी स्वातंत्र्याची व मानवतेची गळचेपी केली व आता चीनमध्ये 'सांस्कृतिक क्रांती' च्या नावाखाली चीनच्या मानवी जीवनात थोडाफार आलेला मोकळेपणा नष्ट करण्याचा क्रूर प्रयत्न होत आहे. दुसरीकडे याच मानवी स्वातंत्र्याचा प्रश्न वर्णभेदाच्या रूपाने अमेरिकेत क्रूरता आणीत आहे. तेव्हा प्रमाणभूत मानली जाईल अशी लोकशाही व्यवस्था आज कुठेच नाही. कारण, स्वातंत्र्याच्या आशयाविरहित लोकशाही आज जगत आहे. अमेरिकेत ही लोकशाही जगत आहे. चीन-रशियात 'समाजसत्ताक' नावाखाली ही लोकशाही जगत आहे. अमेरिकेत, रशिया-चीनहून स्वातंत्र्याची संधी अधिक आहे एवढेच !

लोकशाहीची एक सांसदीय परंपरा आहे व ही परंपरा इंग्लंडपासून निर्माण झाली म्हणतात. या परंपरेने देखील लोकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविला नाही. इंग्लंडची सांसदीय परंपरा एक वांझ परंपराच ठरली. अजून देखील इंग्लंडच्या परंपरेत लोकांच्या स्वातंत्र्याची शक्ती जाणवेल अशी स्थिती निर्माण झाली नाही. १९०८ साली महात्मा गांधींनी इंग्लंडच्या सांसदीय परंपरेविषयी जे मत दिले होते ते या क्षणाला आजच्या सर्व सांसदीय पद्धतींना तंतोतंत लागू पडणारे आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटसंबंधी महात्मा गांधी म्हणतात–

"जिसे आप पार्लमेन्टकी माँ कहते है वह तो बाँझ और वेश्या है। ये दोनो शब्द कठोर है; मगर उसपर पूरी तरह लागू होते है। बांझ तो मैंने इसलिए कहा; क्यों कि अभितक उसने कोई भी अच्छा काम अपने आप नही किया। कुदरती तौरपर उसकी ऐसी हाल्त हैं कि विना दबाव के वह कुछ नही कर सकती। और वह वेश्या इसलिए है क्यों कि उसे जो मन्त्रिमण्डल चाहता है अपने कब्जेमे रख सकता है। आज उसके मालिक एकस्क्विथ है तो कल बालफोर और परसो कोई और।

"पार्लमेंट बांझ न होती तो यह होना चाहिए था कि लोग उसमे अच्छे से अच्छे मेम्बर चुनकर भेजते। मेम्बरों को कोई तनख्वाह नही मिलती, अिसलिए उनमें लोककल्याण की भावना होनी चाहिए। वे अपने को सुशिक्षित समझते है, इसलिए हमे मानना चाहिए कि वे कोई गलती नही करेंगे। ऐसी पार्लमेन्ट को अर्ज- मारूज या दबाव की जरूरत न होनी चाहिए।

"प्रधानमंत्री को पार्लमेन्ट को उतनी फिक्र नही होती जितनी कि अपनी सत्ता की होती है। वह तो हमेशा अपने पक्ष की जीत के फेर मे पडा रहता हैं। इस बात का उसे बहुत ध्यान नही रहता कि पार्लमेन्ट ठीक काम करे। प्रधानमन्त्री अपने पक्ष को मजबूत बनानेके लिए पार्लमेण्ट से क्या क्या काम नही कराते है, इसके चाहे जितने उदाहरण मिल सकते है। यह सब सोचने के काबिल है।

"प्रधानमन्त्रीयों से मेरी कोई दुश्मनी नही है, लेकिन मैंने जो कुछ देखा उसपर से मैं इस नतीजेपर पहुंचा हूँ कि उन्हें सच्चे देशभक्त नही माना जा सकता। आम तौर से जिसे घूस कहते है वह वे नही लेते–देते, इससे भलेही उन्हें ईमानदार समजा जाय; लेकिन शिफारिश आदि दुसरी बातों

के प्रभावसे वे नही बच पाते। और दूसरो से काम निकालने के लिये उपाधियों वगैरा के रूपमे तो निश्चयहीं खूब घूस देते है। मैं बेधडक यह कह सकता हूँ कि उनमे शुद्धभाव और सच्ची ईमानदारी का अभाव है. ''
( 'हिन्द-स्वराज्य' पृष्ठ ३१, ३५ व ३६, सस्ता साहित्य मंडळ दिल्ली प्रकाशनाच्या १९३८ च्या आवृत्तीवरून हे उतारे साभार घेतले आहेत. )

पार्लमेंटला वेश्या म्हटल्यामुळे एका इंग्रज महिलेची भावना दुखावली गेली व तो शब्द बदलण्याविषयी एका इंग्रज मित्राने म. गांधींना कळविले तेव्हा इंग्रजी संस्करणात वेश्या शब्दातून जो ग्राम्यभाव प्रगट होत होता व त्याचमुळे त्या इंग्रज महिलेची कोमल भावना दुखावली होती तो वेश्या शब्द न वापरण्याची म. गांधींनी अनुमती दिली होती. पण म. गांधींनी आशय मात्र बदलला नाही.

महात्मा गांधींनी इंग्लंडच्या पार्लमेंटविषयी जे मतप्रदर्शन केले ते आजच्या परिस्थितीत या देशाला पुष्कळ बाबतीत लागू पडणारे आहे. म्हणजे इंग्लंडच्या त्या वेळच्या परिस्थितीत जी पार्लमेंट होती तीहून वेगळी किंवा प्रगत परिस्थिती भारतीय पार्लमेंटची आहे असे कोणत्याच कारणास्तव म्हणता येत नाही. जे दुष्परिणाम इंग्लंडच्या पार्लमेंटमधून निघायला पाहिजेत नेमके तेच दुष्परिणाम यावेळी भारताच्या पार्लमेन्टमधून निघतांना दिसत आहेत. नाही तरी भारताने इंग्लंडची सांसदीय पद्धती मान्य केली आहे. मग तिचे दुष्परिणाम तिच्यासारखेच असतील या विषयी मतभेद नाहीच मुळी ! !

लोकशाहीच्या विकासाचा प्रश्न चर्चिला जातो. पण सामान्यतः राजकीय मर्यादेतच हा प्रश्न घोटाळतांना दिसतो. लोकशाहीची सांसदीय पद्धती हीच ती आजची राजकीय मर्यादा होय. तसेच आर्थिक सुबत्तेचेही एक मोठे आकर्षण आहे. म्हणून लोकशाहीच्या सोबत समाजवादाला बसविले गेले. आणि लोकशाही समाजवाद हा नवा राजकीय संप्रदाय निर्माण झाला. पण लोकशाहीच्या विकासाचा प्रश्न यामुळे हाताळला गेला किंवा हाताळला जातो हे मात्र अजूनही सिद्ध होत नाही. कारण, लोकशाहीच्या विकासाचा प्रश्न हा वास्तविक मानवी स्वातंत्र्याच्या विकासाचाच प्रश्न आहे. आणि लोकशाहीचा विकास हा मानवी स्वातंत्र्याचा विकास होय. मानवी स्वातंत्र्य विकसित होत असेल तेव्हाच लोकशाही वाढली, मोठी झाली असे म्हणता येईल. अर्थात मानवी स्वातंत्र्याची संधी

निर्माण करणे व ती विकसित करणे हा लोकशाहीचा उद्देशच नव्हे असा संभ्रम मात्र ' लोकशाही समाजवाद ' या नव्या राजकीय संप्रदायाने निर्माण केला आहे. या संभ्रमातच लोकशाहीचा व्यवहार चालविला जात आहे. पण यामुळे मानवी स्वातंत्र्य डावलले जात आहे. शिवाय लोकशाहीही डावलली जात आहे, तिला स्थानभ्रष्ट केले जात आहे हे दृष्टीआड करून भागणार नाही. म्हणजे लोकशाहीचे अस्तित्व व तिचे प्रयोजन मानवी स्वातंत्र्याच्या वाढत्या संधीवरच अवलम्बून आहे. या दृष्टीने लोकशाहीला राजकीय मर्यादा मानवणार नाही. ती सशक्त होणार नाही. म्हणून लोकशाही सशक्त व्हायची तर राजकीय मर्यादेतून तिला बाहेर यावे लागेल. जनसामान्यांच्या इच्छा–आकांक्षेशी तिला समरस व्हावे लागेल. जनसामान्यांच्या स्वातंत्र्याचे महत्व जाणावे लागेल. यामुळेच लोकशाही सशक्त होईल. तिचे अस्तित्व अबाधित होईल. राजकीय मर्यादेच्या कुजट वातावरणात लोकशाही कुजून जाऊ नये. कारण, मानवी स्वातंत्र्याची संधीच यामुळे असंभव होईल. म्हणून राजकीय मर्यादेच्या लोकशाहीच्या सभोवती निर्माण झालेल्या शृंखला तोडल्या पाहिजेत. तिला मोकळ्या वातावरणात आणले पाहिजे. याशिवाय लोकशाही जीवनपद्धतीचा विकास संभवणार नाही; अशक्य होईल. या दृष्टीने काही मूलगामी विचार आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. एक महान विचारवंत व क्रांतीच्या उद्देशाने सर्व जीवन धडपडीत व हालअपेष्टात घालविलेले क्रांतिकारक श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांनी " मूलगामी लोकशाही " विषयी म्हटले आहे की, " परंपरागत लोकशाही समाजवाद हा देखील यशस्वी होण्याची आशा वाटत नाही. लोकशाहीचाच नवीन स्वरूपात पुनर्जन्म होणे आवश्यक आहे. याकरिता लोकशाहीने पुनः मानवतावादाच्या परंपरेकडे वळले पाहिजे.

" जेथे माणसांना आपली डोकी मानाने वर उचलून व्यवहार करायची संधीच नाही, तेथील ती डोकी मोजण्यापुरतीच लोकशाही असून आता भागणार नाही.

" केवळ औपचारिक पार्लमेन्टरी पद्धतीचे स्थान खऱ्याखुऱ्या लोकशाही व्यवहाराने घेणे आवश्यक आहे. मते मिळवण्याच्या कुवतीवरून राष्ट्रीय पक्षाचे स्वरूप ठरण्याऐवजी त्याच्या उद्घोषित तत्वांवरून आणि प्रसिद्ध कार्यक्रमावरून ते ठरविले गेले पाहिजे. अभिवचने आणि घोषणा यांच्या आधारावर लोकांनी मतदान करण्याऐवजी सरकारच्या प्रत्यक्ष कार्याच्या आधारावरच ते केले पाहिजे.

" केवळ डोकी मोजण्यापुरतेच लोकशाहीचे राजकारण राहिल्यास ते शेवटी सामुदायिक अहंकारापुढे डोके लववून शरणागतीच पत्करील. त्यात व्यक्ती किंवा बुद्धिवाद यांना स्थान संभवत नाही. औपचारिक पार्लमेन्टरी पद्धतीत कसलाही विधिनिषेध न बाळगणारे चळवळेच वर येऊ शकतात. बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा, शहाणपणा, नीतिमत्ता ही मानवी मूल्ये कोणाच्या खिजगणतीतही नसतात.

" परन्तु या पावन मूल्यांचा शुद्ध प्रभाव राजकीय संस्था आणि समाजशासनाचा व्यवहार यावर पडल्यावाचून खऱ्या लोकशाहीजीवनपद्धतीचा विकास होणे अशक्य आहे. "

लोकशाहीने नवे अधिष्ठान शोधले पाहिजे असे सांगून स्वातंत्र्यप्रियतेचे लक्षण सांगताना श्री. रॉय म्हणतात, " नैतिक अधिष्ठान हेच सर्वाहून मोठे अधिष्ठान होय. पार्लमेंटरी लोकशाहीचीदेखील खरी हमी कायदा नव्हे. सत्तारूढ बहुसंख्याकांच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीवरच ती अवलंबून आहे. ती देखील उच्च साध्याचे साधन असल्याचाच दावा करते.

" परंतु सत्तेचा मोह इतका जबरदस्त आहे की त्याच्या पुढे सामूहिक नीतिमत्तेचा आधारही लटपटतो. मूल्यं प्रत्यक्षात आचरणात आणावयाची तर ती व्यक्तीच्याच द्वारे आणली जातात. म्हणून आपल्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीप्रमाणे चालणाऱ्या स्वातंत्र्यप्रिय व्यक्तींचे राज्य हीच अधिकांचे अधिक हित साधण्याची हमी होय. लोकशाहीला आजच्या भयानक अरिष्टातून सुरक्षित बाहेर पडायचे असेल आणि हुकुमशाहीला जर टक्कर द्यावयाची असेल तर लोकशाहीने आपल्या तत्वज्ञानाला नवीन दिशा दिली पाहिजे. तात्त्विकदृष्ट्या नवे अधिष्ठान शोधणे आवश्यक आहे.

" या विवेचनाचा अर्थ, काही बुद्धिमान अशा निवडक श्रेष्ठींचे राज्य असावे असे नव्हे.

" व्यक्तीच्या सृजनशीलतेच्या विकासाला पुरेपूर वाव मिळेल अशा प्रकारची समाजव्यवस्था येथे अभिप्रेत आहे. राज्यसत्तेच्या कार्यकारी क्षेत्रावर स्वातंत्र्यप्रिय नागरिकांचा ताबा राहणे हे या समाजव्यवस्थेचे एक महत्वाचे अंग होय. प्रस्थापित हितसंबंध असणाऱ्या आणि पुढारी म्हणविणाऱ्यांच्या मोहक घोषणांनी भारावून जाणाऱ्या सामुदायिक अहंकाराच्या कल्पना यांच्या वर्चस्वापासून मुक्त असणे हे " स्वातंत्र्यप्रियतेचे लक्षण होय. " ( ' नवमानवतावाद ' : पृष्ठ ६३, ६४, ६५ )

संसदीय औपचारिकतेमुळे लोकशाही जीवनपद्धतीचा विकास संभवत नाही या विषयी मतभेद असू नये. कारण याला अनुभवच साक्षी आहे. तेव्हा, लोकशाही जीवनपद्धतीच्या विकासाचा प्रश्न अजूनही जसाचा तसा कायम आहे. जनसामान्यांच्या विचारकक्षेतील ती बाब नव्हे असे मानले जाते म्हणूनच तो प्रश्न जसाचा तसा कायम आहे. जनसामान्यांची विचारकक्षा आता रुंदावली पाहिजे, पसरट झाली पाहिजे. कारण लोकशाही जीवनपद्धती ही जनसामान्यांचीच जीवनपद्धती ठरावयाची आहे. ज्यांची जीवनपद्धती ठरावयाची त्यांनी त्या विषयीची जबाबदारी टाळावी असा विचित्र विपर्यास गेली कित्येक वर्षे सोसला जात आहे. म्हणून लोकशाही जीवनपद्धतीचा विकास जनसामान्यांच्या विचारापासून दूर आहे, आसपासदेखील फिरकत नाही. पण जनसामान्य सर्जनशील व्हायचे तर, (आणि लोकशाही जीवन-पद्धतीमुळे ही सर्जनशीलता यावयाची आहे हे नक्की !) लोकशाही जीवनपद्धतीचा विचार जनसामान्यांच्या विचारकक्षेत बसला पाहिजे. एवढेच नव्हे तर जनसामान्यांच्या विचारकक्षेत हा विचार तळपत राहिला पाहिजे. तरच जनसामान्यांचे स्वातंत्र्य सुरक्षित होईल.

महात्मा गांधींनी इंग्लंडच्या संसदीय पद्धतीतून आलेले दुष्परिणाम सांगितले. मानवेंद्रनाथ रॉयनी संसदीय औपचारिकतेतून लोकशाही जीवनपद्धती अस्तित्वात येणार नाही, असे बजावले. तेव्हा, संसदीय पद्धतीहून लोकशाहीची वेगळी पद्धती असू शकते किंवा कसे अशी जिज्ञासा सहजच निर्माण होते. आणि पर्यायावाचून कोणत्याही गोष्टीतला उणेपणा दाखविला की, तो उणेपणा मानवी मन आकर्षून घेत नाही, असा आजचा मनुष्यस्वभाव आहे. तेव्हा लोकशाही जीवनपद्धती निर्माण करायची म्हणजे नेमके काय करायचे असा प्रश्न निर्माण होतो. जनसामान्यांना याच प्रश्नाचा उलगडा झालेला हवा आहे. या उलगड्याविना जनसामान्यांची मती कुंठीत झाली आहे. हे जरी खरे आहे, तरी काही मूलभूत बाबी पर्यायावाचूनही स्वीकाराव्याच लागतात. जसे भारतीय स्वातंत्र्य देताना इंग्रज म्हणायचे “ हिंदुस्थानच्या लोकांची योग्यता वाढली की आम्ही स्वातंत्र्य देऊ. ” म. गांधी व इतर पुढारी म्हणायचे “ आमची योग्यता ठरविणारे तुम्ही कोण ? देश आमचाच व स्वातंत्र्यही आमचेच आहे. आमच्या स्वातंत्र्याचे आम्ही काय करायचे ते आम्हालाच ठरवू द्या. तुम्ही मात्र भारतातून चालते व्हा. ” तसेच स्वराज्यातल्या मूलभूत हक्कांचे आहे. संसदीय पद्धतीची औपचारिक लोकशाही, लोकशाही जीवनपद्धती आणायला उपयोगी नाही हे ठरल्यावर, दुसरी कोणती पद्धती हाताशी नसल्यामुळे पहिलीच योग्य किंवा

उपयोगी ठरू शकत नाही. आणि पर्यायी पद्धती अस्तित्वात नाही तोवर जुनीच पद्धती चालवायची म्हणणे देखील इंग्रजांच्या मनोवृत्तीशीच जुळणारे आहे. तेव्हा जुन्या पद्धतीचा त्याग करण्याची एकीकडे तयारी करून दुसरीकडे नवी पद्धती अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी सुरू झाल्या पाहिजेत. " आधी हे की ते " असे म्हणून चालणार नाही.

तात्पर्य, पर्यायी पद्धतीच्या अभावी ' जैसे थे ' ( स्टेटस्को ) चालेल म्हणण्याची मनोवृत्ती पुरोगामीत्वापासून दूर आहे, प्रतिगामी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. आणि एक गोष्ट टाकल्याशिवाय दुसरी गोष्ट घेण्याची इच्छाही माणसाची सहसा होत नसते. म्हणून टाकण्याच्या प्रक्रियेत क्रांती आहे. अशा क्रांतीतून नवीनता येते व ही नवीनता मानवी आकांक्षा पूर्ण करण्यास समर्थही असते.

सांसदीय पद्धतीची आजची औपचारिक लोकशाही, लोकशाही जीवनपद्धती निर्माण करू शकत नाही हे आम्ही मान्य करतो ते, लोकशाहीतल्या औपचारिकपणामुळे जनसामान्यांचे मूलभूत हक्क दुर्लक्षिले जात आहेत हे लक्षात येते म्हणूनच ! अर्थात हे मूलभूत हक्क बजावण्याची संधी जनसामान्यांना मिळावी या विषयी कोणाची हरकत असल्यास ती जनसामान्यांच्या हक्कांची गळचेपीच मानावी लागेल. आणि अशी हरकत आजच्या स्थितीत रूढीप्रिय सत्तावादी व पक्षवाद्यांचीच आहे. लोकशाही जीवनपद्धतीला मुख्य आडकाठी सत्तावाद व पक्षवाद यांचीच आहे. पण ही आडकाठी दूर करणे देखील जनसामान्यांच्या कर्तृत्वामुळे शक्य होणारे आहे. आज जनसामान्यांना लोकशाहीच्या आजच्या सांसदीय पद्धतीत केवळ मतदानाचा हक्क आहे. पण तोही समजून मतदान करण्याचा नाही. जो बळकावील त्याच्याकडेच मते जातात. कारण, पक्षांचे अस्तित्वच मते बळकावण्याच्या पद्धतीमुळे टिकून आहे व याच पद्धतीमुळे त्यांचे अस्तित्व टिकून राहू शकते. मोकळ्या वातावरणात सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून मतदान करण्यास आजच्या ( सांसदीय ) पद्धतीत मतदाराला संधीच नाही. दुसरे असे की उमेदवार निवडीचा हक्कही पक्षवाल्यांनी स्वतःकडेच ठेवला. तो वास्तविक मतदारांचा हक्क आहे. उमेदवार निवडण्याचा हक्क बजावतांना मतदार पुष्कळ अनिष्ट गोष्टी टाळू शकतात, जे पक्षवाद्यांना शक्य होत नाही. जसे मतदारसंघातले मतदार योग्य अशा एकाच उमेदवाराला प्रत्यक्ष निवडणूक न करताही आपला प्रतिनिधी निवडू शकतात. फारशी योग्यता नसताना केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या माणसाची मक्तेदारी

नष्ट करता येते आणि आपण ठरविलेल्या प्रतिनिधीवर योग्यप्रकारे नियंत्रणही ठेवता येऊ शकते. तेव्हा, मतदानाचा हक्क, उमेदवार निवडण्याचा हक्क हे तीनही हक्क मतदारांनी प्राप्त करणे जरूरीचे झाले आहे.

याकरिता मतदार संघ प्रशिक्षित करावा लागेल. मतदार संघाला मुठीत ठेवण्याची आजची पद्धती बदलून मतदारसंघाच्या मुठीत उमेदवाराला किंवा प्रतिनिधीला ठेवता येण्याची पद्धती अस्तित्वात आणता येऊ शकेल. पण, याकरिता मतदारांनीच प्रथम स्वतःचे हक्क नीट समजाऊन घ्यायला हवेत. हे हक्क म्हणजे निव्वळ हक्कच नव्हेत, जबाबदाऱ्याही या हक्कांच्या पाठोपाठ येतात. या जबाबदाऱ्या पेलण्याइतपत सुबुद्धपणा मतदार - संघात यावा लागेल. मतदारसंघ अशा पद्धतीने संघटीत करावा लागेल. मतदार संघाला स्वतःच्या हक्कांविषयी संघटित करणे मोठे पुरुषार्थाचे काम आहे व हा पुरूषार्थ करण्याचे लोकशाहीच्या निःस्सीम समर्थकांनी स्वीकारले पाहिजे. हा पुरुषार्थ करण्यास धजणे म्हणजे एक आव्हान स्वीकारणेच होय. पण, हे आव्हान स्वीकारलेच पाहिजे. याकरिता जाणीवेत तारुण्य आले पाहिजे. केवळ वयाने तरुण असून भागणार नाही. जाणीवेनेही तरुण असावे लागेल.

लोकशाही जीवनपद्धतीचा प्रादुर्भाव, मतदार संघात आज तरी हक्काची व जबाबदारीची जाणीव आल्यानेच होऊ शकेल. यातूनच लोकशाहीतला आजचा औपचारिक भाव हळूहळू गळेल व खराखुरा भाव प्रगट होईल. तोच जनसामान्यांच्या स्वातंत्र्याच्या विकासाला साधनभूत ठरेल.

● ● ●

## संस्करित बहुमत आणि उपजत लोकमत

स्वास्थ्यलाभासाठी प्रथम रोगाचे निदान व्हावे लागते. निदानानंतर केलेला उपायच सार्थकी लागतो. म्हणजे योग्य निदानाशिवाय केलेला उपाय निरर्थक ठरतो, त्याने स्वास्थ्यलाभ होत नाही लोकशाहीच्या बाबतीतही असेच झाले आहे. लोकशाहीचे स्वास्थ्य बिघडले आहे असे म्हटले जाते. म्हणून उपायांचा सतत विचार केला जातो. पण स्वास्थ्य बिघडण्याचे कारण मात्र शोधले जात नाही. त्यामुळे लोकशाहीला स्वास्थ्यलाभ होत नाहीच, शिवाय केले जाणारे उपाय निरर्थक ठरतात.

वस्तुतः लोकशाहीच्या अभिव्यक्तीचा विचार कमी केला जातो. म्हणजे लोकशाही जशी अभिव्यक्त व्हावी असे मानले जाते, तशी ती होत नाही याकडे लक्षच दिले जात नाही. लोकमतातून लोकशाही अभिव्यक्त व्हावी असे

मानले जाते. पण लोकमताऐवजी बहुमताने लोकशाही अभिव्यक्त केली जाते. लोकमत आणि बहुमत यांत खूप अंतर आहे. म्हणून लोकमताची लोकशाही व बहुमताची लोकशाही यातही अंतर आहे. लोकमत आणि बहुमत यातले अंतर सामान्य स्वरूपाचे नाही, तर हे अंतर गुणधर्माचे आहे. लोकमताचा गुणधर्म आणि बहुमताचा गुणधर्म परस्परांहून नुसते भिन्न नाहीत, तर परस्परांना छेदणारेही आहेत. म्हणून या दोहोत द्वंद्व आहे. बहुमताचा गुणधर्म संस्कारित आहे. लोकमताचा गुणधर्म उपजत आहे. तेव्हा, उपजत गुणधर्माची लोकशाही अभिव्यक्त झाल्यास तिच्या स्वास्थ्याचा प्रश्न निर्माण होत नाही. पण संस्कारित गुणधर्माने अभिव्यक्त झालेल्या लोकशाहीच्या स्वास्थ्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. भारतीय लोकशाहीच्या स्वास्थाचा प्रश्न ती संस्कारित गुणधर्माने अभिव्यक्त झाल्यामुळे निर्माण झाला आहे.

उपजत लोकमत व संस्कारित बहुमत या दोन बाबी सध्याच्या स्थितीत अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महत्त्वाच्या यासाठी की, यातून कोणत्या एका गोष्टीची निवड केली असता स्वस्थ लोकशाही लाभेल हे ठरायचे आहे. लोकमत हे लोकमतच असते, ते बहुमत असू शकत नाही. आणि जे बहुमत आहे ते लोकमत असू शकत नाही. लोकशाही लोकमतातून अभिव्यक्त व्हायची म्हणजे ती बहुमताची अथवा अल्प-मताची नसावी हे गृहीतच धरले गेले पाहिजे. म्हणून लोकशाहीचे लोकमत म्हणजे काय असा प्रश्न या बाबतीत निर्माण होतो. लोकशाहीचे लोकमत म्हणजे सर्वसंमति होय. पण सर्वसंमति म्हणजे मूढमति नव्हे. कारण, सर्वसंमति ही अधिक जागृत अवस्था आहे. लोकशाही( व्यवस्थे )ची सर्वमान्यता ही मूढतेची असू शकत नाही. या व्यवस्थेत सर्वांच्या हितरक्षणाची जाणीव ओतप्रोत असावी लागते. त्याशिवाय सर्वसंमति ही उपजत मती असू शकणार नाही.

सर्वहितदक्ष नीती सर्वसंमतीचा वास्तविक आधार असतो. या आधाराला मतभिन्नतेचा उपद्रव होऊ शकत नाही. कारण, मतभिन्नता सर्वहितदक्षतेपासून भिन्न असू शकत नाही. म्हणून या दृष्टीने भिन्नमत लोकशाहीचा गुणच ठरतो. पण सर्वहितदक्ष असतो म्हणून तो लोकशाहीला उपद्रवकारी नसतो.

उपजत लोकमत लोकशाहीला आस्थेवाईकच असते. म्हणून हे लोकमत लोकशाहीच्या व्यवस्थेत प्रत्यक्षपणे सहभागी तत्त्व म्हणून नांदत असते. लोकमत लोकशाहीचे सहभागी तत्त्व असते तेव्हा त्याच्या विभागणीची शक्यता नसते व

प्रयोजनही नसते. कारण, अशा विभागणीतून लोकमताचा शक्तिक्षय होतो. अर्थात सहभागी तत्त्व हे शक्तिमान तत्त्वही आहे. शक्ति मतविभागणीतून निर्माण होत नाही; बहुमत अथवा अल्पमत म्हणजे मतविभाजन आहे. तेव्हा,यात शक्ति संभवत नाही. पण मतविभाजनात शक्ति असल्याचा भ्रम मात्र असतो. मतविभाजनाच्या प्रक्रियेतूनच संस्कारित बहुमत निर्माण केले जाते. या बहुमताला लोकशाहीच्या सहभागी तत्त्वाची योग्यता प्राप्त होत नसते. कारण मतविभाजनाने सहभागीतत्त्व नाहीसे केले जाते. म्हणून मतविभाजन हेच ( लोकशाहीच्या ) सहभागीतत्त्वाच्या विपरीत आहे. अर्थात मतविभाजनाच्या संस्कारातून निर्माण झालेल्या बहुमताला लोकशाहीचा आकार कधीच आला नाही व तसा आकार येणे संभवतही नाही. म्हणून संस्कारित बहुमत लोकशाही निर्माण करण्यास उपयोगी नाही.

उपजत लोकमत हे लोकशाहीचे सहभागी तत्त्व आहे. म्हणून लोकशाहीची अंतिमस्थिती या लोकमतानुसार बनते. यालाच लोकाभिक्रम म्हणावयाचे. उपजत लोकमत म्हणजे लोकशाहीत आवश्यक असलेला लोकांचा अभिक्रम. हा अभिक्रम म्हणजेच लोकशाही आकाराला आणण्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेची सुरुवात विधिमंडळातून होत नाही तर लोकजीवनांतून होते. लोकजीवनांतला लोकाभिक्रम जितका जागृत तितकीच लोकशाही आकाराला येत असल्याची हमी अधिक. लोकशाहीची हमी लोकाभिक्रमावरच अवलंबून आहे. म्हणून लोकशाही लोकाभिक्रमानेच आकाराला येते हे मान्य झाले पाहिजे. लोकशाहीचे वैधानिक स्वरूप औपचारिकतेतून निर्माण होते. निवडणुका, विधिमंडळ, मंत्रिमंडळ, शासनयंत्रणा अशा औपचारिकतेतून लोकाभिक्रमाला प्रोत्साहन मिळत नाही असा आजपर्यंतचा अनुभव आहे. म्हणून औपचारिक लोकशाहीच आकाराला येताना दिसते. प्रत्यक्ष लोकशाही पुसटशीही दिसेनाशी होते. तेव्हा, लोकशाहीचे वैधानिक स्वरूप निव्वळ औपचारिक असल्यामुळे हिच्या यशाची शक्यताच उरलेली नाही. कारण लोकशाही व्यवस्थेत लोकांना सहभागी करून घेण्याची पात्रताच या औपचारिकतेत नाही. तेव्हा औपचारिक लोकशाहीला म्हणजेच संसदीय लोकशाहीला नवा पर्याय उभा केला पाहिजे. कारण, संसदीय पद्धतीतून लोकशाही व्यवस्थेत लोक प्रत्यक्षपणे सहभागी होऊ शकतील अशी स्थिती उरली नाही. अर्थात संसदीय पद्धतीला अजून तशी पात्रताच आली नाही व येणारही नाही. म्हणून लोकशाही व्यवस्थेत, तिच्या निर्माण व संरक्षणात लोक सहभागी होतील असा नवा पर्याय निर्माण करणे अनिवार्य झाले आहे. हे शक्य न झाल्यास भारतीय समाज स्वतःचे स्वातंत्र्य गमावून बसेल.

लोकशाहीच्या संसदीय पद्धतीला पर्याय कोणता असा प्रश्न आहे. अर्थात संसदीय पद्धतीच्या अपयशातून हा प्रश्न निर्माण झालेला असला तरी तो कोणत्यातरी पद्धतीचा पुरस्कार करण्यासाठी नाही. अर्थात लोकांचे सहभागीतत्व ज्यात ओतप्रोत आहे अशा पद्धतीच्या शोधासाठी हा प्रश्न आहे. म्हणजे लोकशाहीतला लोक आलोकीत ( प्रकाशित ) व्हावा. तो आलोकित झाला नाही तर लोकशाहीच्या चौकटीत गुलामीची प्रतिमा शोभायमान होईल. तेव्हा, नुसत्या चौकटीचे महत्व नसून चौकटीत कोणती प्रतिमा विराजमान झाली आहे, त्यावरून चौकटीचे महत्व मान्य होणार आहे. म्हणून लोकशाहीच्या चौकटीत गुलामीचीच प्रतिमा आकारणार असल्यास चौकटीसह प्रतिमा भिरकावली पाहिजे. अर्थात ती भिरकावताना लोकशाहीच भिरकावली जात नाही ना हे पाहिले पाहिजे; म्हणजे संसदीय पद्धतीला पर्याय शोधला पाहिजे.

नवा पर्याय बहुमताचा नसावा. कारण, बहुमत हे लोकमत नव्हे. तेव्हा तो लोकमताचाच पर्याय असावा. लोकमताची प्रेरणाच सर्वसंमतीची आहे. म्हणजे सर्वसंमति हा संसदीय पद्धतीला नवा पर्याय ठरू शकेल. अर्थात संसदीय पद्धतीची औपचारिकता यात नसेल. लोकशाहीचे क्रियाशीलतत्व यात असेल. संसदीय पद्धति सत्ताकेंद्रित आहे म्हणून ती औपचारिक आहे, पण सर्व संमतीतून उभा होणारा पर्याय सत्ताकेंद्रित नसणार. कारण, हा पर्याय लोकमताचा असल्यामुळे तो व्यक्तिकेंद्रित राहील. व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा आकार तोच लोकशाही व्यवस्थेचा आकार. म्हणून लोकशाहीचे व्यक्तिमत्व हे लोकांचेच व्यक्तिमत्व राहील. अर्थात व्यक्ति आत्मकेंद्रित राहील, सत्ताकेंद्रित राहणार नाही.

सर्वसंमतीतून लोकशाही अभिव्यक्त व्हावी कशी हा दुसरा प्रश्न. लोकमतातून लोकशाही अभिव्यक्त व्हावी हे सर्वसाधारणपणे मानले जाते. तरी लोकशाहीचे लोकमत निर्माण होणे संभवनीय आहे काय, ही त्या बाबतची शंका आहे. अर्थात ही शंका मनुष्यस्वभावाच्या वास्तविकतेतून निर्माण झाली आहे. लोकमत स्वार्थप्रेरित असते म्हणजे विकारवश असते असे म्हटले जाते. स्वार्थप्रेरणा व विकारवशता या दोन गोष्टी या बाबतीत एकत्रच लक्षात घेतल्या जातात. म्हणून स्वार्थप्रेरणा ही सर्वांना सुखकारी असू शकते ! याची कल्पनाच केली जात नाही. अर्थात स्वार्थप्रेरणा म्हणजे विकारवशता असे मानले गेल्यामुळे लोकमत हे विकारवश असतेच हे गृहीत धरले गेले आहे. पण स्वार्थप्रेरणा सर्वसुखकारी असू शकेल याची कल्पना करता आली पाहिजे. व्यक्तीचा स्वार्थ हा समष्टीला हानिकारक

नसावा; म्हणजे सर्वांना लाभकारक ठरणारा स्वार्थ विकारवश नसतो हे लक्षात आले पाहिजे. तेव्हा, लोकमताची विकारवशता नेमकी हेरता आली पाहिजे. लोकमताला आपण विकारवशमत म्हणतो ते यासाठी की ते भिन्न मत आहे. म्हणजे एकमत नाही. पण भिन्न मत हेच लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. भिन्नमतात विकार नाही तर विचार आहे. भिन्नमत हा लोकशाहीचा विचार आहे. तो आहे म्हणूनच लोकशाहीचे प्रयोजन आहे. वस्तुतः भिन्न मतातच लोकशाही व्यक्त होत राहते, म्हणजे भिन्नमत लोकशाहीचे व्यक्तरूप आहे. पण भिन्नमत म्हणजे अल्पमत किंवा बहुमत नव्हे. ते संपूर्ण मत आहे. संपूर्ण मत बहुरूपी किंवा अल्परूपी नसते. म्हणून जे संपूर्ण मत आहे ते कोणावर लादले जात नाही. लादण्याच्या हेतूने ते निपजतच नाही. अल्पमत किंवा बहुमत कोणत्या ना कोणत्या प्रकारे लादले जाते. त्या हेतूनेच ते निपजतेही. तेव्हा भिन्नमत हे संपूर्ण मत असल्यामुळे कोणावरही लादले जाणे संभवत नाही. पण भिन्नमताचे व्यक्तरूप हे नागडे असते, वास्तविक असते. कोणतेच आवरण त्याला नसते. आवरण नसलेले मत वस्तुतः निर्मळ असते. पण निर्मळता आता सोसणारी राहिली नाही, झोंबणारी झालेली आहे. म्हणून तिला आपल्या कल्पनांच्या विकाराचे आवरण आम्ही चढवीत आलो. तिला विद्रुपतेचे मुखवटे चढवीत आलो. म्हणजे वास्तवापासून दूर राहण्याचा आम्ही प्रयत्न करीत आलो. तेव्हा, भिन्न मत हे विकारवश नाही म्हणून आक्रमणकारीही नाही. अर्थात भिन्न मताची भीती बाळगल्यानेच एकमत निर्माण केले जात नाही. भिन्नमताच्या आदरातच एकमताचा जन्म आहे. त्याच्या अनादरातून एकमत निपजणारच नाही. तेव्हा भिन्नमताचे वैशिष्ट्य जतन करण्यासाठीच एकमत निपजले पाहिजे. भिन्न मताच्या आदरातून निपजणारे एकमत म्हणजे सर्वसंमति होय. म्हणून भिन्न मतांना समान पातळीवर ठेवून त्यांच्या वैशिष्ट्यांना गुंफणारे एकमत किंवा सर्वसंमति हाच औपचारिक संसदीय पद्धतीचा नवा सशक्त पर्याय ठरतो.

सर्वसंमतीचा पर्याय हा वास्तविक पर्याय आहे. म्हणून लोकशाही व्यवस्थेचे व्यक्त होणारे निर्णय सर्वसंमतीतून व्यक्त झाले पाहिजेत. बहुमतातून व्यक्त होणारे निर्णय हे लोकमताचे निर्णय मानलेच जाऊ नयेत. म्हणून लोकशाहीच्या निर्णयात सर्वसंमतीची अभिव्यक्ति अनिवार्य मानली पाहिजे. याची प्रक्रिया सुरू झाली तर लोकशाहीला स्वास्थ्य लाभेल. निर्णयात सर्वसंमती अभिव्यक्त होणे, ही खऱ्या लोकशाहीची खरी जाणीव होय.

लोकशाही व्यवस्थेत निर्णयाचे महत्त्व सर्वमान्य आहे. प्रतिनिधींच्या

कार्यकारी संस्थेकडून अभिव्यक्त होणारा निर्णय बहुधा लोकांचा निर्णय नसतो. परिवर्तित मतांचा निर्णय असतो. प्रतिनिधींचे मत हे परिवर्तित मत असते, ते लोकमत नसते. हे मत अनेक कारणांमुळे परिवर्तनीय असते. आणि ते प्रामाणिक असले तरी तिचे परिवर्तनीय स्वरूप लोकद्रोही बनू शकते. तेव्हा, लोकशाहीतला निर्णय हा लोकांचा निर्णय असण्यासाठी लोकातच निर्णयशक्ति उभी करणे आवश्यक झाले आहे. यासाठी प्रथम जीवनाच्या प्राथमिक गरजपूर्तीच्या संदर्भात लोकांची निर्णयशक्ति जागृत करता आल्यास परिवर्तित मतांच्या निर्णयाने होणारा धोका टाळता येऊ शकेल. यासाठी लहान समूहात किंवा ग्रामपातळीवर निर्णयशक्ति उभी केली पाहिजे. या ग्रामपातळीच्या साह्याने घेतलेला निर्णय कार्यान्वित होण्याची शक्यताही अधिक असते. कार्यान्वित होणारे निर्णय हेच खरे निर्णय म्हटले जातात. कार्यान्वयनाची शक्यता प्रतिनिधींच्या कडून कमी असते, जवळपास नसते. म्हणून कार्यान्वित न होणारे निर्णयच प्रतिनिधि अधिक प्रमाणात घेत असतात. म्हणून ते वास्तविक नसतात. निर्णयांचे कार्यान्वयन लोकांनी केले पाहिजे. त्यासाठी निराळ्या यंत्रणेची आवश्यकता असू नये. सध्याच्या स्थितीत कार्यान्वयनाची यंत्रणा ही शासकीय असल्यामुळे तिच्या कार्यन्वयनात पुरेसा प्रामाणिकपणा दिसून येत नाही. म्हणून कार्यान्वयनात पुरेसा प्रामणिकपणा आणण्यासाठी निर्णय लोकांचे असावे लागतील, तरच निर्णयांच्या कार्यान्वयनाची शक्यता असेल. हे राष्ट्रीय प्रश्नांच्या बाबतीत तूर्त विचारात घेता येत नाही. तरीपण राष्ट्रीय प्रश्नांचे निर्णय देखील लोकांच्या प्रत्यक्ष सहकाराने घेणे शक्यही होईल. तेव्हा, लोकशाहीच्या निर्णयात लोकांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे. याची सुरुवात ग्रामपातळीवर केली जाणे शक्य आहे. यामुळे लोकमत स्वतंत्र होईल. स्वतंत्र लोकमताचा लोकशाहीतल्या निर्णयांसाठी उपयोग झाला तरच लोकमताची लोकशाही अभिव्यक्त होणे संभवनीय होईल. अर्थात लोकशाहीच्या निर्णयात स्वतंत्र लोकमत प्रत्यक्षपणे परिणाम करीत गेल्यासच लोकशाहीच्या यशाची जबाबदारी लोक घेऊ शकतील. पण या सोबत लोकस्वायत्तताही वाढेल. लोकशाहीत निर्णयांच्याबाबतीत लोकस्वायत्तता वाढणे ही लोकशाहीच्या सुरक्षेची हमी आहे. म्हणून लोकस्वायत्ततेची जे भीती बाळगतात ते लोकशाहीचीच भीती बाळगतात असे म्हटले पाहिजे. तेव्हा, निर्णयविषयक स्वायत्तता हा लोकांचा लोकशाहीतील मूलभूत हक्क कोणत्याच कारणांसाठी नाकारता येत नाही; आणि जे नाकारतात ते लोकशाहीच नाकारतात असा त्याचा अर्थ होईल.

● ● ●

# निरंकुश औद्योगीकरण : एक भयानक शाप

आजच्या युगांत विकास आणि औद्योगीकरण या दोन गोष्टी इतक्या एकजीव होऊं पाहत आहेत की ' औद्योगीकरणाशिवाय विकासाची कल्पनाही करतां येत नाही' असें एक मूल्य प्रस्थापित होऊं पाहत आहे. पारतंत्र्याची बंधने तोडून स्वतंत्र झालेल्या सर्वच राष्ट्रांना पुढची वाटचाल करण्याकरिता व विकास साधण्याकरिता औद्योगीकरणाचे आकर्षण सतत व वाढल्या प्रमाणांत वाटत आहे असेंच म्हणतां येण्यासारखे आहे. चीनसारख्या कांही राष्ट्रांनी स्वतंत्र होताच औद्योगीकरणाला प्राधान्य दिले नाही, तरी कृषिविकासाची एक विशिष्ट पातळी गाटल्यावर चीनमध्ये औद्योगीकरणाची आकांक्षा निर्माण झाली. औद्योगीकरणामुळे अन्नोत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो आहे असें दिसताच औद्योगीकरणांत गुंतलेल्यांना त्यांतून काढून अन्नोत्पादनांत पुन्हा गुंतविण्याची खबरदारी चीनने घेतली हे जरी खरे आहे,

तरी चीनला जागतिक महत्त्व प्राप्त करून घेण्याची ईर्षा निर्माण झाल्यामुळे आणि औद्योगिक आकर्षण असलेल्या आशियायी राष्ट्रांवर स्वतःचा प्रभाव पाडावयाचा असल्यामुळे चीन औद्योगिक वाढीकरिता सर्वशक्तीनिशी झटल्याशिवाय राहणार नाही हें उघड आहे. जगांतली बलाढ्य राष्ट्रें—जीं अमेरिका आणि रशिया अशा दोन गटांत विभागलेली आहेत तीं सर्व राष्ट्रें मागासलेल्या राष्ट्रांना औद्योगिक साहाय्य देऊन त्यांच्या विकासाविषयी वेळोवेळी सहानुभूति दर्शवितात. कारण त्यांचे आहे तें जागतिक प्रभुत्व टिकविण्याकरितांच त्यांना तसें करावें लागतें हें दृष्टीआड करता येत नाही. तात्पर्य, या ना त्या रूपांत औद्योगिकरणाचें व औद्योगिक विकासाचे आकर्षण जगांत सर्वत्र दिसून येतें. म्हणून आधुनिक युग हें औद्योगिक युग म्हणून ओळखले जाते.

मागासलेल्या किंवा विकसित अशा सर्वच राष्ट्रांना औद्योगीकरणाचें आकर्षण विकासाच्या दृष्टीनेच वाटतें, तरी औद्योगीकरणामुळेच विकासाची संधि संभवते, अन्यथा विकासाची संधि संभवतच नाही हा त्या पाठीमागला आग्रहीपणा लक्षांत घ्यायला हवा. आणि या आग्रहीपणामुळेच औद्योगीकरणाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न होत असतो. अर्थात् या आग्रहीपणांतली जाणीव सर्वस्वी निर्दोष आहे किंवा नाही याचा विचार होणेंहि अगत्याचे आहे. कारण, हा विचार न केला तर विकासाच्या दृष्टीने औद्योगीकरणाचें वाटतें तें अगत्य फारसें टिकाऊ स्वरूपाचे होईल अशी कल्पनाही करतां येत नाही. तेव्हा, विकासाच्या दृष्टीने औद्योगीकरणाचें वाटणारे अगत्य वास्तविक आहे किंवा काय याचाच प्रथम विचार करावयास हवा.

औद्योगीकरणामुळे विकासाकरिता जी संधि संभवते ( असें मानले जातें ) ती माणसाच्या सुखसोयींमध्यें भर घालणारी आहे आणि नसलेले सुख प्राप्त करून देणारी आहे असा सर्वसाधारण समज आहे. आणि हा समज चुकीचा नाही असेच आज मानलें जातें. पण मनुष्य-जीवनात ज्या सुखसोयींची भर यामुळे पडतें किंवा नसलेलें जे सुख प्राप्त होते, त्या सुखाला मनुष्य-जीवनाच्या भवितव्या-विषयीची दूरदृष्टि असतेंच असें मानता येणार नाही. कारण औद्योगीकरणामुळे येणाऱ्या सुखसोयी निव्वळ भौतिक स्वरूपाच्या आहेत. त्यांतून मानसिक घडणीला हवी तशी संधि असतेंच असें नाही. किंबहुना नसते म्हटल्यासहि योग्यच होईल. तेव्हा भौतिक सुखाची प्राप्ति ज्या संधिमुळे होते ती संधि मनुष्याला वास्तविक सुखापासून नेहमीच दूर ठेवते असाच मनुष्य जीवनांतला आजवरचा अनुभव आहे.

उलट खऱ्या सुखाकरिता भौतिक सुखाचा बुद्धिपुरस्पर त्याग करावा लागतो व हाच सुखप्राप्तीचा आदर्श आजपर्यंतच्या काळांत निर्माण झाला आहे. तेव्हा, औद्योगीकरणाला खऱ्या सुखप्राप्तीच्या दृष्टीने संधि प्राप्त करून देण्याची क्षमता नाही हें अगदी सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. उलट औद्योगीकरणामुळे माणसांत ज्या आकांक्षा निर्माण होतात व माणसाचे मन ज्या दिशेने धावत सुटतें त्या आकांक्षा व ती दिशा मृगजळांतल्या प्रकाराप्रमाणेच आहे. म्हणजे सुख जवळ दिसू लागतें तरी त्याचा पत्ता सबंध जीवनांत धडपड करूनहि मिळत नसतो. तेव्हा, औद्योगीकरणामुळे मनावर जो संस्कार होत आहे तो भौतिकतेंतून येणाऱ्या इंद्रियसुखाच्या पाठीशीं लागण्याचाच ! सबब हें इंद्रियसुख मनुष्याला शांति देणारे सिद्ध होत नाही. उलट जीवनांतली अशान्तिच वाढत जाते. अर्थात् औद्योगीकरणामुळे बऱ्याच सुखसोयी प्राप्त झाल्या आहेत असें मानलें तरी व्यक्तीच्या जीवनांत अशान्ति निर्माण करण्यासहि त्या सुखसोयी कारण झाल्या आहेत हेहि विसरून चालणार नाही.

जागतिक शांततेचा प्रश्न विकट कशामुळे होतो ? भौतिक सुखाची प्राप्ति करण्यांत मनुष्य व राष्ट्रे स्पर्धेत उतरल्यामुळेच ! या स्पर्धेत जो यशस्वी होतो त्याला भौतिक सुखाची प्राप्ति होते व ही आकांक्षा कधीच शमणारी नसल्यामुळे प्रभुत्वाची आकांक्षा व्यक्तींत आणि राष्ट्रांत जोर करूं लागते. यांतूनच हिटलर जन्मला; यांतूनच स्टॅलिन जन्मला. यांतूनच हुकुमशहा व मानवजातीला स्वातं-त्र्यापासून वंचित करणारे निर्माण झाले. अर्थात् भौतिक सुखाची स्पर्धा निर्माण झाली व त्या स्पर्धेमुळे अशान्ति निर्माण झाली. हीच अशान्ति जागतिक सहअस्तित्वाला घातक ठरत आहे.

तात्पर्य, शांततामय सहअस्तित्वाचा प्रश्न जो अतिशय कठीण आणि कधीहि न सुटणारा म्हणून अत्यंत स्फोटक ठरून जगाला भयभीत करीत आहे तो औद्योगी-करणाच्या अवास्तव हव्यासामुळे आणि औद्योगीकरण अनियंत्रित स्वरूपांत रुजविण्याच्या पद्धतीमुळेहि निर्माण झाला आहे हें त्या प्रश्नाच्या अंतरंगांत शिरल्या-नंतर सहज लक्षांत येण्यासारखे आहे.

औद्योगीकरणामुळे भौतिक विकास साधला जातो तरी मनुष्याच्या विकारांना नको तशी चालनाहि मिळते, आणि मनुष्याचे विकार अनियंत्रित पद्धतीने संचार करूं लागले की त्याचा परिणाम जीवन-कलह निर्माण करण्यांत होतो. या दृष्टीने

हव्या त्या प्रमाणांत काळजी न घेतांच औद्योगीकरण निरंकुशपणें रुजविण्याचा प्रयत्न केल्याने मानवी - जीवनाला फार मोठा धोका निर्माण होतो याची जाणीव त्वरीत व्हायला हवी. मग औद्योगीकरण निरुपयोगी आहे काय ? उपयोगी असो वा निरुपयोगी असो, पण निव्वळ औद्योगीकरण हें खऱ्या विकासाला संधि देणारें नाही एवढे मात्र खास. अर्थात् औद्योगीकरण हें विकासाला साहाय्यक होऊं शकतें. पण केव्हा ? औद्योगीकरण पुरेशा नियंत्रणांत रुजविले जाईल तेव्हा.

मनुष्यजीवन प्रतिष्ठित करणें हाच खरा विकासाचा हेतु. मनुष्यजीवन प्रतिष्ठित करणारी अर्थात् जीवन - विकास साधणारी साधनें ही भौतिक आणि आत्मिक पातळीवरची अशी दोन तऱ्हेची मानली जातात. पण भौतिक साधनांना जसें संख्येंत बसवितां येणें शक्य आहे तसें आत्मिक साधनांचे नाही. माणसाच्या वस्तुविषयक गरजा संख्येने मोजता येतात. अन्न, वस्त्र, निवारा आणि विलास हीं सर्व मोजता येऊं शकतात. त्यांची क्षमता, टिकाऊपणा व परिणामकारता गणिताने व उपभोगाने सिद्ध करतां येते. पण आत्मिक साधनांचे तसें नाही. आत्मिक साधनें हीं नेहमी मानसिक घडणीवर जोर देतात. तीं इच्छा व आकांक्षा अधिकाधिक निर्दोष करण्याचा प्रयत्न करतात. जीवनांत वस्तूंच्या उपभोगाची खरी दृष्टि निर्माण करतात व वस्तूंचा उपभोग घेतांना जीवनांत शांतीला संधि असावी असे मनाला वळण देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे माणसांत सहअस्तित्वाची जाणीव नित्य जागृत राहूं शकते. असे माणसामाणसांतले भावनात्मक संबंध टिकविण्याची प्रेरणा आत्मिक साधनामुळेच मिळते. आणि भावनात्मक संबंध सुरक्षित व विकसित होऊं शकले की सहअस्तित्वाला बाधा निर्माण होत नाही. ह्या आत्मिक साधनांचा परिणाम तात्काळ दिसून येत नाही. आत्मिक साधनांच्या उपयोगाचा परिणाम आत्मक्लेशामुळे व बलिदानामुळे दीर्घ मुदतीनंतर दिसू लागतो. झाड उगवावें व त्याचीं गोड फळे चाखता यावीत म्हणून जसें बीज रुजावें लागतें तसें शांततामय सहजीवनाच्या साध्याकरिता आत्मक्लेशाचा व बलिदानाचा मार्ग यशस्वीपणें चालावा लागतो.

या बलिदानाला कशाच तऱ्हेचें माप नाही. तरी बलिदानाचा मार्ग चालतांना त्याची ओळख पटण्याकरिता व मार्ग चालत असल्याची खात्री व्हावी म्हणून एका विशिष्ट वृत्तीचें दर्शन व्हावे लागतें. तें दर्शन म्हणजे मनुष्यजीवनांत स्नेहमयता वाढत आहे, प्रकट स्वरूपांत जीवनांत स्नेह उतरत आहे याचा अनुभव. जीवनांत स्नेहमयता आली की त्या स्नेहमयतेचा विकास बलिदानाच्या

दिशेनेच होतो आणि त्याचाच प्रभाव जनमनावर सदोदित पडूं लागला व टिकला तर माणसाला थोडीतरी अंतर्मुखता येऊ लागते. माणूस बाह्यसुखाकडे थोडेंतरी दुर्लक्ष करूं लागतो; आत्मसुखाविषयी विचार करूं लागतो. त्याला थोडीतरी आत्मसुखाची आस्था वाटूं लागते. अंतर्मुख होऊन थोडाहि विचार करणें हें मानवी जीवनाला शांततामय सहअस्तित्वाचें भवितव्य असल्याचे लक्षण मानावें. " जोडावा स्वल्पहि धर्म । तारी मोठ्या भयांतुनी. " हाच अनुभव अल्पस्प अंतर्मुखतेमुळे येऊं शकतो.

तात्पर्य, ऐक्यवर्धक अशा भावनात्मक संबंधांना पोषण देण्यांतूनच शांततामय सहअस्तित्वाचें ध्येय गाठता येतें. आणि त्याकरिता ज्या साधनांची अनिवार्यता सिद्ध होते ती आत्मिक साधनें नेहमीच प्रभावी असावी लागतात. साधनें प्रभावी असल्याचे प्रत्यंतर येणें हें मनुष्य - जीवनात स्नेहमयता ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणावरच अवलंबून आहे. हें प्रमाण बलिदानापर्यंत जाऊन भिडलें की हा प्रभावीपणा सिद्ध होतो. त्यांतूनच मनुष्यजीवनाच्या प्रतिष्ठेकडे आणि जीवन-विकासाकडे नेणारा मार्ग मोकळा होतो. यालाच आत्मनिष्ठ विकासाची प्रक्रिया म्हणावें. अर्थात् मानवी - विकासाचा अर्थच मनुष्य आत्मनिष्ठ होणें असा आहे.

आत्मविकास आणि औद्योगीकरणांतून येणारा विकास या दोन गोष्टी मनुष्य-जीवनाशीं निरनिराळया कारणामुळे निगडित आहेत. औद्योगीक विकास हा केवळ वस्तुनिष्ठ असल्यामुळे निरंकुशपणें तो रुजविला गेला तर मनुष्याची प्रतिष्ठा किंवा आत्मनिष्ठ असा जीवन - विकास संपुष्टांत येईल, आणि आत्मविकासाची वृत्तीच मारली जाईल. सबब आत्मनिष्ठ जीवनव्यवहारात वस्तुनिष्ठ औद्योगिक विकास कोणत्या पद्धतीने दाखल करावयाचा याचा विवेक मनुष्याला करता आला पाहिजे. हा विवेक केला जात नाही म्हणूनच औद्योगीक विकास भस्मासुरासारखा मातला आहे व मनुष्य जीवनाला धोका पोहोचविण्याइतपत त्याची भयंकरता स्पष्ट होऊं लागली आहे. जगांत दिसणारें भयाचें वातावरण हेंच दर्शवीत नाही काय !

तात्पर्य, औद्योगीकरणाला जीवन व्यवहारांत बसविताना विवेकपूर्वक औद्योगिक विकासाला नियंत्रित केलें पाहिजे व केवळ औद्योगिक विकास उपयुक्त नाही हें विकासाची आकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तींनी व राष्ट्रांनी जाणिवेंत घेतलें पाहिजे. याशिवाय औद्योगीकरणाचा जरूर त्या दृष्टीने उपयोग होणार नाही. शिवाय निरंकुश औद्योगीकरणामुळे शांततामय सहजीवनाचा प्रश्न अधिकाधिक स्फोटक होत जाण्याची शक्यता आहे.

● ● ●

## नियोजनाचा एकमेव निकष : ग्रामीण स्वयंपूर्णता

विकासाच्या कल्पनेत औद्योगीकरणाचे स्थान महत्त्वाचे मानले जाते. किंबहुना औद्योगीकरणाशिवाय विकास संभवत नाही असा समजच होऊन बसला आहे. अर्थात विकासाची कल्पना ही मुळात उपभोगाच्या संधीत वाढ करण्याची म्हणून वस्तूउत्पादन व विनियोगाच्या वृत्तीची आहे. आणि औद्योगीकरणामुळे अशा वृत्तीला पुरेशी संधी मिळते असे मानले गेल्यामुळे औद्योगीकरण म्हणजेच विकास वाटत असल्यास नवल नाही ! पण औद्योगीक विकास पावलेल्या देशांच्या काही नव्या समस्या आहेत. त्या नुसत्या समस्या राहिल्या नसून त्यांनी विकृत मनोवृत्तीचा आकार घेतला आहे. जगातल्या संपन्न देशांतली विशेषतः अमेरिका, युरोप, रशिया आणि स्कॅण्डिनेवियन राष्ट्रांतली मुख्य समस्या नवतरुणांत सतत वाढणारी गुन्हेगारीची प्रवृत्ती होय. यामुळे मानवी सभ्यता संकटात पडत

असल्याची भीती निर्माण झाली आहे. पण याचे मुख्य कारण आध्यात्मिक व नैतिक ऱ्हास हेच सांगितले जाते. आध्यात्मिक व नैतिक ऱ्हासाच्या मुळांशी लुळा-पांगळा जीवनविषयक दृष्टिकोन कारणीभूत आहे. या दृष्टिकोनाला मानवी सभ्यतेचे नीट आकलन झालेले नसल्यामुळे, निव्वळ उपभोगाचाच आशय प्राप्त झालेला विकास उपकारक मार्गाने मानवी जीवन व्यापणार नाही. उलट मानवी समाजात जास्तीत जास्त कलह निर्माण करण्यास हा विकास कारणीभूत ठरेल याविषयी शंका उरली नाही.

मानवी इतिहास हा मानवाच्या प्रगतीचा इतिहास मानला जातो. तरी, इतिहासातल्या काही ( मानवी ) प्रमादांचा परिणाम किती काळ नव्या जगाला सोसावा लागेल हे सांगणे मात्र कठीण आहे. गेल्या दोन महायुद्धांच्या परिणामांनी नव्या जगाचा दृष्टिकोन घडविला आहे.

युद्धाचे परिणाम जीवनविषयक दृष्टिकोन जाळून टाकतात व मानवी जीवनाचे स्थैर्य नाहीसे करतात. अतृप्त मानवी मन या अस्थिर अवस्थेतून आकाराला येते. भोगवृत्ती जोर करू लागतात व एक पिसाळलेली जाणीव ( मानवी ) जीवन व्यव-हाराला पुढे ढकलीत नेते. यातूनच नवनव्या मानवी प्रश्नांची वीण झालेली आहे. आजची ही मानवी प्रश्नांची वीण उकलताना प्रयास पडत आहेत.

औद्योगीकरणाची वाटचाल ही अतृप्त मनाची वाटचाल आहे. पण यामुळे मनाची तृप्ती साधणे शक्य होईल, किंवा कसे हे अजून अस्पष्ट आहे. अतृप्त मनाला जो बावरेपणा आलेला आहे तो आवरता आला तर तृप्तीला कुठेतरी मर्यादा घालता येईल. ही मर्यादा घालता आली तरच बावरेपणामुळे येणारा कलह टाळता येऊ शकेल. पण भोगाची चित्तवृत्ती कुठे तरी दुसरीकडे वळवल्याशिवाय, खिळल्याशिवाय यातून सुटका नाही ! अर्थात औद्योगिकरणाच्या आवश्यकतेची एक मर्यादा मान्य झाली पाहिजे. आणि औद्योगिक विकासाचे स्वरूपही पालटले पाहिजे. स्थिर जीवनाला उपकारक व प्रोत्साहक प्रेरणा औद्योगिक विकासाच्या स्वरूपात दाखल करावयाला पाहिजे. म्हणजे मानवी सभ्यतेच्या स्थिर रूपाकडे, औद्योगी-करणाला वळविले पाहिजे. मानवी सभ्यतेचे स्थिर रूप कोणते, तिचे वास्तविक स्वरूप काय ? - आदि गोष्टींचा विचार झाला पाहिजे. आणि माणसाची चित्तवृत्ती शांत होईल, असा उपाय केला पाहिजे. चित्तवृत्ती शान्त करण्याचा उपाय हीच खरी यापुढे मानवी भवितव्याची वास्तविक प्रेरणा ठरणार आहे. कारण चित्तातल्या

क्षोभाने, अशांतीने मानवी भवितव्याला वेढून घेतले आहे. जणू मानवी भवितव्याचा गळफासच ही अशान्ति व क्षोभ ठरू पाहत आहेत.

औद्योगिक विकासाने राहणीमानाला प्रोत्साहन दिले नसते तर औद्योगिक विकासाचे महत्त्व वाढले नसते. म्हणजे राहणीमानाच्या प्रश्नांनी औद्योगिक विकासाचे महत्त्व वाढविले. यामुळे राहणीमानाच्या गरजेतून विकास संभवेल असा दृष्टिकोन तयार झाला. हा दृष्टिकोन पश्चिमी सभ्यतेने जन्माला घातला असल्यामुळे नवस्वतंत्र किंवा स्वतंत्र पण अप्रगत राष्ट्रांना झेपणारा नव्हता. पण हा दृष्टिकोन स्वीकारण्याचा धोका या राष्ट्रांनी पत्करला. विशेषतः भारतासारख्या राष्ट्रांनी या दृष्टिकोनाच्या आहारी जायला नको होते. कारण, यामुळे भारतीय सभ्यतेचे अवमूल्यन झाले आणि पश्चिमी अथवा प्रगत राष्ट्रांवर अवलंबून राहण्याची घातक, स्वाभिमानशून्य प्रवृत्ती निर्माण झाली. राहणीमानाचा प्रश्न ज्या पद्धतीने हाताळला गेला त्या पद्धतीनेच भारताच्या कृषिप्रधान अवस्थेवर सरळ ( डायरेक्ट ) परिणाम केला आहे आणि भारताची कृषिप्रधान अवस्था दिवसें-दिवस संकुचित होण्याच्या मार्गावर आहे.

अप्रगत राष्ट्रांची गरज राहणीमान वाढविण्याची नाही. भारताची सुद्धा तशी गरज नाही. अप्रगत किंवा भारतासारख्या राष्ट्रांची मुख्य गरज लोकसंख्येला पुरेल अशा अन्नोत्पादनाची आहे व विकासाची दिशा या गरजपूर्तीतूनच चालणे अशा राष्ट्रांना श्रेयस्कर आहे. म्हणून भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात अन्नपूर्तीच्या सभोवती विकासाची कल्पना गुंफली गेली पाहिजे. याच करिता अन्नोत्पादनाची मुख्य व्यवस्था सुदृढ केली पाहिजे. ही व्यवस्था ग्रामीण स्तरावर सुदृढ केली पाहिजे. अर्थात अन्नोत्पादनाचा प्रश्न भारतात तरी ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. ग्रामीण जीवनातच भारताची कृषिप्रधान अवस्था कायम आहे. तेव्हा ग्रामीण जीवनाचा विचार हा विकासाशी प्रामुख्याने जुळता पाहिजे. तसा तो जुळता नसेल तर भारतात विकास म्हणजे नुसता भ्रमच मानावा लागेल. आणि ग्रामीण जीवन उध्वस्त करण्याची कल्पना विकासाच्या नावाने साकार झाल्यास भारताचा तो मोठाच आत्मनाश ठरेल. याची काळजी काहीशी पुसट होताना दिसते. राष्ट्रीय नियोजनाच्या वाटचालीतून ही काळजी म्हणावी तशी घेतलेली नाही. भारताच्या विकासविषयक कल्पनेत ग्रामीण जीवन समृद्ध करण्याच्या आवश्यकतेला म्हणावे तसे स्थान कदाचित नसेल, अशीच शंका मनाला वारंवार चाटून जाते. कारण राहणीमान वाढविण्याच्या स्पर्धेत ग्रामीण जीवन दिवसेंदिवस

उध्वस्त होईल असे दिसते. ग्रामीण व्यवस्था मोडकळीस येईल व याचा एकूण भारतीय जीवनावर अनिष्ट परिणाम होईल अशी नवी परिस्थिती भारतात निर्माण होत असताना दिसते.

राहणीमान वाढविण्याच्या कल्पनेने भारताच्या राष्ट्रीय नियोजनाला संभ्रमात पाडले आहे. कारण माणसाच्या किंवा उत्पादकांच्या प्राथमिक गरजाही भागण्याची जिथे अडचण आहे तिथे राहणीमानाची दृष्टी कार्यरूपाला येणे शक्य नव्हते. म्हणून राहणीमानाच्या आकर्षणातून निर्माण झालेल्या योजनांचा प्रत्यक्ष फायदा ग्रामीण जनतेला कमी मिळाला. जवळपास मिळाला नाही. शहरी जनतेला फायदा अधिक मिळाला, ग्रामीण स्तरावरच्या सोयी कमी महत्त्वाच्या ठरल्या ! त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातल्याही माणसाला शहराचे आकर्षण वाटू लागले.

राहणीमान वाढविण्याचा प्रश्नच मुळी क्रयशक्तीवर अवलंबून आहे. ग्रामीणांची क्रयशक्ती आतापर्यंत तीन पंचवार्षिक योजनांत वाढली नाही. शहरी जनतेची क्रयशक्ती त्या मानाने वाढली आणि या दोहोंत तफावत इतकी की, ग्रामीणाला खेड्यात राहणे सुकर होईनासे झाले. शहरातल्या उद्योगांनी, उद्योगपतींनी ग्रामीणांचे शोषण मोठ्या प्रमाणात चालविले. संपत्तीचा ओघ खेड्याकडून शहराकडे वळला. ग्रामीणांची जीवनविषयक चिंता अधिक वाढली. तशात भारतातली शेती बहुतांशी निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतीच्या उत्पन्नावरच जीवनात शाश्वती आणणे ग्रामीणाला अशक्य झाले. कारण शेतकऱ्याच्या जीवनात शाश्वती आणण्याकरिता राष्ट्रीय नियोजनाचा पुरुषार्थच जागला नाही. राष्ट्रीय नियोजनाचा पुरुषार्थ शहरी सुबत्तेतच उपयोगात आला.

तात्पर्य, राहणीमान वाढविण्याच्या कल्पनेला मूर्तरूप देण्याकरिता क्रयशक्ति वाढविण्याची जरुरी होती. ग्रामीण जनतेची ही क्रयशक्ति वाढली नसल्याने या कल्पनेमुळे अनुत्पादक वर्गालाच फायदा घेता आला आणि राहणीमान वाढविण्याची कल्पना अनुत्पादक वर्गाच्या सोईची ठरली. अर्थात राहणीमान वाढविण्याचा राष्ट्रीय नियोजनाचा दृष्टिकोण भारतापुरता तरी चुकीचा ठरला.

भारताची कृषिप्रधान अवस्था बळकट करणे हाच राष्ट्रीय नियोजनाचा विकासविषयक दृष्टिकोन असायला पाहिजे व तो सर्वांना मान्य झाला पाहिजे. कारण याशिवाय भारताच्या जीवनविषयक मूलभूत समस्यांना हातच लावता येणार नाही. या समस्यांना आजवरच्या नियोजनविषयक कार्यातून

समर्थपणे हात लावला गेला नाही. म्हणून पंचवार्षिक योजनांचा अपेक्षित परिणाम निघाला नाही आणि वैफल्याच्या भावनेने राष्ट्रीय जीवन व्यापून गेले आहे. कृषिविषयक प्रश्नांची सोडवणूक करण्यास औद्योगिक विकासाचा उपयोग होऊ शकतो, म्हणून कृषिक्षेत्राला उद्योगाची जोड द्यावी. कृषि-औद्योगिक विकास (ॲग्रोइंडस्ट्रियल डेव्हलपमेंट) साधावा असाही एक विचारप्रवाह आहे. या विचारप्रवाहाला एक निश्चित उद्देश आहे. तो असा : कृषि क्षेत्र स्वतःच्या बळावर स्वयंपूर्ण होणे अशक्य आहे. कारण ग्रामीण जीवनाचा सर्वस्वी भार कृषिक्षेत्रावरच पडतो. म्हणून हा भार कमी करता आला व भार कमी करण्याकरिता उद्योगांचा आधार घेता आला तर कृषिक्षेत्र स्वयंपूर्ण होऊ शकेल. अर्थात कृषिउत्पादनाला पूरक व ग्रामीण जीवनात गरजेचे असे उद्योग ग्रामीण स्तरावर निर्माण करावेत. यामुळे ग्रामीण क्षेत्रांतल्या प्राथमिक गरजा अशा उद्योगातून पुऱ्या होतील व कृषिउत्पादनावर जो सतत भार पडत गेला तो पडणार नाही. आज शेती शेतकऱ्याला परवडेनाशी झाली असे जे म्हटले जाते त्यात या दृष्टीने तथ्य आहे. केवळ अन्नोत्पादन झाल्याने जीवनातल्या सर्व गरजा भागत नाहीत; किंवा जीवनोपयोगी गरजांकरिता शहरी किंवा मोठ्या उद्योगांवर अवलंबून राहावे लागते. अशा उद्योगातल्या उत्पादनानीच अन्नोत्पादनाचे मूल्य कमी केले आहे व अन्नोत्पादनातून उभी होणारी संपत्ती हिरावून घेतली आहे. तेव्हा अन्नाशिवाय अन्य जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन ग्रामीण स्तरावर झाल्यास ते अन्नोत्पादनाला पूरक ठरेल व अन्नोत्पादनावर जीवनाचा पडणारा सर्वस्वी भार कमी होईल. अर्थात शेती शेतकऱ्यांना परवडणारी ठरेल. पण यामध्ये उद्योगांचे स्वरूप काय असावे याचा विचार होणे जरूरीचे आहे, कारण उद्योगाचे स्वरूप शहरातल्या उद्योगासारखेच असल्यास व उत्पादनपद्धति नफा मिळविण्याच्या तत्त्वावर निर्माण झाल्यास, हे उद्योग ग्रामीणांचे व शेतीचे शोषण चालू ठेवण्यास प्रोत्साहनच देतील. म्हणून ग्रामीण स्तराचे उद्योग हे नेहमीच शेतीला पूरकच असावे लागतील. त्याची उत्पादनपद्धति अन्नोत्पादनाला पोषकच असावी लागेल. तरच ग्रामीण जीवन टिकाव धरू शकेल व शेती स्वयंपूर्णतेला येऊ शकेल. अर्थात, शेती व ग्रामीण जीवनाचे शोषण करणारे कोणतेही उद्योग ग्रामीण सुरक्षितता व स्थैर्य आणू शकणार नाहीत. या दृष्टीने काळजी न घेता ग्रामीणक्षेत्रात उद्योगवाढीचा विचार करणे योग्य नाही.

कृषिप्रधानतेची वास्तविकता कृषि-औद्योगिक ग्रामीण रचनेमुळे पटू शकते.

म्हणून राष्ट्रीय नियोजनाची दिशा ही स्वयंपूर्ण ग्रामरचनेची असायला पाहिजे. अर्थात आजच्या औद्योगिक दृष्टीत बदल केला पाहिजे. कारण, या दृष्टीने स्वयं-पूर्ण ग्रामीण रचनेला अजून स्पर्शच केला नाही. म्हणून ग्रामीण स्तरावर उत्पादनक्षमता वाढावी, अशी तरतूद योजनेत केली जात नाही. एकूण राष्ट्रीय नियोजनकार्याचा दृष्टिकोन ग्रामीण क्षेत्राला आस्थेवाईकपणाचा वाटत नाही. सापत्न भाव या दृष्टिकोनातून वेळोवेळी स्पष्ट होतो. भारताची कृषिप्रधान अवस्था स्थिर करण्यास हा सापत्न भावच आज आडकाठी ठरला आहे.

राहणीमान वाढविण्याचा प्रकार व कृषिऔद्योगिक ग्रामीण रचनेचा प्रकार या दोहोंत मूलभूत फरक आहे. पहिल्या प्रकाराने औद्योगीकरणाला महत्व येते व दुसऱ्या प्रकारने कृषिप्रधान अवस्थेला महत्व येते. औद्योगीकरणाला जी गती आजवर मिळाली ती कृषिप्रधान अवस्थेला मिळाली नाही. म्हणून कृषिप्रधानतेचे अस्तित्व छिन्नभिन्न होत असल्याचे दिसेल. यातूनच ग्रामीण व्यवस्था मोडकळीस येत आहे. एक नवी उद्योगप्रधान समाजव्यवस्था उभी होत आहे. अर्थात ही समाजव्यवस्था शान्ततामय सहजीवनाला उपयुक्त नाही. कारण विध्वंसक क्रान्तीच्या कल्पना अशा अवस्थेत जोर धरतात व कलहाच्या रूपाने या कल्पना नावारूपाला येतात. माणसाच्या भोगलालसेला चालना देण्याचे व चित्तवृत्ती हिणकस करण्याचे श्रेय उद्योगप्रधान समाजव्यवस्थेलाच आहे. यातून गुन्हेगारी व पिसाटपणाच जन्माला येतो. एक न सोसणारी विकृति मानवी जीवनात स्थान करून राहते. औद्योगिक प्रगती गाठलेल्या पश्चिमी राष्ट्रातून आज जो विकृत मानवीव्यवहाराचा प्रकार दिसतो तो सर्वांनीच लक्षात घेण्यासारखा आहे व त्यावरून इतर राष्ट्रांनी धडाही घेतला पाहिजे.

औद्योगिकवाढीचा परिणाम शहरीकरण होय आणि हा परिणाम पाश्चात्य विचारसरणीचा परिपाकच मानला पाहिजे. पश्चिमी सभ्यता शोषणावर उभी झाली. शहर हे नेहमीच शोषणावर उभे राहते. अर्थात पूर्वेकडील राष्ट्रांना विशेषतः आशिया, आग्नेय आशिया व आफ्रिकन राष्ट्रांना हा दृष्टीकोन परवडणारा नाही. झेपणारा नाही. म्हणून ग्रामीण जीवन समृद्ध करण्याची दृष्टीच या राष्ट्रांनी पुष्ट केली पाहिजे.

लाल चीनने एक क्रान्तीचे शास्त्र बनविले आहे. एक कल्पना केली आहे.

पश्चिमी राष्ट्रांना शहरी विभाग कल्पिले; आशिया, आग्नेय आशिया व इतर मागासलेल्या राष्ट्रांना ग्रामीण विभागात कल्पिले आहे. ग्रामीण विभागाने शहरांना गराडा घालणें, अशी एक क्रांतीचे दिशा चीनने मानली. म्हणजे या पुढची क्रांति खेड्यातून शहराकडे जाईल. चिनी नेते किंवा चिनी दृष्टिकोन आज लोकशाहीला अनुकूल नाही. म्हणून तो स्वीकारण्याजोगा नाही. अर्थात चिनी दृष्टिकोनाला विरोधच केला पाहिजे. पण चीनच्या क्रांतीचे दिशादर्शन मात्र अचूक आहे हे मान्य केले पाहिजे. चिनी हिंसक प्रवृत्ती, त्यातून निर्माण झालेला त्यांचा विस्तारवाद व हुकूमशाहीची नीती या सर्व गोष्टी कधीच ग्राह्य होण्यासारख्या नाहीत. पण जी कोणती क्रान्ती यापुढे व्हायची असेल, ती मात्र खेड्यांतून शहराकडे म्हणजे शोषणाऱ्या विरुद्ध ग्रामीण जनता लढेल अशा प्रकारची होईल. याविषयी शंका घेण्याचे कारण नसावे. म्हणून ग्रामीण स्वयंपूर्णतेची दृष्टी राष्ट्रीय नियोजनात आणण्याचा आटोकाट प्रयत्न झाला पाहिजे; व राहणीमान वाढविण्याच्या; वैभवाच्या प्रकाराला आळा बसला पाहिजे. यामुळेच ग्रामीण विभाग आणि शहरी विभाग व या दोहोत होणारा संभाव्य संघर्ष टाळता येईल व शान्ततामय सहजीवनाचा मार्ग चालणे सुकर होईल. अन्यथा कलहाचा शेवट होणार नाही.

गेल्या दोन महायुद्धांच्या परिणामांतून नव्या जगाच्या विकासाचा नवा दृष्टीकोन तयार झाला. हा दृष्टिकोन अतृप्त मनाचा तृप्तीकडे धावत सुटणारा आहे. पण या तृप्तीला कुठेच बांध न घातल्यामुळे मानवी चित्तवृत्ती भोगविलासप्रिय झाली. एक तऱ्हेची मनोविकृत्ती जीवनात घर करून नांदू लागली. यामुळे नव्या पिढींत गुन्हेगारीच्या प्रकाराला चालना मिळाली व मानवी सभ्यताच धोक्यात आली. तेव्हा याच परिणामांची परत उजळणी होऊ नये असे मनोमन वाटत असल्यास राहणीमान वाढविण्याच्या विकासाच्या कल्पनेला थोपविलें पाहिजे आणि जीवनात स्थैर्य आणणाऱ्या कृषिप्रधान विकासाचा दृष्टिकोन पुष्ट केला पाहिजे. अर्थात या करिता ग्रामीण स्वयंपूर्णता यावी ही नियोजनाची मुख्य प्रेरणा झाली पाहिजे. आजचा तरणोपाय तो हाच !

• • •

## स्वराज्य आणि आत्मराज्य

स्वराज्य व गांधी एकरूप आहेत. तुकारामाचा भक्तिभाव तोच म. गांधींचा स्वराज्याचा भाव.

ऐसा पसरीन भाव रिता नाही कोणी ठाव।

स्वराज्याचा भाव देखील म. गांधींनी सर्वठायी पसरला. गांधींशिवाय स्वराज्य नाही; व स्वराज्याशिवाय गांधी नाही. इतकी परस्परावलंबी ही दोन तत्त्वे आहेत. स्वराज्य हे महान् तत्त्व. पण गांधींच्या हृदयात व्यक्त झाले ते विशिष्ट अर्थाने. म्हणून गांधीही तेवढेच दुसरे महान् तत्त्व. स्वराज्याचा उच्चार गांधींपूर्वी कित्येकांनी केला. दास्यविमोचन अनेक प्रकारे झाले. रशियातली बोल्शेविक क्रांती दास्यविमोचनाचीच क्रांती होती. पण दास्यविमोचन म्हणजे का स्वराज्य? नव्हे, स्वराज्य हा एक आत्मानुभव आहे. त्यातून साक्षात्कार होतो आत्मपुरुषांना.

म्हणून आत्मानुभव म्हणावे तयांते. स्वराज्य हा महात्मा गांधींना झालेला आत्मसाक्षात्कार होय. गांधी आत्मपुरुषच होते. स्वराज्यातला ' स्व ' हा आत्मतत्त्वाचा प्रतीक आहे. आणि राज्य हे ' धाम ' अर्थाने आले आहे. ' स्व ' म्हणजे मी. माझे. राज्य म्हणजे धाम. स्वराज्य म्हणजे धाम, वसतिस्थान. मी स्वराज्यात राहतो म्हणजे आत्म्यात राहतो. - जो सर्वत्र भरून उरला आहे, सर्वव्यापी अंतर्यामी आहे. म्हणून म. गांधींच्या स्वराज्याची परिणती अंतिम स्थितीत आत्मराज्यात व्हावयाची होती. आचार्य जावडेकरांनी स्वराज्य म्हणजे आत्मराज्य म्हटले आहे ते उगीच नव्हे. महात्मा गांधींच्या स्वराज्याचा संबंध आत्मतत्त्वाशी आहे म्हणून आत्म-राज्य हे स्वराज्याचे फलित ठरते. पण, यापेक्षा वेगळाच आपण स्वराज्याचा अर्थ करतो हल्ली. ज्याला रूढार्थ म्हणता येईल. या रूढार्थानेच स्वराज्याचे सुराज्य करण्याची कल्पना करतो आहोत. सुराज्य हा स्वराज्याचा आदर्श नव्हे हे कित्येकांच्या लक्षात येत नाही. नव्हे, थोरामोठ्यांच्याही लक्षात येत नाही. दमन-क्रियेतून निर्माण झालेले शासन अथवा अनुशासन गळून पडेल अशी स्थिती हा खरा स्वराज्याचा आदर्श होय. सुराज्यात सुशासनाची अपेक्षा व्यक्त होते. स्वराज्याचे सुशासन असू शकत नाही. आत्मशासनच असू शकते. सुशासन हे दंडशक्तीचे समर्थक असते. दंडशक्तीची उपासना सुशासनाने होत असते. म्हणून, दंडशक्तीचा अभाव, त्याची अनावश्यकता जिथे असेल ते खरे स्वराज्य किंवा आत्मराज्य. तेव्हा, सुशासन आत्मराज्याला अनुकूल नाही. म्हणून सुराज्य हे स्वराज्याचे पुढचे पाऊल ठरत नाही. स्वराज्याचे पुढचे पाऊल आत्मराज्यच ठरते. अर्थात् आत्मानुशासन हा स्वराज्यातला आदर्श ठरला पाहिजे. आणि या आदर्शानेच म. गांधींच्या स्वराज्याला पूर्णता येते.

स्वराज्याची सुरुवात अंत्योदयापासून होते, असे गांधींनी सांगितले. काय याचा अर्थ ? हरिजन मुलीने दिल्लीच्या तक्तावर बसावे व भारताचे शासन चालवावे असा का याचा अर्थ करावयाचा ? असाही अर्थ करता येईल. पण, हा अर्थ स्थूल दृष्टीतलाच समजला पाहिजे. सूक्ष्मात याहून वेगळे दिसेल. समाजातला सर्वात खालचा स्तर, जो आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक या सर्व दृष्टीने मागा-सलेला समजला जातो, तो इतर कोणामुळे वर येणार नाही, त्याचा जीवनस्तर उंचावणार नाही. स्वावलंबनाने, स्वयंप्रेरणेने हा जीवनस्तर उंचावेल. अंत्योदयात अंत्यजांनी अंत्यजत्व टाकावे. स्वाभिमान व आत्मप्रतिष्ठेचा उदय त्यांच्या अंतःकरणात व्हावा, म्हणजे आत्मोदय व्हावा. पक्षाच्या, धर्माच्या संप्रदायाच्या तसेच जाती – जमातीच्या व इतर संकुचित वादाच्या आश्रयाविना, पण आत्मशक्तीच्या

आश्रयाने अंत्यज समजला जागारा ( आत्मनिष्ठेच्या ) भक्कम पायावर उभा राहावा. आर्थिक व सामाजिक शोषणामुळे तो चेंगरला गेला. या शोषणांच्या प्रक्रियेलाच त्यांनी स्वकर्तृत्वाने मूठमाती द्यावी; व अशा शोषणाला मूल्यरहित करावे. ज्या साधनांनी व वृत्तींनी समाजात अंत्यजांचा स्तर निर्माण झाला, ती साधने व वृत्ती बीजरूपानेही उरू नये, असे कर्तृत्व निपजावे. म्हणजेच अंत्योदयाचा आत्म-साक्षात्कार होय. हा एक रचनात्मक मार्ग अंत्योदयाचा. दुसरा मार्ग बळाचा आहे. पण या बळाच्या मार्गाने बळाचीच प्रतिष्ठा कायम होते. अंत्योदय होत नाही. वाटते अंत्योदय होत आहे. पण ते खरे नसतेच. वरच्या स्तरातले भौतिकसुख भोगायला मिळावे ( हा एक भ्रम ) अशा आकर्षणाने आसुसलेले असते बळवाद्यांचे मन. म्हणूनच ते बळाचे, हिंसेचे, जशास तसेचे तत्वज्ञान मांडतात अंत्यजांसमोर व त्यांना आकर्षित करतात. पण याने अंत्यज प्रतिष्ठित होऊ शकला नाही. त्याची गुणवत्ता वाढली नाही. आत्मप्रतिष्ठा कळली नाही त्याला. ब्राह्मणांनी शस्त्र हातात घेऊन ब्राह्मणत्व बुडविले. पेशवाईतली लक्ष भोजने व कोटी यज्ञांनी देखील ब्राह्मणत्व पुन्हा स्थिर होऊ शकले नाही. तसाच हा प्रकार आहे. बळाने आत्मप्रतिष्ठा मिळविता आली कोणत्याही काळी, कोणत्याही स्थळी असे कधीच घडले नाही. आत्मप्रतिष्ठा ही आत्मतेजांतूनच येते. आत्म-तेजाने मनातले विकार जळतात. ते जळले की आत्मप्रतिष्ठा येते. मनातले विकार जे भ्रष्टाचाराला व व्यभिचाराला संकुचित साधनांद्वारे प्रवृत्त होतात ते नष्ट करण्याची गरज अंत्योदयात मानली गेली. याचमुळे अंत्योदय व्हावयाचा आहे. हे विकार जाळण्यास सांगितले म. गांधींनी. कारण, हे विकार जळल्याशिवाय आत्मोदय व्हायचा नाही; व आत्मोदय झाल्याशिवाय अंत्योदय व्हायचा नाही. अंत्योदयाचा मार्ग भोगलालसा नव्हे. तो विकारांचा परिणाम आहे. म्हणून अंत्योदयाचा मार्ग आत्मशुद्धिस्तव विकार नष्ट करण्याचा मार्ग आहे. यातूनच स्वराज्यात अंत्योदय साधता येईल. अंत्यजांना प्रतिष्ठित करता येईल.

अंत्योदयातून स्वराज्याचा आत्मप्रत्यय आणण्याचा म. गांधींचा विचार हा वरवर पहाता अतिशय मवाळ वाटेल कित्येकांना. पण, आज ज्या प्रश्नांनी समाज–जीवन भयभीत झाले आहे किंवा थरकाप सुटला आहे प्रश्नांची जाचकता पाहून व अनुभवून, ते प्रश्न ज्यांना जाणवतात व कळतात त्यांनी हे ओळखले आहे की; आत्मप्रत्ययाच्या अभावी आजचा समाज भयभीत झाला आहे, या समाजाला भयमुक्तीची जरूरी आहे. व ही भयमुक्ती आत्मप्रत्ययाविना यावयाची नाही. आजचे सर्व प्रश्न भयांतून निर्माण झालेले आहेत. शास्त्रीय शोध कितीही लागले,

संहारक शक्ति कितीही निर्माण झाली व हे सर्व शोध मानवी कल्याणाच्या उद्देशानेच केले जातात असेही वारंवार सांगितले जात असले तरी मानवी चित्तात भय दाटूनच आहे. माणसाला शस्त्रामुळे, शास्त्रीय शोधामुळे, जलद् गतीच्या जीवनोपयोगी उपकरणामुळे भयमुक्ती साधता येईल हे आता केवळ अशक्य होय. तसे असते तर मानवा-मानवांतले संघर्ष कमी झाले असते. ईर्ष्या व मत्सर वाढते ना. ईर्ष्या व मत्सर वाढत आहेत व पुढेही वाढणारच आहेत. हे दोन्ही आत्मप्रत्यायाविना निर्माण झालेले मानवी चित्तातले भयंकर विकार होत. हे विकार कोणत्याच शास्त्रीय शोधाने कमी करता येणार नाहीत. कारण शस्त्र अथवा शास्त्राने चित्तातून ईर्ष्या व मत्सर काढण्याची सोय नाही. तशी सोय निर्माण झाली नाही. होणार नाही. तेव्हा, आत्मप्रत्ययाचा मार्ग निरोधला गेला तर ईर्ष्या व मत्सर वाढतच जातील. आजचे शास्त्र, शस्त्रे व उपकरणे त्यांच्या वाढीला उपकारक कार्य करीत राहतील. हेच घडत आहे आज. म्हणून काही दिवसांनी आत्मप्रतिष्ठेची जाणीव शिल्लकच उरणार नाही अशी स्थिति निर्माण होईल. याच दिशेने आजच्या जगाची प्रगती होत असताना दिसेल. जर आम्ही अंतर्मुख होऊन पाहिले तर. तेव्हा, मानवी चित्तातली भीति आत्मप्रत्ययानून काढली पाहिजे. आणि यामुळेच मानवी चित्त भयमुक्त होऊ शकेल. भयमुक्तीचा याहून दुसरा मार्ग नाही. अर्थात् अंत्योदया–करिता भयमुक्ती झाली पाहिजे प्रथम.

भयमुक्तीचे सूत्र पुढे चालवायचे. कारण, भयमुक्तीमुळे स्वराज्य सार्थकी लागेल. भयमुक्ती ही रचनात्मक प्रवृत्ति आहे. ती निषेधात्मक प्रवृत्ति नाही. क्षोभाला चित्तात स्थान मिळाले तर भयमुक्ती व्हावयाची नाही. चित्ताची अक्षोभ स्थिती ही खरी भयमुक्तीची वास्तविकता होय. पण भयमुक्तीचा निषेधात्मक प्रकारही आहे. आणि तो प्रक्षोभक प्रकार आहे. हल्ली त्याला सत्याग्रह नांव मिळाले आहे. पण सत्याग्रहाची पात्रता अशा सत्याग्रहाला कमीच किंवा नसतेच म्हटले तरी चालेल. म्हणून तो सत्याग्रह नव्हे. पण, सत्याग्रहाच्या नांवाखाली प्रक्षोभही चालवून घेतो आम्ही. आजवर चालवून घेत आलो. तेव्हा, भयमुक्तीचा निषेधात्मक प्रकार हा सत्याला नेहमीच चिकटलेला नसतो. पुष्कळदा दुराग्रहाचाच हा प्रकार ठरतो. पण, सत्याग्रह आत्मक्लेशाच्या पातळीला येतो त्यावेळी हा रचनात्मक प्रकार देखील निषेधात्मक वाटू लागतो. तो तसा वाटला तरी सत्यापासून वेगळा नसतो. अर्थात् सत्याग्रह आत्मक्लेशाच्या मार्गातून जातो तेव्हा, तो गंजलेल्या व रूढ जीवनमूल्यांना झिडकारून जातो. म्हणून या सत्याग्रहाला निषेधात्मक धार आली असे म्हटले जाते. पण, आत्मक्लेशाच्या सत्याग्रहात जुन्या

व गंजलेल्या जीवनमूल्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष निषेध असला तरी चित्तात क्षोभ नसावा. म्हणजे सत्याग्रहाचा निषेधात्मक प्रकारही चित्ताच्या क्षोभरहित अवस्थेमुळे निर्दोषच राहू शकेल.

भयमुक्ती आत्मप्रत्ययाने व्हावयाची व आत्मप्रत्ययांतून स्वराज्य साकार व्हावयाचे. तेव्हा, आत्मप्रत्ययाचे साधन ठरतो सत्याग्रह. सत्याग्रहाने भयमुक्त व्हावयाचे म्हणजे काय ? भय नेहमी भौतिक अतृप्तीतून निर्माण होत असते. तेव्हा, भौतिक अभिलाषा चित्तातून कमी कमी करीत जायचे. इंद्रियांना जडलेल्या सवयी या अधिक निर्दोष करावयाच्या, ज्यामुळे भौतिक अभिलाषा कमी होईल. अर्थात् जीवनशोधन व जीवनशुद्धी होईल यामुळे. सत्याग्रह जीवनशोधन व जीवनशुद्धीकरिताच महत्वाचा मानला जात आहे. हृदयपरिवर्तनाची प्रक्रिया देखील सत्याग्रहाचेच एक रूप आहे. सत्याग्रहाचा परिणाम आहे. या परिणामाची अंतिम अवस्था जीवनशुद्धी, व्यक्तीची व समष्टीची देखील.

आत्मराज्याकडे सत्याग्रहाच्या मार्गाने जायचे कसे ? आत्मराज्याकडे जाण्याचा सत्याग्रह हाच मार्ग आहे; दुसरा मार्ग नाही. समाजपरिवर्तनाची आत्मवादी प्रक्रिया सत्याग्रहानेच निर्माण होते. तरी या प्रक्रियेविषयी बरीच अस्पष्टता आहे. कारण म. गांधींनंतर सत्याग्रहाच्या वास्तविकतेविषयी बऱ्याच शंका निर्माण झाल्या; व म. गांधींचा विचारच मुळात चुकीचा किंवा मानवी स्वभावाविरूद्ध म्हणून अव्यवहारी असे ठरविले जाऊ लागले. पण असे ठरवू पाहणाऱ्यांची मनोभूमिका ही पूर्वग्रह व दुराग्रहानें दूषित झालेली असते असेच दिसेल. आणि त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन भोगलालसेचा असतो. तरीही सत्याग्रहातून आत्मराज्याकडे जाण्याचा मार्ग स्पष्ट झाला पाहिजे. केला पाहिजे.

म. गांधीनंतर सत्याग्रहातले मर्मज्ञ केवळ विनोबाच होत. स्वतः गांधींनी विनोबांची व्यक्तिगत सत्याग्रहात पहिला सत्याग्रही म्हणून निवड केली. आत्म· शुद्धीच्या सर्व क्रिया ज्यांनी आत्मसात केल्या, असे हे सत्याग्रही आहेत. त्यांनी म. गांधींनंतर सत्याग्रहातून आत्मराज्याकडे जाण्याचा मार्ग अनुसरला. एवढेच नव्हे तर त्याचे काही परिणामही दाखविले आहेत. हे परिणाम तपासण्याचा प्रयत्न काहीजण करतात. पण, या तपासणाऱ्यांचे चित्त पूर्वग्रहाने ग्रासलेले असल्यामुळे मोकळेपणे विचार करायला विचारशक्तीच उरली नाही यांचेजवळ. सबब अशांचे निष्कर्ष हे पूर्वग्रहदूषित व मानवी प्रश्नांना स्पर्श न करणारेच असतात. म्हणून यांचा विचार करायचा तर, प्रथम यांची मानसिक अवस्थाच तपासली पाहिजे. असो.

दानाने दानत बिघडते; म्हणून ही विकासाची जाणीव नव्हे, ती लाचारीची जाणीव होय असा आरोप दानाविषयी करणारे बुद्धिवादी या देशात आहेत. पण, दानातच विकासाची संपूर्ण जाणीव आहे याविषयी विनोबांना तरी खात्री आहे. दानाचा अर्थ जो विनोबांना व त्यांच्या सहकाऱ्यांना अभिप्रेत आहे, तो प्रश्न निर्माण करणाऱ्या चिकित्सकांना नाही. दान शब्द विनोबांनी आद्य शंकराचार्यांकडून (शांकरभाष्यातून) घेतला. 'दानं संविभागः' हा दानाचा अर्थ आहे. उत्पादक- साधनांचे उत्पादकांत समान वितरण हे जसे मार्क्सवादाचे तत्त्व; तसेच दानातील साम्ययोगाचे तत्त्व विनोबांचे आहे. फरक एवढाच की, मार्क्सनी सांगितले त्याचा वाद झाला. शंकराचार्यांने सांगितले त्याचा वाद झाला नाही. योग झाला. योग आणि वाद मुळात भिन्न आहेत. दोन्हीत फरक साधनशुचितेचा आहे. वादांत साधनशुचितेचा आग्रह नाही. क्रोधाने क्रोध जिंकता येत नाही हा जसा साधनविवेक बुद्धाचा, तसा शुद्ध साधनानेच शुद्ध साध्य गाठता येते हा म. गांधींचा विवेक. म. गांधींचा विवेक अनुसरण्याचा आग्रह विनोबांच्या दानात आहे, कारण तो अनत्याचारी मार्गाने जाणारा आहे. तेव्हा दानाने समान विभाजन हे तत्त्व मान्यच केले. पण, योगापेक्षा वादाकडे आकर्षित झालेले मन विवेकशून्याच्या मर्यादेपर्यंत जाऊन पोचते. म्हणून योग हा वादविषय करून विवेकभ्रष्ट होण्याची पाळी वादविषय करणाऱ्यावर येते.

दान आणि म. गांधींची ट्रस्टीशीपची कल्पना दोन्ही परस्परांना समांतर आहेत. दोहोंच आशय एकच आहे. पण, दानात आत्मवादाचा पुरस्कार ट्रस्टीशीपपेक्षा अधिक प्रमाणात आहे. अर्थात् दान ट्रस्टीशीपचे विकसित रूप होय. पण यात सत्याग्रह आहे काय असे कोणी विचारील. दान किंवा ट्रस्टीशीप हेच मुळांत सत्याग्रह होत. दानप्रक्रिया हीच सत्याग्रहाची प्रक्रिया होय. दानवृत्ति वाढविणे म्हणजे सत्याग्रहवृत्ति वाढविणे, देशाच्या स्वराज्याकरिता त्याग करणे, जेलमध्ये जाणे, आत्मक्लेश सहन करणे, फासावर चढणे हे जसे सत्याग्रहाचे प्रकार तसेच भूमिहीनांना भूमि देणे, बेरोजगारांना रोजगार देणे, गावांना शोषणातून मुक्त करणें, कारभारविषयक अधिकार गावांना देणे, गावांना साधनसंपन्न करणे, गावांना स्वराज्य देणे, ग्रामस्वराज्याकरिता गावे संघटित करणे आदि सर्व प्रकार सत्याग्रहाचेच होत. या नव्या व बदलत्या युगातले हे पुरुषार्थ होत. स्वराज्याकरिता फासावर जाणे, हाल अपेष्टा सहन करणे जसे महत्वाचे तसे ग्रामस्वराज्याची संकल्पशक्ती गांवोगांव व गावकऱ्यांच्या मनांत उभी करणे व हे करताना हालअपेष्टा सहन करणें देखील या काळात तेवढेच महत्वाचे होय. स्वराज्याचे महत्त्व ज्यांना कळले त्यांना ग्रामीणांच्या

स्वराज्याच्या हक्कांचेही महत्त्व कळले पाहिजे. स्वराज्य घेणे जसे पटले तसे स्वराज्य देणेही पटले पाहिजे. दानातून स्वराज्य देण्याची प्रक्रिया चालविली जाते. तेव्हा दान ग्रामस्वराज्याचा सत्याग्रह आहे. म्हणून या सत्याग्रहातून ग्रामीण जनतेचे सत्याग्रह साकार करण्याचा प्रयत्न विनोबांचा आहे. सत्याग्रहाच्या दृष्टीने सत्यग्रहणाची संधी विनोबांनी दानांतून निर्माण केली. अर्थात् सत्याग्रहाला गतिमान कसे करता येईल हा आजचा प्रमुख प्रश्न आहे. सत्याग्रह गतिमान होत नाही म्हणून काही विपरीत परिणाम घडविणारे प्रश्नही निर्माण झाले आहेत. त्यांचाही विचार केलाच पाहिजे. परंतु आत्मप्रत्ययांतून स्वराज्य साकार करण्याचे सूत्र विनोबांनी अत्यंत कुशलतेने सांभाळले आहे. ग्रामीण जनतेची आत्मप्रेरणा ग्रामदान किंवा ग्राम–स्वराज्यातून जागविण्याचा विनोबांचा प्रयत्न हा आत्मप्रत्ययाच्या स्वराज्याचा भरीव व तर्कशुद्ध उपाय होय. गांधींच्या स्वराज्याला पूर्णता आणण्याचा प्रयत्न विनोबा या द्वारे करीत आहेत; हे कोणीही नाकबूल करणार नाही. ग्रामस्वराज्य आत्म–राज्याकडे नेणारी आजची अत्यंत महत्त्वाची आत्मप्रेरणा होय. ही प्रेरणा जाग–विण्याचा अनत्याचारी मार्ग म्हणजे ग्रामदान होय. आत्मराज्याकडे ग्रामदान, ग्रामस्वराज्य अशाच क्रमाने जावे लागेल. कारण, या क्रमामुळेच आत्मवादाचा, आत्मप्रत्ययाचा सुयोग्य सांभाळ होऊ शकतो व गांधींचे स्वराज्य साकार होऊ शकते.

हे गतिमान जग. नित्य नवे स्थित्यंतरे दृष्टोपतीस येतात या जगात. ही गती व रोजची स्थित्यंतरे निरोधने अशक्यप्राय होऊन बसले आहे. ‘ जसे नद्यांचे सगळे प्रवाह वेगे समुद्रातचि धाव घेती ’ तसे हे आधुनिक जीवन इच्छातृप्तीच्या मृगजळाकडे बेभान होऊन धावत सुटले आहे. मिळेल ती संधी, मिळेल ते साधन तृप्तीस्तव वापरले जात आहे. सांस्कृतिक, भावनिक, राजकीय, सामाजिक कोणत्याही इच्छा - आकांक्षा मानवी गुणांहून वेगळ्या, पाशवीच म्हणता येत नसले तरी विकृत अवस्थेप्रते पोचत आहेत. बिटनिक, बिटल्स व आता त्याच्याही पुढे जाऊन लिंगभेद विसरून समान लिंगाची लैंगिक तृप्ती साधण्याची एक पिसाट वृत्ती निर्माण होत आहे युरोपात. हा आधुनिक जगाचा पिसाट झंझावात निरोधायचा कसा हा एक बिकट प्रश्न होऊन बसला आहे. तेव्हा, ज्या गतीने माणसाची वृत्ति हीनचित्त होत आहे, त्या गतीला आवरणारी सत्याग्रहाची आत्मप्रेरणा कितीतरी पटीने गतिमान झाली पाहिजे. ही आत्मप्रेरणा गतिमान होत नाही हीच खरी तक्रार आहे. कारण ही आत्मप्रेरणा गतिमान होत नाही म्हणून विकारांचे आवि-ष्करण झपाट्याने होत आहे. या विकारांनी माणसाचे चित्त काबीज केले आहे. तेव्हा, आत्मप्रेरणा जागविणारा सत्याग्रह आजच्या चित्तवृत्तीला जाणवेल अशा

प्रभावाने धडक मारणारा हवा. चित्तवृत्तीवर सत्याग्रहाचे आघात झाले पाहिजेत. याकरिता सत्याग्रहाला आत्मक्लेशाच्या व आत्मबलिदानाच्या मार्गातून जावे लागेल. याशिवाय आजच्या चित्तवृत्तीला धडक बसायची नाही व ती हादरायची नाही. चित्तवृत्ती आता हादरली पाहिजे. आत्मबलिदानाच्या धडकेने. आत्मराज्य हे आत्मबलिदानाच्या वास्तविकतेतूनच साकार होईल.

• • •

# सत्याग्रह : ‘स्वराज्या’च्या उद्देशपूर्तीचें साधन

स्वराज्याकरिता ब्रिटिश सत्तेविरुद्ध या देशात ज्या चळवळी झाल्या त्या सर्व चळवळी स्वराज्याच्या हेतूशी सुसंगत होत्या किंवा असंगत होत्या असा एक प्रश्न निर्माण होऊ शकतो व तो वादाचा विषय होऊ शकतो. कारण चळवळीच्या स्वरूपाविषयी, कार्यपद्धतीविषयी मतभिन्नता होती. हिंसात्मक व अमानवी कृत्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रोत्साहनही दिले गेले होते. पण स्वराज्य हाच या सर्व चळवळींचा हेतू होता या विषयी कोणालाच शंका बाळगता येत नाही. म्हणून स्वराज्यचळवळीतली कृत्ये असमर्थनीय किंवा निषेधार्य मानली तरी ती स्वराज्याची भावना जोपासण्यास व वृद्धिंगत करण्यास काही काळ सहायक ठरली हे कोणालाच नाकारता येत नाही. ब्रिटिशांविरुद्ध राष्ट्रव्यापी असंतोष निर्माण करणे हे स्वराज्यचळवळीचे प्रारंभीचे स्वरूप होते. पण या स्वरूपात बदल होत जावून स्वराज्याची एक शास्त्रीय

भूमिका निर्माण व्हायला लागली व स्वराज्याचा अर्थही पूर्वीहून अधिक स्पष्ट होते गेला. लोकमान्य टिळकांचा आणि त्यांच्या हयातीपर्यंतचा स्वराज्य चळवळीचा कार्यकाल हा ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण करण्याचा कार्यकाल होता. म्हणून लोकमान्य टिळकांना असंतोषाचे जनक म्हणतात ते अर्थपूर्ण होय. पण म. गांधींचा स्वराज्य चळवळीचा कार्यकाल हा टिळकांच्या पुढचा म्हणून स्वराज्याकरिता अधिक निश्चित स्वरूपाचा होता. असंतोषाला आत्मिक सामर्थ्याचे स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न म. गांधींनी केला. कारण केवळ असंतोष हाच चळवळीच्या सामर्थ्यवाढीस सहायक ठरणार नव्हता. असंतोषातून स्वराज्य चळवळीचे सामर्थ्य निर्माण व्हावे म्हणूण म. गांधींना सत्याग्रहाचा शोध घ्यावा लागला. सत्याग्रहातून स्वराज्याच्या चळवळीचे सामर्थ्य निर्माण करण्याचा प्रयत्न म. गांधींनी केला. सत्याग्रह हा शब्द आज खूप प्रचलित आहे. म. गांधींनी या शब्दाचा उपयोग प्रथम दक्षिण आफ्रिकेत केला. तो निःशस्त्र प्रतिकार या अर्थाने [ पॅसिव रेजिस्टन्स ] म. गांधींना निःशस्त्र प्रतिकार म्हणजे सत्याग्रह एवढाच अर्थ सुरुवातीला अभिप्रेत होता. पण, सत्याग्रह हा अहिंसात्मक असावा याची जरूरी वाटू लागली. तेव्हा निःशस्त्र प्रतिकार म्हणजे अहिंसा नव्हे हे त्यांना स्पष्ट झाले. म्हणून अहिंसेविना सत्याग्रह निरर्थक होय हे लक्षात येताच निःशस्त्र प्रतिकार हा सत्याग्रहाचा अर्थ बदलून तो अधिक व्यापक केला गेला व सत्याग्रह हे जसे अन्यायाच्या प्रतिकाराचे साधन बनले तसें ते चित्तशुद्धि व आत्मशुद्धीचेही साधन बनले.

स्वराज्याच्या चळवळीचे सामर्थ्य सत्याग्रहामुळें निर्माण झाले व वाढले. या सामर्थ्याचा परिणाम दोन प्रकारे झाला. एक, ब्रिटिश सत्ता सामर्थ्यहीन ठरली. व भारतात स्वकीयांची राज्यव्यवस्था उदयास आली. दुसरे, सत्याग्रह या साधनाचा वापर सर्वस्थळी; सर्वव्यापी कोणत्याही कारणास्तव होवू लागला. सत्याग्रह हे सामर्थ्याचे लक्षण मानले जावू लागले- पण स्वराज्यात सत्याग्रहाविषयी प्रश्न निर्माण झाले आहेत. आणि सत्याग्रहाचे अहिंसात्मक स्वरूप पालटून हिंसात्मक स्वरूप सत्याग्रहाला येवू लागले आहे असे काही प्रमाणात दिसतेही. यामुळे स्वराज्यात सत्याग्रहाचे प्रयोजन नाही असे राज्यकर्त्यांपासून विचारवंतांपर्यंत सर्वजण म्हणू लागले आहेत. सत्याग्रहानें विधायक शक्ती वाढीला लागण्याऐवजी विघातक शक्तीच वाढत असल्याचे दिसून आल्यामुळे सत्याग्रहाची अनुपयुक्तता सांगितली जात आहे. पण मुळात सत्याग्रहच निरुपयोगी किंवा कालबाह्य ठरविण्याचा प्रयत्न मात्र चुकीचा वाटतो. कारण, सत्याग्रह निरुपयोगी असेल तर स्वराज्यही उपयोगाचे ठरणार नाही. अर्थात स्वराज्य व सत्याग्रहाचा निकटचा संबंध लक्षात न घेताच

सत्याग्रहाविषयी घाईघाईने बोलले जाते व सत्याग्रहाविषयी लोकमानसात अप्रीती निर्माण केली जाते. म्हणजे या बाबतीत संयमाने परिणामाची योग्य जाणीव ठेवूनच बोलले गेले पाहिजे.

सत्याग्रह हा आत्मक्लेषाचा मार्ग आहे. मानवी हक्कांची न्यायोचित मागणी अनत्याचारी मार्गाने करणे आत्मक्लेषाच्या सत्याग्रहामुळेच संभवते. इतर कशामुळेच हे संभवनीय नाही. सबब सत्याग्रहाचा वापर म. गांधींनी स्वराज्याकरिता केला. तो मानवी हक्काच्या सुरक्षिततेसाठी. बलवत्तर राज्यसत्तेला नियंत्रित करावे व राजकीय महत्वाकांक्षांना आवरावे म्हणून. राज्यसत्ता किंवा राजकीय महत्वकांक्षा बाळगणारे स्वराज्यात स्वैर वागू लागले तर स्वराज्यातली जनता स्वराज्याच्या हक्कापासून वंचित ठेवली जाईल. म्हणून स्वराज्य खालच्या स्तरापर्यंत पोचविताना राजकीय परिस्थितीत निरंतर बदल व्हावे लागतील. या करिता राजकीय सत्तेवर लोकांची पकड असावी लागेल. हे बदल करतांना सत्याग्रहाच्या साधनांचाच सुबुद्धपणे उपयोग करावा लागेल. प्रचलित कायदे एका विशिष्ट परिस्थितीतले असतात. पण परिस्थितीत बदल होत जाईल तसे कायद्यांच्याही स्वरूपात बदल होत रहावा लागेल व जुने कायदे बदलून नव्या कायद्यांची घडण व्हावी लागेल. हे करताना राजकीय सत्तेला सर्वंकष न होवू देण्याची काळजी घ्यावी लागेल. परिस्थिती किंवा वस्तुस्थितीचा परिणाम राजकीय सत्तेवर घडवीत जाणे अनिवार्य होऊन बसते. सबब राजकीय सत्तेला सर्वंकष न होऊ देता स्वराज्याच्या उद्देशासाठी राजकीय परिस्थितीवर परिणाम घडवणारी शक्ती सत्याग्रहाविना दुसरी अजून तरी उपलब्ध झालेली नाही. अर्थात ही शक्ती जनतेच्या सद्सद्—विवेकबुद्धीला आवाहन करून वापरावयाची असते व स्वराज्याच्या उद्देशपूर्ती-करता वापरावयाची असते हे मात्र या ठिकाणी विसरता कामा नये. कोणत्याही राजकीय सत्तेचा स्वभाव मुळांत एकच असतो. ब्रिटिशांची राजकीय सत्ता, हिटलर किंवा स्टॅलिन, माओची राजकीय सत्ता स्वराज्यातल्या राजकीय सत्तेहून भिन्न राहील व स्वराज्यातली राजकीय सत्ता देखील अनियंत्रित राहिल्यास हिटलर, स्टॅलिन व माओच्या सत्तेसारखीच सर्वंकष होईल. म्हणून सर्वंकषता हा कोणत्याही राजकीय सत्तेचा स्वभाव होय. पण स्वराज्यातल्या राजकीय सत्तेला स्वराज्याच्या उद्देशपूर्ती—करता गौणत्व येते. असे गौणत्व येणे हीच मुळी स्वराज्याची उद्देशपूर्ती. पण हिटलर, स्टॅलिन किंवा माओच्या संदर्भात राजकीय सत्तेला गौणत्व येत नाही. कारण, सत्ता स्वैर आहे. तिला स्वराज्याच्या उद्देशाचा कुठेच स्पर्श होत नाही. म्हणून या सत्तेला अमानुषतेपासून अलिप्त राहता येत नाही. किंबहुना अमानुषता

हाच या सत्तेचा स्वभाव होऊन बसतो. म्हणून अनियंत्रित सत्ता ही संवेदनशून्यतेतून अमानुषतेकडे जाते हे या बाबतीत लक्षात घेतलें पाहिजे. स्वराज्याच्या उद्देशपूर्ती-करता सत्याग्रहाचे प्रयोजन आहे ते यामुळेच ! म्हणून स्वराज्य व सत्याग्रह याचा परस्पराशी असलेला निकटचा संबंध हा उभयतांचे अस्तित्व सिद्ध करणारा आहे हे विसरून चालण्यासारखे नाही.

साम्राज्याच्या विरोधातून स्वराज्य निर्माण झाले. पण साम्राज्य हे राज्यवादाचे विकसीत रूप असल्यामुळे स्वराज्याला राज्यवादाचाही विरोधच आहे. राज्याची कल्पना ही दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याच्या उद्देशानेच जन्मास आली. बळाने मनुष्यावर विजय मिळविणे म्हणजे मनुष्य जिंकणे यात जी बलोपासना आहे तीच राज्याचीही बलोपासना होय. पण ही बलोपासना दुसऱ्याला गुलाम करण्याकरता करावयाची असते. अनेकांना तुच्छ लेखून स्वतःला श्रेष्ठ करण्याची कल्पना या बलोपासनेत व राज्याच्या कल्पनेत आहे. काही प्रजाहितदक्ष राजे झाले म्हणतात. राजा हा विष्णुचा अवतार समजला गेला, म्हणून राज्याला ईश्वरी सत्ताही म्हणण्याची एक रूढ कल्पना आहे. पण ही ईश्वरी सत्ता किंवा प्रभुसत्ता प्रजेहून भिन्न व लोककल्याणकारी होती. कल्याणाची जबाबदारी या ठिकाणी प्रजेची नव्हती ती प्रभुसत्तेची किंवा ईश्वरी सत्तेची अर्थात् ईश्वरी अंश मानलेल्या राजाची होती. सत्तेला ईश्वर जोडून ती सत्ता पवित्र समजली गेली. म्हणून राजसत्तेचे पालन पवित्र कर्म किंवा धर्मकृत्यही मानले गेले. प्रजेचे कल्याण करण्याची जबाबदारी राजा अथवा राज्याकडे होती. तेव्हा ही जबाबदारी त्यांच्याकडे कोणी, कधी व का सोपविली हे त्याकाळी विचारण्याची सोय नव्हती. कारण, राज्य व राजा धर्माशी व धर्म ईश्वराशी जोडला होता. धर्माला प्रश्न करणे म्हणजे ईश्वराला प्रश्न करण्या-सारखेच होते. ब्रिटिशांनी इंग्रजी भाषेला वाघीणीचे दूध करून या देशातील धर्माने व जातिव्यवस्थेने श्रेष्ठ ठरलेल्यांना पाजले व ते सर्व इंग्रजी वाघ ठरले. इंग्रजी राज्याशी प्रामाणिक राहणे हेही या पैकी कांही ब्रह्मवृंदांनी ब्रह्मकर्मच मानले होते. सबब इंग्रजी वाघीणीचे दूध प्यालेल्या सर्वांनी राजाच्या ठिकाणी ईश्वरी अंश पाहण्याच्या पद्धतीनेच इंग्रजी राज्यात ईश्वराला पाहिले. म्हणून ब्रिटिशांची प्रभुसत्ता ही वाघीणीचे दूध प्यायलेल्यांच्या भरवशावर दीर्घकाळ टिकून राहिली. राज्य व राजधर्मांचे मोहमयी स्वरूप सामान्य माणसाच्या प्रतिष्ठेला झिडकारणारे होते. म्हणून सामान्य माणसाच्या प्रतिष्ठेला अवसर मिळू नये अशी राज्यवादाची अंधश्रद्धा निर्माण केली गेली व यातच सामान्य माणसांना गुंतवून ठेवले गेले. यातूनच सामान्य माणसाला स्वतःची प्रतिष्ठा कळू नये अशी समाजाची रचना

उदयास आली. अशा प्रकारे प्रतिष्ठाहीन माणसाचा कळप निर्माण केला गेला. या कळपाला राजमान्य नीती व धर्माच्या चाबकाने हाकण्यात आले. या तऱ्हेने शतकानुशतकाचा मानवी इतिहास निर्माण झाला.

मानवी प्रतिष्ठेची प्रतिष्ठापना, तिचे संवर्धन व गुणवर्धन हा स्वराज्याचा उद्देश होय. प्रतिष्ठाप्राप्त माणूस हा स्वराज्याचा मानबिंदू होय. साम्राज्य व राज्याचा विरोध माणसाच्या प्रतिष्ठेकरिताच करावयाचा. या प्रतिष्ठेची जाणीव जनसामान्यात सत्याग्रहाने निर्माण करावयाची असते. म्हणून स्वराज्यात सत्याग्रहाचे महत्व आहे एवढेच नव्हे तर सत्याग्रहाशिवाय 'स्वराज्य हे उद्देशहीन ठरण्याची शक्यताच अधिक आहे.

• • •

...संग्रहालय, ठाणे. स्वदे. ग्र.
UCEEC ... दि: ...
2962 ... नों. दि 33-3-ee
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दी. क्र. 1C02५

## राष्ट्रीयीकरण व सत्याग्रही जीवनदर्शन

राष्ट्रीयीकरणाचे वारे वाहू लागले आहेत. राष्ट्रीयीकरणातून समाजवाद येईल असा सर्वत्र प्रचारही केला जात आहे. परंतु राष्ट्रीयीकरणाचा संबंध समाजवादाशी जोडणाऱ्यांनी अंतिम परिणामांचा फारसा विचार केला असेल असे वाटत नाही. कारण एखादी प्रवृत्ति किंवा उद्योग खाजगी क्षेत्रातून ( प्रायवेट सेक्टर ) सार्वजनिक क्षेत्रात ( पब्लिक सेक्टर ) आल्यामुळे ती प्रवृत्ति किंवा तो उद्योग समाजवादी होतो असे मुळीच नाही. म्हणून राष्ट्रीयीकरणाचा प्रत्यक्ष लाभ सर्वच सामान्यांना घेता येईल अशी परिस्थिती निर्माण करता येणार नाही. सर्व-सामान्यांना प्रत्यक्ष लाभ व्हावा अशी एक दृष्टी समाजवादाची आहे. पण हा लाभ माणसाची एक विशिष्ट प्रकारची क्षमता वाढविल्याने मिळणार असून उत्पादन-वाढीला पोषक अशी उत्पादनाची साधने उत्पादकांच्या स्वाधीन असतील अशी

नवी रचना करणे जरूरीचे असते. म्हणून संपत्तीचे वितरण हाच केवळ समाजवादी कार्यक्रम नव्हे किंवा उपभोग घेण्याची संधी निर्माण करणे म्हणजे देखील केवळ समाजवादी कार्यक्रम नव्हे.

अर्थात उत्पादकाची साधने उत्पादकाच्या हातात येतील व उत्पादनव्यवस्थाही उत्पादकांच्या क्षमतेवर निर्माण करण्यात येईल त्यावेळी समाजवादी कार्यक्रम निर्माण केला गेला असे म्हणता येईल.

तात्पर्य असे की, उत्पादकांची कार्यक्षमता वाढावी हे समाजवादी कार्यक्रमाला अभिप्रेत आहे. उत्पादनाची कार्यक्षमता ही उत्पादनाची साधने कशी आहेत व ती उत्पादकाच्या स्वाधीन आहेत किंवा नाही यावर अवलंबून आहे. म्हणून संपत्तीच्या समान वितरणाचा दृष्टिकोन हा संपूर्ण समाजवादी दृष्टिकोन नसून संपत्ति निर्माण करणाऱ्या साधनांचे उत्पादकात समान वितरण हाच खरा संपूर्ण समाजवादी दृष्टीकोन होय. या बाबतीत ज्या स्पष्टतेची आवश्यकता राष्ट्रीयीकरणाच्या कार्यक्रमात असावयाला पाहिजे. ती आज नाही. आणि राष्ट्रीयीकरण म्हणजे सरकारीकरण एवढीच एक दिशा आजच्या राष्ट्रीयीकरणाची मानली गेली असावी असे आज दिसते. पण सरकारीकरण ही राष्ट्रीयीकरणाची दिशा सर्व दृष्टीने धोक्याची आहे. समाजवादी कार्यक्रमाला देखील सरकारीकरण धोक्याचे आहे.

समाजवाद व राष्ट्रीयीकरण या दोहोत विरोध कुठे येतो व या दोहोत साम्य कुठे व कसे आहे याचा जागरूकपणे विचार केला पाहिजे. आणि याचा संपूर्ण विचार केल्याशिवाय राष्ट्रीयीकरणाचा समाजवादी कार्यक्रमाशी संबंध जोडणे चुकीचे होय. अर्थात राष्ट्रीयीकरणातला राजकीय आशय समाजवादाच्या वास्तविकतेवर कधीच प्रभाव टाकणार नाही. प्रभाव टाकल्यास राष्ट्रीयीकरण व त्याचा समाजवादाशी असलेल्या संबंधाचा निःपक्षपाती विचार करणेही यामुळे शक्य नाही.

समाजवाद व राष्ट्रीयीकरण या दोहोंचा स्वतंत्र अर्थ आहे. तो राजकीय आशयाने बाधित केला जाऊ नये. राष्ट्रीयीकरणाचा निर्णय हा राजकीय निर्णयच होय असे जे बोलले जाते त्यातली वास्तविकता लक्षात घेऊन राजकीय प्रभावात राष्ट्रीयीकरण व समाजवाद अर्थहीन ठरू नये याची काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रीयीकरणातून सरकारीकरण व्हावयाचे असल्यास समाजवादावर त्याचा काय परिणाम होईल याचा विचार करू. समाजवादावर सरळ परिणाम होईल तो असा की समाजातील उत्पादनक्षमता व एकूण कार्यक्षमता ही राज्याच्या जबाबदारीची

बाब होऊन बसेल. कार्यक्षमता ही सामाजिक जाणीव म्हणून शिल्लक राहू शकणार नाही. कायद्याच्या बळाने समाजाला राबवून घेण्याची वृत्ति राज्याची होईल. थोडक्यात समाज हा स्वतंत्र राहणार नाही.

राज्याच्या व राज्यातील कायद्यांच्या स्वाधीन तो होईल. समाजवादात राज्यवादाचे समर्थन नाही. मार्क्सने देखील राज्यवादाचे समर्थन केलेले नाही. पण रशियाच्या क्रांतीने समाजवादाचे वास्तविक रूपच पालटून टाकले. विद्रूपतेला समाजवाद म्हणण्याची प्रथा पाडली. ज्या समाजवादात राज्याचे समर्थन आहे तो समाजवाद कायद्यांचे राज्य माणसावर लादू इच्छितो. हे रशिया, चीनमध्ये घडले आहे. असे असताना राज्य व कायद्यामुळें समाजवादाची स्थापना होईल म्हणणे निव्वळ भ्रम नव्हे काय ? पण या भ्रमातच भारतात समाजवादी राजकारण खेळले जात आहे. आणि यातूनच राष्ट्रीयीकरणाचा सर्वत्र गाजावाजाही केला जात आहे. अर्थात यामुळे भारतीय समाजाचे स्वातंत्र्य नाहींसे करण्याची राज्यवादी वृत्ति व विचारसरणीच पुष्ट केली जाईल. या वृत्ति व विचारसरणीचा परिणाम समाजवादाला मुळीच पोषक असणार नाही आणि तो यापूर्वी देखील कधीच पोषक नव्हता.

क्रांतीतून येणारा समाजवाद देखील रशियात राजकीय सत्तेच्या केंद्रिकरणास प्रवृत्त झाला हे कोणालाच नाकारता येणार नाही. आणि सत्तेच्या केंद्रिकरणामुळे मार्क्सला अभिप्रेत असलेला दंडहीन समाज घडविणे अशक्य झाले हेच मुळी मार्क्सच्या समाजवादी क्रांती कल्पनेच्या विपरीत घडले. राज्यसत्तेचा संकोच घडवून दंडहीन समाज निर्माण करण्याची कल्पना मार्क्सच्या समाजवादी क्रांतीची वास्तविक कल्पना होती. पण याला मार्क्सवादी म्हणणाऱ्या कोणत्याच राष्ट्रात आजवर संधी मिळाली नाही. अर्थात रशिया,-चीनच्या क्रांतीमुळे एक स्थित्यंतर आले; सत्तापरिवर्तन झाले. स्थित्यंतर अथवा सत्तापरिवर्तन म्हणजे कांही क्रांती नव्हे. अर्थात मार्क्सला समाजवादी क्रांतीचा जो अर्थ अभिप्रेत होता त्यानुसार आजवर कुठेच काही घडलेले नाही. मार्क्सचा वारसा चालविण्याची वेळोवेळी घोषणा करणाऱ्या रशियामध्येदेखील मार्क्सची क्रांती घडलेली नाही.

समाजवादी क्रांतीसाठी जी साधने वापरली गेली तीच मुळात क्रांतीला प्रतिकूल अशी होती. शस्त्र हे क्रांतीचे साधन मानले गेले. हीच वास्तविक चूक झाली. शस्त्र हे मत्सरवृत्तीला चालना देणारे साधन आहे. मत्सरातून अत्याचार-अन्याय येतो. म्हणून शस्त्राच्या साधनाने माणसातली मत्सरवृत्ति वाढवून भूतलावर समाजवाद येण्याची सुतराम शक्यता नव्हती व नाही. पण याचा विचार करण्या–

इतपत मोकळेपणा सशस्त्र क्रांतीच्या समर्थकाजवळ नव्हता व आजही तो नाही. पण मार्क्सच्या क्रांतीकल्पनेचे महत्व ज्यांना वाटते त्यांना विचार करण्यासाठी संधी अजूनहि आहे. अर्थात ही संधी साधनशुद्धीच्या विचारात आहे. समाजवादी क्रांतीसाठी साधनशुद्धीचा विचार केल्याने मार्क्सचे महत्त्व कमी होणार नाही. उलट मार्क्सला अभिप्रेत असलेल्या क्रांतीसाठी पोषक असाच हा विचार आहे. पण तो मार्क्सवाद म्हणून अस्तित्वात आलेला नसून ती एक स्वतंत्र अभिव्यक्ती आहे. या अभिव्यक्तीकडे पूर्वग्रहातून पाहण्याचे टाळले पाहिजे. कारण पूर्वग्रह टाळल्यासच दुराग्रहाचे फावणार नाही.

महात्मा गांधींच्या विचारसरणीत समाजवादी क्रांती अभिव्यक्त झाली आहे. याला गांधी संप्रदायातल्या लोकांनी गांधीवाद म्हणून संबोधिले असले तरी गांधीवाद अशी वस्तूच नाही. हें महात्मा गांधींनींच सांगून टाकलेले असल्यामुळे या अभिव्यक्तीला कोणत्याच वादात बसविणे योग्य नव्हे.

अमेरिकन पत्रकार लुई फिशर यांच्या १९४६ साली पाचगणी येथे महात्मा गांधींशी झालेल्या संवादाचा वृत्तान्त श्री. प्यारेलालजींनी ४-८-१९४६ च्या हरिजन मध्ये लिहीला आहे. हा संवाद अत्यंत उद्बोधक आहे. त्यांत 'मी समाज-वादी आहे पण वेगळया प्रकारचा' असे गांधींनी म्हटले आहे.

लुई फिशरशी झालेल्या या संवादात अनेक गोष्टी आलेल्या आहेत ज्यांचा आजच्या परिस्थितीशी निकटचा संबंध येतो. मार्क्सवादाची साम्यवाद्यांनी त्यांच्या स्वार्थासाठी मोडतोड केली असेही या संवादात आहे. लेनीनच्या काळी या मोड-तोडीला सुरुवात होऊन स्टॅलिनने ही मोडतोड पूर्ण केली अशी चर्चा करून महात्मा गांधींचाही साम्यवादी उपयोग करून घेऊ इच्छितात व काँग्रेसमध्ये काँग्रेस मोडण्याकरिता कम्युनिस्ट शिरू इच्छितात हे लुई फिशरनी म्हटले होते. कम्युनिस्ट यशस्वी होणार नाहीत असे फिशरना दिलेल्या उत्तरात म. गांधींनी म्हटले होते. हा सर्व संवाद निश्चित वाचण्यासारखा आहे. पण समाजवादी क्रांतीची अभिव्यक्ती म. गांधींनी म्हटलेल्या त्यांच्या 'वेगळया समाजवादातच' आहे.

तो समाजवाद हाच विचाराच्या दृष्टिने महत्वाचाही आहे. श्री. किशोरलाल मशरुवाला यांचा 'गांधी और साम्यवाद' या अहमदाबादच्या नवजीवन प्रका-शनने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात या दृष्टीने बरीच सामग्री आहे.

म. गांधींच्या वेगळया समाजवादात साध्य-साधन विवेकाला महत्वाचे स्थान

आहे. अशुद्ध साधनांनी शुद्ध साध्य गाठता येणार नाही हे त्यांना पटलेले असल्यामुळे साधन शुद्ध असण्यावर त्यांचा भर असायचा. आणि ही साधनशुद्धी सत्याग्रहामुळेच शक्य आहे असे त्यांना वाटायचे. म्हणून समाजवादी क्रांती ही सत्याग्रहातूनच संभवनीय आहे. कारण सत्याग्रहामुळेच समाजवादी क्रांतीचे साधन शुद्ध असणे संभवते या त्यांच्या म्हणण्यातली वास्तविकता लक्षात घेतली पाहिजे. म. गांधींनी क्रांती त्याज्य मानली नाही पण क्रांतीचे समर्थन अत्याचारी मार्गाने होऊ शकत नाही असे त्यांना वाटायचे. तेव्हा, क्रांतीचे समर्थन सत्याग्रहातूनच होऊ शकेल; म्हणून क्रांतीचा मार्ग हा अनत्याचारीच असावा. अर्थात क्रांतीचा अन–त्याचारी मार्ग हा अहिंसक मार्ग होय. पण अहिंसा म्हणजे निष्क्रियता, गतिशून्यता असे मात्र म. गांधींना मान्य नव्हते. उलट क्रांतीचा अहिंसक मार्ग हा सत्याग्रहा–मुळेच इतका गतिमान होतो की, या गतिमानतेमुळे मनुष्याच्या जीवनात क्रांतीला सुरुवात होते. समाजातल्या क्रांतीची सुरुवात स्वतःपासूनच होते. म्हणजे क्रांतीवादी क्रांतीच्या मूल्यांना स्वतःच्या जीवनामध्ये स्थान देतो. यामुळे तो गतिमान असतो व ही गति टिकाऊ स्वरूपाची असते. तेव्हा क्रांतीचे सत्याग्रही दर्शन हेच मुळी म. गांधींच्या वेगळ्या समाजवादाचे लक्षण होय. म्हणून या समाजवादाला आचार्य जावडेकरांनी सत्याग्रही समाजवाद असे संबोधिले आहे व ते यथार्थ वाटते.

सत्याग्रही समाजवादाला म. गांधी व लुई फिशर यांच्या चर्चेत आलेल्या 'आजाद दुनियेचे' आकर्षण आहे. याच आकर्षणामुळे जयप्रकाश आदि समाजवादी स्वराज्यपूर्वकाळात भारावलेले होते. पण या 'आजाद दुनिये'-कडे म्हणण्यासारखी वाटचाल झाली नाही. विशेषतः स्वराज्यात ही वाटचाल जाणवण्या-इतकी मंदावली. अर्थात स्वराज्याचे स्वागत ज्या भावनेतून आम्ही केले ती भावनाच मुळी आजाद दुनियेकडे वाटचाल करणाऱ्या वृत्तीशी प्रतिकूल होती. स्वराज्य हे एक राजकीय स्थित्यंतरच होते. या स्थित्यंतरामुळे समाजवादी किंवा सत्याग्रही क्रांतीला संधी उपलब्ध होण्यास एक परिस्थिती निर्माण झाली. या राजकीय स्थित्यंतराचे हे खरे महत्व होय. पण १९४७ साली मिळविलेले स्वराज्य हे राजकीय स्थित्यंतर नसून ते संपूर्ण स्वराज्य होय असे बहुतेक सर्वांनी मानून घेतले. म्हणून आजाद दुनियेचे आकर्षण आम्हाला वाटेनासे झाले. याचमुळे स्वराज्यानंतर आजाद दुनियेकडे होणारी वाटचाल थांबली.

अर्थात स्वराज्याची अपूर्णता ही अजूनही आम्हाला जाणवत नाही. पण यामुळे स्वराज्य हे तुंबलेल्या पाण्यासारखे झालेले आहे. या संकीर्ण स्वराज्याचे आजचे

स्वरूप किती भयानक आहे हे भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक अस्थिरतेकडे लक्षपूर्वक पाहिल्यास कळण्यासारखे आहे. राष्ट्रीयीकरणाचे निर्माण झालेले नवे आकर्षण हे भारतीय परिस्थितीच्या अस्थिरतेचाच एक परिणाम होय. राष्ट्रीयीकरणातून समाजवाद स्थापण्याचा भ्रम निर्माण होत असल्यामुळे तर भारताच्या अस्थिर परिस्थितीतले धोके अधिकच जाणवू लागले आहेत. कारण, राष्ट्रीयीकरणातून समाजवाद आणण्याची कल्पना ही हिंसक क्रांतीतून दंडहीन समाज निर्माण करण्याच्या कल्पनेसारखीच आहे. हिंसक क्रांतीतून सत्तेचे केंद्रिकरण रशियात झाले. दंडहीन समाजाची समूळ कल्पना उपटून फेकली गेली. तसेच राष्ट्रीयीकरणातून राज्यवादच बळकट केला जाईल व समाजवाद फेकला जाईल. राज्यवादात सत्तेचे केंद्रिकरणच होईल. अर्थात राष्ट्रीयीकरणाचे आज दिले जाणारे कोणतेही समर्थन हे खऱ्या स्वराज्याच्या उद्देशाशी कदापि जुळणारे नाही. म्हणून भारताचे आजचे स्वराज्यही धोक्यात येईल.

दंडमुक्त समाजाची कल्पना व आजाद दुनिया यात तसा फरक नाही. पण अशुद्ध साधनांच्या वापरामुळे दंडमुक्त समाज घडणे अशक्य झाले. आजाद दुनियेच्या कल्पनेत साधनाच्या शुद्धतेलाच अधिक भर दिला गेला. म्हणून सत्याग्रहदर्शन प्रतिष्ठीत करण्याचा म. गांधींनी प्रयत्न केला. म. गांधी व मार्क्स या दोघांच्या जीवनदर्शनात जो फरक म्हणता येईल तो हाच. पण म. गांधी, मार्क्सच्या कितीतरी पुढच्या काळातले आहेत. अर्थात समाजवादी क्रांतीला सत्याग्रही दिक्षा दिल्यामुळे म. गांधींचे जीवनदर्शन टवटवीत झाले. या जीवन–दर्शनात प्रगल्भता व दूरदर्शिता आली. पण समाजवादाला सत्याग्रही दीक्षा देण्याचे कार्य म. गांधींनंतर पुरेशा वेगाने झालेले नाही यचे कारण असे की, समाज–वादाचे मूळ आकर्षण समताच राहिले. पण समता हें काही जीवनदर्शन नव्हे. ती एक प्रक्रिया आहे. केवळ प्रक्रियेचे आकर्षण वाढून जीवनदर्शनाची प्रवृत्ति बाजूला टाकण्यात समाजवादी क्रांतीची फार मोठी हानी झाली. म. गांधींनी अंत्योदयाच्या पद्धतीतून समतेचे महत्व प्रतिपादीले, त्या करिता विधायक कार्याची योजना केली, तरी त्यांनी अंत्योदयाला जीवनदर्शन मानले नाही. ती एक समतेची प्रक्रियाच मानली. समाजवाद्यांनी मात्र समतेसाठी राज्यसत्तेचे महत्व मान्य केले. नव्हे, राज्यसत्तेकरवी समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. यात एक भाव–विवशता आहे, म्हणून असहाय्यताही आहे. म्हणून समाजवादी जीवनदर्शनापासून दूर राहिले.

दंडमुक्त किंवा ‘आजाद दुनिया’ हेच समाजवादाचे मूळ आकर्षण

असावयास पाहिजे होते. कारण यात जीवनदर्शन आहे. या आकर्षणासाठीच समाजवादाला सत्याग्रही दीक्षेची आवश्यकता होती व आहे. पण समाजवादाला सत्याग्रही दीक्षा देण्याचे कार्य द्रुतगतीने होत नाही. म्हणून समाजवाद राष्ट्रीयीकरणाच्या माध्यमातून राज्यवादाकडे व पर्यायाने सत्तेच्या केंद्रिकरणाकडे जाऊ पहात आहे. यातून आजाद दुनिया किंवा दंडहीन समाजाचे महत्वच कमी केले जात आहे. यामुळे मार्क्स, गांधींचे जीवनदर्शन मागे पडेल. हे जीवनदर्शन राज्यवादी नाही. राज्यवादी असूच शकत नाही. कारण राज्यवादात मनुष्य आजाद असू शकत नाही. यातून लेनिन, स्टॅलिन व माओ-दर्शन प्रतिष्ठीत होईल.

या तिघांनी राज्यवादाचा अनिर्बंध पुरस्कार केलेला आहे. म्हणून राज्यवादातून माणसाचे स्वातंत्र्य प्रस्थापित केले जाणे केव्हाही अशक्यच होय. अर्थात दर्शनाचा अंतिम परिणाम गुलामगिरी हाच निघतो. म्हणून हा समाजवादाला धोका आहे. स्वराज्याला धोका आहे. यात क्रांतीची अडवणूकही आहे.

समाजवादी क्रांतीदर्शन सत्याग्रही निष्ठेने पुढे नेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. समाजवाद सत्याग्रही दीक्षेविना गतिमान होणार नाही हे आमच्या केव्हा ध्यानात येईल ?

* * *

REFBK-0018426

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८०८२५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ५८६९९ वि: निबंध
क्रमांक २७८८ नों: दि: ३१-३-५२

काही निवडक

प्रकाशनें

● ● ●

रामननोहर लोहिया
इंदुमती केळकर

सफ्रेजेट आंदोलन
इंदुमती केळकर

विधानसभा : परिचय
के. टी. गिरमे

भारतीय न्याय व्यवस्था
बॅ. वि. न. गाडगीळ

दारुबंदीची नशा
हरिभाऊ लिमये

संकेत
मधु मंगेश कर्णिक

त्याचं काय आहे
वि. आ. बुवा

रॉबिन्सन मंडळी
भा. रा. भागवत

स्वप्न आणि सत्य
चंद्रभागेच्या वाळवंटी
हिमालयाची शिखरे
मॅग चियांग व
इतर गोष्टी
साने गुरुजी

मराठी व्यक्तिनामकोष
डॉ. सु. बा. कुलकर्णी